सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | बुधवार, ४ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक २८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### निवेदन


दर बुधवारी प्रसिद्ध होणारी सदाफुली पुरवणी आज तांत्रिक कारणामुळे प्रसिद्ध होणार नाही. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

## महत्त्वाचे

### सलग तिसऱ्या सत्रात शेअर बाजारांत तेजी कायम

**मुंबई** : आशियाई बाजारातील सकारात्मक संकेतांदरम्यान मंगळवारी शेअर बाजारांत सलग तिसऱ्या सत्रांत तेजी कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ५९७ अंकांनी वाढून ८०,८४५ अंकांवर, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १८१ अंकांच्या वाढीसह २४,४५७ या पातळीवर स्थिरावला. आज सार्वजनिक क्षेत्रातील बँकांसह एचडीएफसी, भारतीय स्टेट बँक आणि रिलायन्स या हेवीवेट शेअर्समधील तेजीमुळे बाजाराला चालना मिळाली. आजच्या सत्रात विशेषतः भारतीय रिझर्व्ह बँक पतधोरण समितीच्या शुक्रवारी जाहीर होणाऱ्या रेपो रेट निर्णयापूर्वी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शेअर्समध्ये वाढ दिसून आली. मेटल आणि फायनान्शियल शेअर्समध्येही तेजी राहिली. नोव्हेंबरमध्ये अदानी पोर्ट्स कंपनीने ३६ दशलक्ष मेट्रिक टन मालाची हाताळणी केल्याचा अहवाल दिल्यानंतर बीएसईवर अदानी पोर्ट्सचा शेअर्स ६ टक्क्यांनी वाढून १,३०० रुपयांवर पोहोचला. गौतम अदानींवर आरोप झाल्यानंतर मागील आठवड्यात अदानी समूहाच्या समभागांत मोठ्या प्रमाणात घसरण झाली होती.





महायुती सरकारच्या शपथविधीचा भव्यदिव्य महासोहळा गुरुवारी मुंबईतील आझाद मैदानावर होणार आहे. त्यासाठीची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आहे

# महाशपथविधीची जय्यत तयारी

### आज कळणार नव्या मुख्यमंत्र्यांचे नाव

**मुंबई, ३ डिसेंबर**

महायुतीच्या महाविजयानंतर आता महाराष्ट्राचे नवे सरकार स्थापन करण्यासाठी महाशपथविधीची जय्यत तयारी आझाद मैदानावर सुरू आहे. भव्य शामियाना उभारल्या जात असून, ५ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता हा शपथविधी होणार आहे.

भाजपा विधिमंडळ पक्षनेतेपदाच्या निवडीची प्रक्रिया बुधवारी सकाळी १० वाजता पार पडणार आहे. केंद्रीय पर्यवेक्षक म्हणून गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपाणी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडणार आहे. भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांना ५ डिसेंबरलाच आझाद मैदानात शपथ दिल्या जाण्याची शक्यता आहे. त्याचवेळी मुख्यमंत्री म्हणून कोण शपथ घेईल, याबाबत अत्यंत गोपनीयता पाळली जात आहे. मात्र, भाजपाच्या नव्या मुख्यमंत्र्यांचे नाव बुधवारी सकाळी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर लगेच राज्याला कळेल. याबाबत गुप्तता पाळली जात असली तरी, देवेंद्र फडणवीसच विधिमंडळ पक्षनेते आणि तेच मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, ही शक्यता अधिक आहे.

नव्या सरकारमध्ये दोन उपमुख्यमंत्री असतील किंवा नाही याबाबत साशंकता आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री हे जवळवळ निश्चित आहे. त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे किती मंत्री शपथ घेतील, हे अद्याप निश्चित नाही. त्याचवेळी शिवसेनेचे अद्याप काही निश्चित नसल्याचे दिसते. सत्तेत सहभागी होणार किंवा नाही, झालेच तर सुरुवातीला किती मंत्री शपथ घेतील, याबाबत स्पष्टता नाही. गृहमंत्रिपदावर अडून बसलेले काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजूनही शिवसेनेकडून उपमुख्यमंत्री कोण होणार, कोणती खाती मिळावी, यावर चर्चा करताना दिसत नाहीत.

रविवारी ते दिल्लीहून ठाण्यात परतले आणि आजारी पडल्यानंतर आपल्या गावी गेले होते, त्यामुळे सत्तास्थापनेची प्रक्रिया लांबणीवर पडली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे शपथ घेण्यापूर्वी कॅबिनेट खात्यावर चर्चा करण्याची शक्यता होती, महायुतीच्या बैठकीची शक्यता होती. मात्र, शिंदेंच्या प्रकृती अस्वाथ्यामुळे सर्व शक्यता बारगळल्या असून, सत्तास्थापनेत शिवसेनेची नेमकी भूमिका काय असेल, ते ५ डिसेंबरलाच स्पष्ट होईल.

*(तभा वृत्तसेवा)*

### माध्यम प्रतिनिधींना मज्जाव

आझाद मैदानावर वृत्तसंकलन करण्यासाठी जाण्यास माध्यम प्रतिनिधींना मज्जाव करण्यात आला आहे. आझाद मैदानाला छावणीचे स्वरूप आले असून, सर्वत्र पोलिस तैनात करण्यात आले आहेत. परिसरात प्रवेश तर सोडा बाहेरूनही फोटो काढण्यास मनाई करण्याचा आदेश उच्चस्तरावरून आला असल्याचे पोलिस सांगतात. भव्यदिव्य अशा या महाशपथविधीच्या तयारीच्या वृत्तांकनाला मज्जाव करण्यामागचे नेमके कारण काय, हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.

## फडणवीस यांनी घेतली एकनाथ शिंदेंची भेट

**मुंबई, ३ डिसेंबर**

भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. २६ नोव्हेंबर रोजी दोन्ही नेत्यांची दिल्लीत चर्चा झाली होती. त्यानंतरची ही पहिलीच भेट आहे.

सत्ता स्थापनेच्या दृष्टीने फडणवीस आणि शिंदे यांच्यातील ही भेट अतिशय महत्त्वाची मानली जात आहे. तत्पूर्वी, एकनाथ शिंदे यांनी भाजपा नेते गिरीश महाजन यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली. यावेळी उदय सामंत देखील उपस्थित होते. गिरीश महाजन वर्षा निवासस्थानावर असतानाच देवेंद्र फडणवीस तिथे पोहोचले. त्यामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. आता महायुतीच्या सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. सरकारचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर पार पडणार आहे. या सोहळ्याची सध्या जोरदार तयारी केली जात आहे. फडणवीस हे नवे मुख्यमंत्री होणार जवळपास निश्चित झाले आहे.



## शनिवार, रविवारीही करावे लागेल सभागृहाचे कामकाज

### सभापती ओम बिर्ला यांचा इशारा

**नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

वारंवार स्थगनप्रस्ताव आणि अन्य आयुधांच्या माध्यमातून सभागृहाचे कामकाज स्थगित करण्याचा प्रयत्न केला गेला, तर कामकाजाची भरपाई करण्यासाठी शनिवार आणि रविवारीही सभागृहाचे कामकाज चालवावे लागेल, असा इशारा लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी दिला.

आज प्रश्नोत्तराच्या तासानंतर बिर्ला यांनी शनिवार, १४ डिसेंबरला सभागृहाचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू होईल, अशी घोषणा केली. तुम्ही सभागृहाच्या कामकाजात जेवढा अडथळा आणाल, संसदीय कामकाजाची भरपाई करण्यासाठी तेवढे दिवस शनिवार आणि रविवारीही तुम्हाला संसदेच्या कामकाजात सहभागी व्हावे लागेल. आज कोणत्याच स्थगनप्रस्तावाला मी परवानगी देणार नाही, असे ते म्हणाले. प्रश्नोत्तराच्या तासात कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या किमान हमी भावाच्या संदर्भात दिलेल्या उत्तरामुळे नाराजी व्यक्त करीत काँग्रेस आणि अन्य सदस्यांनी सभात्याग केला. अदानी आणि अन्य मुद्यांवरून झालेल्या गोंधळामुळे संसदेच्या हिवाळी अधिवेशनातील पहिल्या आठवड्यातील एकही दिवस सभागृहाचे कामकाज होऊ शकले नव्हते.

## कुरनुर येथे नातवाने केला आजीचा खून

### अक्कलकोट तालुक्यातील खळबळजनक घटना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ डिसेंबर-**

कुरनुर (ता.अक्कलकोट) येथे नातवाने आजीला दगडाने डोक्यात मारून कुऱ्हाडीने मानेवर मारून जावे ठार मारल्याची घटना सोमवारी रात्री ९ च्या सुमारास घडली. संशयित आरोपी सुशांत ह्याचे आजीबरोबर वडिल सदाशिव यांच्यावर पुढील उपचार कुठे करायचे याबाबत वाद झाला होता वादामुळे रागाच्या भरात नातवाने डोक्यात दगड व मानेवर कुऱ्हाडीने निर्दयपणे मारून जीवे ठार मारल्याची घटना निदर्शनास आल्याने मोठी खळबळ माजली आहे.

सुमित सदाशिव सुरवसे असे संशयित आरोपी नातवाचे नांव आहे . निर्मला संतराव सुरवसे (वय ७० रा कुरनुर) असे मृत आजीचे नाव आह. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीसात संताराम विठोबा सुरवसे यांनी फिर्याद दाखल केली आहे. संशयित आरोपी सुमित यांचे वडिल सदाशिव सुरवसे हे सोलापूर येथे अनेक दिवसांपासून उपचार चालू आहेत, मात्र उपचारात प्रगती नाही. पुढील उपचार कुठे करायचे याबाबत नातू सुमित याचे आजीबरोबर वाद झाला होता. घटनेचा अधिक तपास सपोनि निलेश बागाव करत आहेत.








सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## पिकअप लाकूड मालासह जप्त; सांगोला वनविभागाची कारवाई

**सांगोला, दि. ३ डिसेंबर-**

वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला यांनी सांगोला ते मेडशिंगी रस्त्यावर सोमवारी दिवसा फिरती करत असताना पिकअप क्र.एम.एच.४४.यू. ०७९८ विनापरवाना वृक्षतोड व वाहतूक करत असताना मालासह जप्त केला. बाजार भावप्रमाणे सदर लाकडाची किंमत १२ हजार रुपये आहे. याबाबत वृक्षतोड मजूर रोहीत राजाराम ऐवळे रा.चिंचोली, ता.सांगोला, वाहन चालक संजय काशीनाथ माने रा. सांगोला, लाकुड व्यापारी भाऊसाहेब दामु शिनगारे रा. चिंचोली ता.सांगोला यांच्या विरुध्द प्रथम वनगुन्हा नोंद केला आहे. पिकअप वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला कार्यालया जवळ ठेवला आहे. सदरची कारवाई पुणे मुख्य वनसंरक्षक एन.आर.प्रवीण, सोलापूर उपवनसंरक्षक लेफन्टंट कुशाग्र पाठक, सहा. वनसंरक्षक व्ही.एम. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर व वनपाल, वनरक्षक यांनी केली.



## काव्य मैफिलीत ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

सोलापूर कवी कट्टा मंचच्या वतीने विजयपूर रोडवरील ब्रिजधाम वृध्दाश्रमात आयोजित केलेल्या काव्य मैपिलीत एकापेक्षा एक वरचढ कविता श्रवण करताना ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य पुलल्याचे दिसून आले. या कार्यक्रमासाठी ब्रिजमोहन फोफलिया आणि राम प्रभु माने यांनी पुढाकार घेतले होते. डॉ. डी.एच. जमादार यांच्या अध्यक्षतेखाली आणि अंजना गायकवाड, गोविंद काळे, पुरुषोत्तम निकते यांच्या प्रमुख उपस्थितीत या मैपिलीचे आयोजन करण्यात आले होते. यात सोलापूर शहर, जिल्ह्यातील २५ कवी-कवयित्रींनी सहभाग नोंदविले होते. तुळशीचे रोप, गुलाबपुष्प व प्रमाणपत्र देऊन कविंचे सन्मानित करण्यात आले. नरेंद्र गुंडेलो, संध्या धर्माधिकारी, वनिता गवळी, संध्या हेब्बाळकर, जमालोद्दिन शेख, जावेद शेख, सुरेश निकंबे, शैलेश उकरंडे, आकाश कोठाडिया, सुकन्या रामनवर, रोहन माने, छाया जाधव, अंबादास जाधव, सचिन जाधव आदींनी कविता सादर केल्या. नागेश माणेकरी यांनी सूत्रसंचालन केले. मयुरेश कुलकर्णी यांनी आभार मानले.



## श्रीपूर नगर परिषदेच्या वतीने अपंगांना अडीच लाखांचा निधी वाटप

**महाळूंग, दि. ३ डिसेंबर-**

श्रीपूर नगर पंचायतीच्या वतीने परिसरातील अपंग व्यक्तींना अनुदानाचे वाटप करण्यात आले. नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण व नगर सेवक यवसाहेब रेडे-पाटील यांचे हस्ते हा निधी देण्यात आला. याप्रसंगी नगरसेवक रावसाहेब रेडे-पाटील, सामाजिक कार्यकर्ते अशोक चव्हाण, नगरपंचायीचे अधिकारी दत्तात्रय यादव , रघुनाथ, गलांडे भाऊसाहेब, जाधव, बनसोडे उपस्थित होते. नगराधक्षा लक्ष्मी चव्हाण यांनी शासन निर्णयानुसार निधी नगरपंचायतीच्या महसुली उत्पन्नातून वाटप करण्यात येतो. परिसरातील ९१ लाभार्थ्यांना याचा लाभ मिळत असून प्रत्येकी २,७४५ रुपये प्रमाणे साधारण अडीच लाख रुपये वाटप करण्यात येत असल्याचे सांगितले.

## नदी पात्रात सहा ब्रास वाळू ढकल्याचा आरोप खोटा : आण्णा कोकरे

**मंगळवेढा दि.३ डिसेंबर**

ब्रम्हपुरी हद्दीतील भीमा नदी पात्रातून बेकायदा १० ब्रास वाळू साठा केलेल्या वाळू साठ्यामधील ६ ब्रास वाळू ही मसहूल प्रशासनाने परस्पर विकली असल्याचा आरोप खुद्द आण्णा भीवा कोकरे यांनी करुन याबाबतची लेखी तक्रार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे केली असून वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करुन संबंधीतावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दि.२८ रोजी ब्रम्हपुरी हद्दीतील जमीन गट नं.८२२/२ मध्ये भीमा नदी पात्रातील वाळू साठा करुन ठेवल्याची माहिती महसूल प्रशासनास मिळताच मंगळवेढा मंडल अधिकारी, तलाठी व एक पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी जावून प्रत्यक्ष पाहणी केल्यावर जवळपास १० ब्रासचा वाळू साठा असल्याचे निदर्शनास आले होते. रात्री कडाक्याची थंडी असल्याने येथील सर्व कर्मचारी १ कि.मी. अंतरावर रोडवर थांबले होते. पहाटे ३ वाजता हे कर्मचारी प्रत्यक्ष पाहणी करण्यास गेल्यावर तेथे १० ब्रास ऐवजी केवळ ६ ब्रास वाळू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. यावर महसूल प्रशासनाने आण्णा भीवा कोकरे (रा.ब्रम्हपुरी) याच्यावर गुन्हा दाखल केला होता. यामध्ये ६ ब्रास वाळू ही आरोपीने नदीच्या पात्रात ढकलून वाळू साठा कमी केल्याचा आरोप त्याच्यावर लावला होता. हे आरोप आरोपी असलेले कोकरे यांनी फेटाळून लावत महसूल प्रशासनानेच ही वाळू परस्पर विकली असल्याचा आरोप करीत जिल्हाधिकारी यांच्याकडे कोकरे यांनी तक्रार केली आहे. रात्रभर महसूल कर्मचारी सदर ठिकाणी असताना मी वाळू ढकलताना मला त्यांनी जागेवरच का पकडले नाही? असा कोकरे यांचा सवाल आहे. यावेळी त्यामधील एक कर्मचारी दारुच्या नशेत असल्याचे निदर्शनास आल्याने कोकरे यांनी ११२ क्रमांकाला कॉल करुन पोलीस मदत मागीतल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. सकाळी सहाचाकी दोन मोठे व एक लहान टिपर वाळू साठ्याजवळ बोलवून उर्वरीत शिल्लक राहिलेली वाळू भरुन घेवून गेले असल्याचे व्हिडीओ चित्रीकरण कोकरे यांच्याकडे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. नदी पात्रात ६ ब्रास वाळू नदीपात्रात ढकलून दिली हे चुकीचे असून याची संपूर्ण चौकशी करावी, अशी मागणी कोकरे यांनी केली आहे.

# गणवेश वाटपाचा बट्ट्याबोळ; नियोजनात समग्र शिक्षा अभियान फेल

## पाल्यांना गणवेश नसल्याने पालकांनी केला टाहो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर**

समग्र शिक्षा अभियान व राज्य शासनामार्फत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत दोन गणवेश देण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आले होती. मात्र शैक्षणिक वर्ष शेवटच्या टप्प्यात आले असताना ही स्काऊट अँड गाईडच्या गणवेशापासून विद्यार्थी वंचितच राहिले आहेत. यंदाच्या शैक्षणिक वर्षात सोलापूर जिल्ह्यात विद्यार्थी गणवेश वाटपाचा बट्ट्याबोळ झाला असून नियोजनात समग्र शिक्षा अभियान फेल झाले आहे. या प्रकाराने गणवेशासाठी पात्र असणाऱ्या जिल्ह्यातील २ लाख ३९ हजार ९९ विद्यार्थी स्काऊट अँड गाईडच्या गणवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

दरम्यान, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शासनाकडून पहिला नियमित गणवेश शैक्षणिक वर्ष मध्यावर आल्यानंतर शिवून देण्यात आला. मात्र ते गणवेश काही विद्यार्थ्यांना टाईप तर काही विद्यार्थ्यांना सैल झाले. गणवेशाची अदलाबदल करून गुरुजन वर्ग मेटाकुटीला आला. या प्रकाराने शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना नाहक मानसिक त्रास सहन करावा लागला. पहिला गणवेश मिळण्यास प्रदीर्घ कालावधी लोटल्याने स्काऊट अँड गाईडचा गणवेश तरी वेळेवर मिळावा यासाठी पालकाकडून आमच्या लेकरावाच्या पांघरूणाचं काय झालं ? असा तगादा पालकांकडून लावला जात असल्याने गुरुजन वर्ग हातबल झाले आहेत. २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षात समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेअंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेमध्ये इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना, आर्थिक दुर्बल घटक, अनुसूचित जाती - जमाती या प्रवर्गातील मुलांना प्रत्येकी दोन मोफत गणवेश देण्याचे नियोजन आखण्यात आले. त्यापैकी एक गणवेश नियमित तर दुसरा गणवेश हा स्काऊट गाईडचा आहे .तर नियमित गणवेश शासनाकडून तयार स्वरूपात पुरविण्यात आले. तर स्काऊट गाईड गणवेशाचे कापड शासनाकडून पुरवठा करण्यात येणार असून त्यासाठी शाळांना प्रति विद्यार्थी ११० रुपये शिलाई साठी देण्यात येणार आहेत. हा गणवेश महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटाकडून शिवून देण्यात येणार आहे. जिल्ह्यात स्काऊट गाईडचा गणवेश शिवण्यासाठी कापड प्राप्त झाले आहे . मात्र स्काऊट अँड गाईडचा गणवेश विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी तरी मिळणार का हा मात्र संशोधनाचा विषय आहे.

### शिलाईचे काम महिला आर्थिक विकास महामंडळाला

स्काऊट अँड गाईड चा गणवेश शिवण्यासाठी शाळा स्तरावर शालेय शिक्षण समितीला प्रत्येक गणवेश ११० रुपये शिलाई देण्यातचे शासनाकडून मान्य करण्यात आले. मात्र इतक्या अल्प दरात अपेक्षित उत्तम दर्जाचा गणवेश शिवून देण्यास कोणीही तयार नाही. तसे स्पष्टीकरण शालेय शिक्षण समितीने लेखी स्वरुपात गट शिक्षणाधिकाऱ्यांना कळविले आहे. त्यामुळे आता गणवेशाची शिलाई करण्याचे काम महिला आर्थिक विकास महामंडळाकडून जिल्ह्यातील महिला बचत गटांना देण्यात आले आहे.

### गणवेशास पात्र विद्यार्थ्यांची तालुका निहाय संख्या

अक्कलकोट - २२८४८, बार्शी -१३९४४, करमाळा -१५९८४, माढा -२०८६२, माळशिरस -२५९९३, मंगळवेढा-१३३५३, मोहोळ -२१२५४, पंढरपूर -२१४६६, सांगोला -१९११०२, उत्तर सोलापूर -८७९२, दक्षिण सोलापूर -२०४०१. एकूण -२०३९९९.

### अन्यथा दंडात्मक कारवाई

समग्र शिक्षा अभियाना कडून जिल्ह्यात स्काऊट अँड गाईड गणवेशासाठी कापड प्राप्त झाले आहे. तालुका पातळीवरून महिला आर्थिक विकास महामंडळाला ते वितरीत करण्याचे काम सुरू आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाने स्काऊट अँड गाईड गणवेशाचे कापड ताब्यात घेतल्यानंतर ४५ दिवसाच्या आत गणवेश शिवून देणे बंधनकारक आहे. तसे नाही झाल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. असे स्पष्टीकरण या संदर्भात बोलताना शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिले.

**- कादर शेख,**
शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग सोलापूर.

## नॅचरल ब्ल्यू कोब्रा मुळे मिळाले घारीला जीवनदान

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

सम्राट चौक येथील सिटी बस डेपो मध्ये एका ५० फूट उंच झाडाच्या फांदीवर नायलॉन मांज्यात एक भली मोठी घार तडफडत असल्याचे तेथील कर्मचाऱ्यांनी पाहिले. त्यांनी लगेच नॅचरल ब्ल्यू कोब्रा चे सर्पमित्र दिपक इंगळे याची माहिती फोनवर देण्यात आली. नॅचरल ब्ल्यू कोब्रा सर्पमित्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पक्षिमित्र व सर्पमित्र दिपक इंगळे हे लगेच आपले सहकारी निलेश माने, रफिक सय्यद, बाबुलाल नदाफ, मानव गायकवाड, गौरव पात्रे, संभाजी मस्के, गौतम नागटिळक,दत्ता शिवशरण, विनायक टोम्पे, करण इंगळे, चंद्रमणी इंगळे इत्यादी सर्वपक्षीमित्रांसोबत् दाखल झाले. ५० फुट उंचीवर घार अडकली असल्याने त्यांनी लगेच रूपा भावनी येथील अग्निशामक दलाशी सम्पर्क साधून त्यांना येण्यास सांगितले.



तात्काळ अग्निशामक दलाची गाडी दाखल होताच पक्षिमित्र तसेच सर्पमित्र यांनी ५० फुट उंच असलेल्या घारीस जीवनदान दिले. घाबरलेल्या घारीस पाणी पाजून निसर्गात मुक्त करण्यात आले.

## बार्शीत जुगार अड्यावर पोलीसांचा छापा; सहा जणांवर गुन्हा

### साडे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ डिसेंबर-**

सोलापूर रोड, मुळे प्लॉट येथे नाकाडे याचे सिक्युरिटी रूममध्ये जुगार अड्यावर दि २ डिसेंबर रोजी रात्री ११.२० वाजता शहर पोलीसांनी मारलेल्या छाप्यात सुधीर उर्फ बापू नकाडेसह सहा जणांवर कारवाई करण्यात आली यावेळी रोख ८९३०० रुपये व सुमारे २५५७०० रुपयाचे महागडे एन्ड्रॉईड मोबाईल असा ३ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त केले आहे.

सुधीर उर्फ बापू शिवराज नाकाडे (वय ६८ रा. मुळे प्लाट सोलापूर रोड बार्शी), सतीश गणपत हजारे वय ४० (रा. पानगाव बार्शी), अमोल दत्तात्रय हिंगमरे वय ४४ (रा. सुभाषनगर बार्शी), धनंजय शिवाजी मोरे वय ४७ (रा. पवार गल्ली कसबा पेठ बार्शी) विजय मोहन वाघमारे वय ३९ (रा. लहुजी चौक सुभाशनगर बार्शी), कृष्णा जयराज रजपूत वय २९ (रा.सुभाषनगर बार्शी) या सहा जणांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलीसांना मिळालेल्या गुप्त सुचनेच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक गळगटे सपोनि ढोरे याचे पथकाने मुळे प्लॉट येथील नाकाडे यांचे घरी आचानक छापा टाकला या दरम्यान सदर संशयित सहा जण गोलाकार बसून मध्यभागी ५२ पत्ते रोख रक्कम ठेवुन तिरट नावाचा जुगार खेळत होती. पोलीसांनी सहा जणांना ताब्यात घेतले असुन नाकाडे यांनी सदर जुगार अड्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जुगार खेळत व खेळवीत असल्या प्रकरणी पोलीस उपनिरिक्षक यांनी फिर्याद दिली असून पुढील कारवाई सुरू आहे.या छाप्या दरम्यान शहर पोलीस ठाणेचे सपोनि ढोरे, पोहेकॉ घाडगे, पोकॉ जाधव पोकॉ नितनात, पोकॉ आकुलवार यांनी कामगिरी केली. या कारवाईने शहरात सुरू असलेले मटका गुटखा व्यवसायिक,कुंठणखाना चालवणारे लॉज चालक मालक,अवैध दारुविकी व्यवसायिक यांचे धाबे दणाणले आहेत.

## माळीनगर कारखान्याला भाजपाकडून सर्वोतपरी मदत करणार

### माजी आमदार राम सातपुते; माळीनगर फेस्टिव्हलचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ३ डिसेंबर-**

माळीनगर येथे चार दिवस चालणाऱ्या माळीनगर फेस्टिव्हलचे उद्घाटन माजी आमदार राम सातपुते यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे व एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन राजेंद्र गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर सतीश गिरमे, होल टाइम डायरेक्टर परेश राऊत, संचालक मोहन लांडे, निलकंठ भोंगळे,गणेश इनामके, राहुल गिरमे, विशाल जाधव, एज्युकेशन सोसायटीचे व्हा. चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी अजय गिरमे, खजिनदार ज्योती लांडगे, संचालक पृथ्वीराज भोंगळे, शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे, मल्टीस्टेटचे अध्यक्ष अमोल गिरमे उपस्थित होते. फेस्टिवलचे संस्थापक व मुख्य संयोजक राजेंद्र गिरमे यांच्या मार्गदर्शनाखाली फेस्टिवलचे नेटकेपणाने आयोजन करण्यात आले आहे.



फेस्टिवलचे १९ वे वर्ष आहे. उद्घाटनपर भाषणात माजी आमदार राम सातपुते म्हणाले माळीनगर सारख्या कारखान्याला भविष्यात भाजपाकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून कारखाना दत्तक घेत असल्याचे माझ्याजवळ त्यांनी सांगितले. राजेंद्र गिरमे यांनी कायम भाजपासाठी योगदान दिले आहे. आज मी आमदार नसलो तरी पुढच्या फेस्टिवलला आमदार म्हणून उद्घाटनासाठी येईल, असे सांगून विधान परिषदेवर घेतले जाणार असल्याचे संकेत दिले. कारखान्याच्या मागे सभासद या नात्याने मी कायम उभे राहणार आहे. माळीनगर कारखाना शेतकऱ्यांवर प्रेम करणारा आहे. राजेंद्र गिरमे एकतर्फी झुंज देऊन कारखान्याचे अडचणी ,जमिनीचे प्रश्न सोडवण्याचे काम करतात ते एका अर्थाने संघर्ष योध्दाच आहेत. या कारखान्याला आम्ही ताकद देणार आहोत. कोणतेही प्रश्न असो तुमच्याबरोबर कायम राहून ते सोडवून देणे हे आमचे कर्तव्य आहे. प्रारंभी स्वागत मोहन लांडे यांनी केले. तर आभार एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे यांनी मानले.

## धान्य दुकानदार संघटनेच्या निवेदनाला प्रशासनाकडून केराची टोपली

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ डिसेंबर-**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटनेकडुन सप्टेंबर २०२४ व ऑक्टोबर २०२४ या कालावधी मधील प्रलंबित असलेले मार्जिनची मागणी निवेदनाद्वारे पुरवठा उप आयुक्त पुणे, जिल्हाधिकारी सोलापूर, जिल्हा पुरवठा अधिकारी सोलापूर यांचा कडे दि.१३ नोव्हेंबर रोजी केली होती.

तसेच अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ पुणे राज्य संघटने कडून सुद्धा दि.२५ नोव्हेंबर रोजी अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र राज्यचे सचिव, सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांना या बाबत निवेदन देण्यात आले होते. परंतु या विषयी सोलापूर ग्रामीण जिल्हा मधील धान्य दुकानदार यांना अद्यापी प्रलंबित मार्जिन शासनाकडुन मिळाले नाही.

ना मार्जिन जमा झाले ना दफ्तर दिरंगाई करणारे अधिकारी कर्मचारी यांचा वर शिस्त पालान कारवाई करण्यात आली किंवा नाही. या बाबत संघटनेला साधे उलट टपाली पत्रव्यवहार सुद्धा प्रशासनाकडून न करता अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटनेचा निवेदनाला प्रशासनाकडून केराची टोपली दाखवण्यात आल्यामुळे सोलापुर ग्रामीण भागातील धान्य दुकानदार यांच्याकडुन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

> सोलापूर ग्रामीण भागातील धान्य दुकानदार यांना प्रलंबित मार्जिन मिळावे म्हणून दि.१३ नोव्हेंबर रोजी प्रशासनाकडे मागणी केली होती.व दि.२० रोजी मर्जीन बाबत महासंघ राज्य संघटने कडे तक्रार केली होती.त्या नंतर राज्य संघटनेकडून सुद्धा २५ नोव्हेंबर रोजी पुरवठा विभागा कडे निवेदन सादर केले होते.परंतु अद्याप दोन्ही निवेदनावर प्रशासनाकडून काही उत्तर न मिळाल्याने तसेच११ डिसेंबर पर्यंत मार्जिन जमा ना झाल्यास आम्ही महासंघ संघटनेचे सर्व तालुका अध्यक्ष उपाध्यक्ष शहराध्यक्ष व पदाधिकारी दि.११ डिसेंबर रोजी बैठक घेऊन पुढील आंदोलनाबाबत दिशा ठरवणार आहोत
>
> **- विजय मंडलिक, अध्यक्ष,**
> महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटना

## विनापरवाना डिजिटल लावल्याप्रकरणी ५ गुन्हे दाखल

### रोड डीवाईडर मधील लाईट पोल, सार्वजनिक ठिकाणी लावले डिजिटल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

शहरातील रोड डिव्हायडर मधील लाईट पोलला तसेच सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना डिजिटल होर्डिंग लावल्या प्रकरणी महापालिकेच्या माध्यमातून विविध पोलीस ठाण्यात पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सोलापूर शहरात महापालिका प्रशासनाकडून २ ते १२ डिसेंबर दरम्यान मुख्य रस्त्यांची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. मुख्य रस्ते, रोड डिव्हायडर, फुटपाथ व परिसराची स्वच्छता करण्यात येत आहे. दरम्यान शहरातील विविध ठिकाणी रोड डिव्हायडर मधील लाईट पोलला डिजिटल होर्डिंग तसेच विविध चौकांमध्ये गृह प्रकल्पाचे डिजिटल फलक महापालिका प्रशासनाची परवानगी न घेता लावण्यात आल्याचे निदर्शनास आले. महापालिका प्रशासनातर्फे ही बाब गांभीर्याने घेत विनापरवाना डिजिटल लावल्या प्रकरणी संबंधित धारकांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र मालमत्ता वीरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ कलम ३, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ कलम २२३ अन्वये विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात तीन तर फौजदार चावडी आणि सदर बाजार पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेचे संबंधित कनिष्ठ अभियंता, भूमापक यांनी वरिष्ठाच्या आदेशानुसार संबंधित पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार हे गुन्हे दाखल झाले आहेत.

सैफुल विजापूर रोड येथे रोड डिव्हायडर मधील लाईट पोलला प्लॉट विक्री संदर्भात पोस्टर लावल्याप्रकरणी श्रीज रियालिटी धारक, पारशी विहीर समोर रोशन प्राइड अपारमेंट लगत नई जिंदगी रोडवर डिजिटल लावल्याप्रकरणी , विजापूर रोडवरील संत रोहिदास चौक येथे डिव्हायडर मधील लाईट पोलला डिजिटल लावल्या प्रकरणी अज्ञात, न्यू पाच्छा पेठ ,समर्थ नगर येथे रस्त्यावर डिजिटल बॅनर लावले, दमानी नगर फुरडे कॉम्प्लेक्स या ठिकाणी डिजिटल फलक लावल्याप्रकरणी अशा पाच ठिकाणी विनापरवाना डिजिटल लावल्याचे निदर्शनास आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कुत्र्यावर विष प्रयोग कोणी केला? गुढ कायम

## नगर परिषदेकडे पाळीव कुत्र्याची नोंद नाही; भटकी मृत श्वानची संख्या वीस

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ डिसेंबर-**

अक्कलकोटमध्ये भटकी मृत २० श्वान आढळल्याचे नगर पालिकेकडून अधिकृत सांगत असले तरी हा आकडा अधिक असल्याचे बोलले जात आहे. मोठ्या प्रमाणात श्वान विष प्रयोगाद्वारे हत्या करण्याचे पाप कोणी केल हे जाणून बुजुन लपवल जात असल्याचा आरोप नागरिकातून केला जात आहे. नगरपालिकेने सत्य उजेडात आणण्याबाबत पोलिसांकडे धाव घेतली आहे. याचबरोबर श्वान पाळण्याबाबत नगरपालिकेची परवानगी घेण्याचे फर्मान प्रसिद्ध केले आहे. यामुळे नागरिकांमध्ये अंत्यत कार्यक्षम नगरपालिका कारभाराचे तोंडभरून कौतुक व्यक्त होत आहे. विशेषतः महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम २९३ व कलम २९४ अन्वये नोटीसीद्वारे अक्कलकोट शहरातील नागरिकांना सुचित केले बाबत शहरात उलट-सुलट चर्चा चालू आहे.

अक्कलकोट शहरामध्ये कुत्रे पाळत असताना कुत्र्याच्या गळ्यात मालकाचे नाव व पत्ता असलेला पट्टा किंवा नंबर असलेला बिल्ला असणे आवश्यक आहे.) शहरामध्ये कुत्रे पाळावयाचे असेल तर त्यासाठी नगरपरिषदेची रितसर परवानगी घेणे बंधनकारक राहील. कुत्रा रस्त्यावर असताना किंवा तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत असताना त्यास मुसकी बांधणे आवश्यक आहे. वरील तरतुदींचे पालन न झाल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम २९३ मधील मुद्दा क्र. २,३,४,५,६ अन्वये पुढील कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे . कलम २९४ अन्वये नगरपरिषदेच्या परवानगी शिवाय कोणतेही डुक्कर / वराह शहरामध्ये पाळता येणार नाही. शहरात विनापरवानगी पाळलेले अथवा भटके डुक्कर / वराह आढळ्यास कलम २९४ (३) अन्वये पुढील कारवाई करण्याचा इशारा ही प्रसिद्धी करणात दिलेला आहे.



### वसंत देडे यांनी केला निषेध

पाळीव श्वान बेकायदेशीर रित्या नष्ट केल्याचे कृत्य अंत्यत निंदनीय घृणास्पद मानवी खुना सारखेच क्रुर आहे, याचा तीव्र निषेध व्यक्त करतो. याबाबत नागरिकांचा रोष दडपण्यासाठी नागरिकांवर दबाब वाढविण्यासाठी नगर पालिकेने श्वान पाळावयाचे परवानगी व श्वान मालकाला लज्जा वाटेल अशी कुत्र्याच्या गळयात पट्टा अथवा नंबर असे अट प्रसिद्ध केले, असा आरोप लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यानी केला आहे. याचा आम्ही निषेध करतो असे म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शपथविधीला पंतप्रधान मोदी, शहांची उपस्थिती

## संत, महात्म्यांसह अनेक मान्यवर निमंत्रित

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.३ डिसेंबर,**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजपाच्या विधिमंडळ नेत्याची बुधवारी निवड होणार आहे. नवनिर्वाचित आमदारांची सकाळी दहा वाजता विधानभवनातील सेंट्रल हॉल मध्ये बैठक होणार आहे. त्याची मते आजमावून घेण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण व गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी हे निरीक्षक म्हणून मंगळवारी मुंबईत दाखल झाले आहेत. नेता निवडीनंतर लगेचच शिष्टमंडळ राज्यपालांना भेटून सत्ता स्थापन करण्यासाठी दावा दाखल करणार आहे.

मुख्यमंत्री पदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित आहे त्यावर उद्या शिक्कामोर्तब होईल असे सांगण्यात आले, दरम्यान, गुरुवारी होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी आजार मैदानावर जय्यत तयारी सुरू आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यासाठी भाजपाचे देशभरातील



ज्येष्ठ नेते व अनेक राज्याचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.

महायुतीच्या नेत्यांनी मंगळवारी मैदानाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतरही दहा दिवस उलटूनही अद्याप सरकार स्थापन करण्यात आलेली नाही एकनाथ शिंदे हे पुन्हा मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक असल्याने सुरुवातीची काही दिवस त्यांची समजूत काढण्यात गेले त्यानंतर त्यांनी गृह व अन्य महत्वपूर्ण खात्याची मागणी केल्याने भाजपाचा त्याला विरोध आहे. त्यामुळे खात्याबाबतच्या फॉर्मुल्यावर अद्याप बैठक झालेली नाही. काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदे हे दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्यानंतर मुंबईत ना थांबता दोन दिवस साताऱ्यात त्यांच्या दरे या जन्मगावी विश्रांतीसाठी गेले होते. त्या ठिकाणी तब्येत बिघडल्याने त्यांनी कोणत्याही बैठकीत सहभाग घेतलेला नव्हता रविवारी ठाण्यात परतल्यानंतर घशाचा संसर्ग व ताप असल्याने ते घरीच थांबून होते. त्यानंतर आज ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये जाऊन सर्व चाचण्या करून घेतल्या त्यामध्ये सर्व काही नॉर्मल असल्याचे प्रतिक्रिया त्यांनी पत्रकारांना दिली. दरम्यान गुरुवारी सायंकाळी पाच वाजता शपथविधी होणार असल्याने सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यावर बुधवारी विधानसभेचा नेता निवडल्यानंतर होईल असे भाजपाच्या गोटातून सांगण्यात आले. त्यासाठी भाजपाचे सर्व नवनिर्वाचित आमदार मुंबईत दाखल झाले आहेत.

शपथविधी सोहळ्यासाठी १९ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच सोहळ्याला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, सुशिलकुमार शिंदे यांना देखील निमंत्रीत केले जाणार आहे. तर केंद्र सरकारमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले यांच्यासह महत्वाचे केंद्रातील पाच मंत्री देखील या सोहळ्याला हजेरी लावणार आहेत.

### 'या' मुख्यमंत्र्यांना आमंत्रण

योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेश, चंद्राबाबू नायडू -, आंध्रप्रदेश, नितीन कुमार - बिहार, प्रेमा खांडू -, अरुणाचल प्रदेश हिमंत बिश्व शर्मा आसाम, विष्णूदेव साय - छत्तीसगढ,प्रमोद सावंत - गोवा,भूपेंद्र पटेल - गुजरात,नायब सिंह सैनी - हरियाणा,मोहन यादव - मध्य प्रदेश, कॉनराड संगमा - मेघालय, भजनलाल शर्मा - राजस्थान, मानिक साहा - त्रिपुरा, पुष्कर सिंह धामी - उत्तराखंड.

### निमंत्रित संत महंत

नरेंद्र महाराज नानीज, नामदेव शास्त्री, भगवानगड, राधानाथ स्वामी महाराज, गौरांगदास महाराज, इस्कॉन, जनार्दन हरीजी महाराज, प्रसाद महाराज अंमळनेरकर, महानुभाव संप्रदायाचे विध्वंस बाबा आणि मोहन महाराज जैन मुनी लोकेश.

### 'एक है तो सेफ है'चे १० हजार टी शर्ट

विधानसभा निवडणुकीत भाजपने 'एक है तो सेफ है'चा नारा दिला होता. आता महायुतीच्या शपथविधीतही 'एक है तो सेफ है' ही घोषणा लिहिलेले दहा हजार टी-शर्ट भाजप कार्यकर्ते परिधान करणार आहेत. यावेळी मराठी संगीतासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.

# भारताला हेलिकॉप्टर उपकरणांच्या विक्रीला मंजुरी

## बायडेन प्रशासनाचा महत्त्वाचा निर्णय

**वॉशिंग्टन, ३ डिसेंबर**

एमएच-६० आर हेलिकॉप्टरच्या उपकरणांची भारताला विक्री करण्यास मंजुरी देण्यात आल्याचे बायडेन प्रशासनाने काँग्रेसला अधिसूचित केले. ही विक्री १.१७ अब्ज डॉलर्सची आहे.

प्रस्तावित विक्रीमुळे पाणबुडीविरोधी युद्धक्षमता सुधारून वर्तमान आणि भविष्यातील धोके रोखण्यासाठी भारताची क्षमता सुधारेल, असे संरक्षण सुरक्षा सहकार्य एजन्सीने काँग्रेसला दिलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे. बायडेन प्रशासनाची भारताला प्रमुख संरक्षण उपकरणे विक्रीची मान्यता त्याच्या चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या काही आठवड्यांपूर्वी आली आहे. नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प २० जानेवारी रोजी अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष म्हणून शपथ घेणार आहेत. भारताने ३० मल्टिफंक्शनल इम्फर्मेशन डिस्ट्रिब्युशन सिस्टिम-जॉइंट टॅक्टिकल रेडिओ सिस्टिम्स (एमआयडीएस-जेटीआरएस) खरेदीसाठी विनंती केली होती.

त्यात प्रगत डेटा ट्रान्सफर सिस्टिमचाही समावेश होता. बाह्य इंधन टाक्या, एएन/एएएस ४४ सी (व्ही) फॉरवर्ड लुकिंग इन्फ्रारेड सिस्टिम, ऑपरेटर मशिन इंटरफेस असिसटंट, स्पेअर कंटेनर, सुविधा अभ्यास, बांधणी, उपकरणांची चाचणी, युद्धसामुग्रीचाही समावेश यात आहे. याचे प्रमुख कंत्राटदार लॉकहीड मार्टिन रोटरी आणि मिशन सिस्टिम्स असतील.

# बदायूं मशिदीखाली महादेव मंदिर असल्याचा दावा

## याचिकेवरील सुनावणी १० तारखेला

**लखनौ, ३ डिसेंबर**

बदायूं येथील शाही मशिदीच्या खाली नीलकंठ महादेवाचे मंदिर असल्याचा दावा हिंदू पक्षाने केला आहे. या प्रकरणात हिंदू पक्षाने कोर्टात याचिका दाखल केली. कोर्टाने याचिका स्वीकारली असून, यावर मंगळवारी सुनावणी होणार होती. मात्र ही सुनावणी पुढे ढकलली आहे. आता पुढील सुनावणी १० डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे सुनावणीदरम्यान काय समोर येते, हे पाहणे आवश्यक ठरणार आहे.

हिंदू महासभेने शम्सी शाही मशिद जिथे आहे, तिथे मशिदीच्या आधी नीलकंठ महादेवाचे मंदिर होते. त्यासंदर्भात पुरावे उपलब्ध असल्याचे म्हटले जात आहे. याच आधारावर या प्रकरणात हिंदू महासभेने याचिका दाखल केली. त्यावर १० तारखेला सुनावणी होणार आहे. या मशिदीच्या ठिकाणी नीलकंठ महादेवाचे मंदिर होते, याबाबत आमच्याकडे पुरावे असल्याचे वकिलांचे म्हणणे आहे. त्या ठिकाणी जी पूजा-अर्चना सुरू आहे, त्यात कोणतीही अडचण येऊ नये. आमच्याकडे जी कागदपत्रे आहेत, त्यावरून ही जागा मशिदीच्या मालकीची नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# सामूहिक हत्याकांडाचे मोहम्मद युनूसच सूत्रधार

## शेख हसीना यांचा गंभीर आरोप

**न्यूयॉर्क, ३ डिसेंबर**

बांगलादेश मधील सामूहिक हत्याकांड आणि अल्पसंख्यकांवरील हल्ल्याचे सूत्रधार अंतरिम सरकारचे नेतृत्व करणारे मुहम्मद युनूस हेच आहेत. त्यांनी विद्यार्थी समन्वयकांसह अत्यंत गौपनीयरीत्या देशात सामूहिक हत्या घडवून आणला, असा गंभीर आरोप माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी न्यू यॉर्कमध्ये अवामी लीगच्या कार्यक्रमाला आभासी स्वरूपात संबोधित करताना केला.

बांगालादेशातील मंदिरे, चर्च आणि इस्कॉन मंदिरांवर होणाऱ्या हल्ल्यांचा त्यांनी तीव्र शब्दांमध्ये निषेध केला.

बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. ५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांनी बांगलादेशमधून पलायन करून भारतात आश्रय घेतला. सध्या त्यांचे वास्तव्य भारतात आहे. न्यू यॉर्कमध्ये त्यांचा पक्ष अवामी लीगने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात त्या आभासी स्वरूपात सहभागी झाल्या. यावेळी त्या म्हणाल्या की, माझ्यावर बांगलादेशमधील सामूहिक हत्याकांडाचा आरोप केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात मुहम्मद युनूस यांनीच विद्यार्थी समन्वयकांसह अत्यंत गौपनीयरीत्या देशात सामूहिक हत्या घडवून आणल्या. तेच सामूहिक हत्याकांडाचे सूत्रधार आहेत.

माझे वडील शेख मुजिबुर रहमान यांच्याप्रमाणे माझी हत्या करण्याचा कट आखला गेला होता. मी स्वत:कडेच सत्ता ठेवली असती, तर बांगलादेशमध्ये नरसंहार झाला नसता.

माझी हत्या करण्यासाठी एक सशस्त्र जमाव पंतप्रधान भवनात आला होता; पण, मी माझ्या सुरक्षा रक्षकांना गोळीबार न करण्यास सांगितले. माझ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कायदा मोडणाऱ्यांवर गोळीबार केला असता, तर अनेक जणांचा बळी गेला असता. हिंसाचार टाळण्यासाठी मी देश सोडण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# १० वर्षांचा क्रिश अरोरा बनला 'ग्लोबल जिनियस'

**लंडन, ३ डिसेंबर**

वेस्ट लंडनच्या हॉन्सलो येथील अवघ्या १० वर्षांचा मूळ भारतीय क्रिश अरोरा आपल्या अद्वितीय बुद्धिमत्तेने आणि कर्तृत्वाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेत आहे. क्रिशने १६२ चा थक्क करणारा आयक्यू स्कोअर मिळवत अल्बर्ट आईनस्टाईन आणि स्टीफन हॉकिंग यांच्या अंदाजे १६० आयक्यू स्कोअरवर मात केली आहे. या अपवादात्मक यशामुळे त्याला जागतिक स्तरावरील उच्च आयक्यू समाज, मेन्सामध्ये स्थान मिळाले आहे.

क्रिशची अपवादात्मक बुद्धिमत्ता लहानपणापासूनच दिसत होती. चौथ्या वर्षी तो अस्खलितपणे वाचू शकत होता आणि जटिल गणितीय समस्या सहजपणे सोडवत होता. क्रिशचे आई-वडील, माऊली आणि निश्चल, जे स्वतः अभियांत्रिकी क्षेत्रात आहेत, त्यांनी लहान वयातच त्याच्या असामान्य क्षमतांकडे लक्ष दिले. तो वयाच्या अगदी लहान वयापासूनच स्पेलिंग आणि गणितात प्रवीण होता, असे त्याच्या पालकांनी सांगितले. क्रिशने आपल्या यशाबद्दल उत्साह व्यक्त केला. मेन्साची कठोर आयक्यू चाचणी, तर्कशक्ती आणि मानसिक चपळतेचे मापन करते.

## निलावती झंगे यांचे निधन



**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**

अणदूर (ता. तुळजापूर) येथील निलावती निलकंठ झंगे (वय ७५) यांचे मंगळवारी (दि.३) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. अंत्ययात्रा बुधवारी सकाळी नऊ वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे.

# पोलिसांसोबत बैठक झाल्यानंतर मारकडवाडी येथील मतदान स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी येथील गावकऱ्यांनी ईव्हीएमवर संशय घेत पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आता हा निर्णय मागे घेण्यात आला आहे. आज (दि. ३) सकाळीच मतपत्रिकेवर मतदान करण्यास गावकरी जमायला सुरुवातही झालेली, परंतु पोलिसांसोबत झालेल्या बैठकीनंतर ही मतदान प्रक्रिया थांबवण्यात आली. दरम्यान, या गावात जिल्हा प्रशासनाकडून १५ डिसेंबरपर्यंत जमावबंदीचा आदेश दिल्याने लोक आपल्या घरी गेल्याने वातावरण हळू-हळू निवळत जात आहे.

गाव पातळीवर मतदान करण्याचा प्रकार करू नये असे प्रशासनानं सांगितले होते. यामुळे गावकऱ्यांचा जो निष्पक्ष मतदानाचा उद्देश आहे. तो पूर्ण होणार नसल्याचा दावा यावेळी या मतदारसंघातील विजयी उमेदवार उत्तम जानकर यांनी केला. तर आता याबाबत तहसील कार्यालयावर मोठा मोर्चा काढण्याचे नियोजन असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. तर मारकडवाडी येथील या घडामोडींवर भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांनी चांगलेच तोंडसुख घेतले आहे. उत्तम जानकर हे तर या नाट्याचे केवळ प्यादे असून, घडामोडीं घडविणारा वेगळाच असल्याची टिकाही राम सातपुते यांनी केली. मारकडवाडीतून राम सातपुते यांना ८४३ तर उत्तम जानकरांना १००३ मतं मिळाली. गावकऱ्यांच्या दाव्यानुसार सातपुतेंना अपेक्षेपेक्षा जास्त मतं मिळाली आहेत. सातपुतेंना फक्त १०० ते १५० मते अपेक्षित होती. तर जानकरांना दीड हजार पेक्षा जास्त मतं अपेक्षित होती. हे सगळं ईव्हीएममध्ये घोळ करुन केल्याचा गावकऱ्यांना संशय आहे. त्यामुळेच बॅलेट पेपरवर पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आणि आज त्याची प्रक्रिया पार पडणार होती. मात्र पोलिस प्रशासनाबरोबर झालेल्या चर्चेमुळे मतदान प्रक्रिया टळली आहे.



### नाना पटोलेंकडून ग्रामस्थांचं कौतुक

विधानसभा निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडल्या नाहीत, अशी राज्यातील जनतेला शंका आहे. आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी सोलापूरच्या मारकडवाडी ग्रामस्थांनी आज (दि.३) मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती. पण प्रशासनाने जमावबंदी आदेश लागू करून, पोलिसी बळाचा वापर करून गावक-यांना मतदानापासून रोखले. मारकडवाडीमध्ये प्रशासन ब्रिटिशांप्रमाणे वागत आहे. मतदान प्रक्रियेत काही घोळ नाही तर प्रशासन एका छोट्या खेड्यात मतपत्रिकेद्वारे मतदान घ्यायला का घाबरत आहे? असाही प्रतिसवाल नाना पटोले यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

### या मतदारसंघात जानकर झाले होते विजयी

शरद पवार गटाचे उत्तमराव जानकर विधानसभा निवडणुकीत १३,१४७ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांना १,२१,७१३ मतं तर राम सातपुते यांना १,०८,५६६ मतं मिळाली आहेत.

### बिंग न फुटण्यासाठी मतदानास मज्जाव : नाना पटोले

विधानसभा निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडल्या नाहीत अशी राज्यातील जनतेला शंका असल्यानेच विविध मार्गाने ईव्हीएम व निवडणूक आयोगाच्या कारभाराचा पंचनामा जनता करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती पण पोलीस प्रशासनाने बळाचा वापर करून गावक-यांना मतदान करु दिले नाही. निवडणूक आयोगाचे बिंग फुटेल म्हणूनच गावकऱ्यांना मतपत्रिकेवर मतदान करु दिले नाही का?, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.




# भगवे वस्त्र घालू नका, माळा, टिळा नको

## बांगलादेशी हिंदूंना इस्कॉनचा सल्ला

**कोलकाता, ३ डिसेंबर**

बांगलादेशात हिंदू आणि इस्कॉनच्या पुजाऱ्यांविरोधात वाढत्या हिंसाचाराच्या घटना पाहता इस्कॉन कोलकाताने भगवे वस्त्र परिधान करू नका, गळ्यात माळा आणि कपाळाला टिळा लावू नका, असा सल्ला दिला.

हा सल्ला इस्कॉन कोलकाताचे उपाध्यक्ष राधारमण दास यांनी दिला आहे. ते म्हणाले की, मी बांगलादेशातील हिंदू तसेच इस्कॉनच्या सदस्यांना सांगू इच्छितो की, या संकटकाळात त्यांनी आपल्या सुरक्षेसाठी आणि संघर्षापासून वाचण्यासाठी खूप सतर्क राहायला हवे. त्यांनी भगवे कपडे घालणे टाळावे आणि कपाळावर टिळा लावू नये. त्यांना आपल्या श्रद्धेशी निगडीत माळा घालायच्या असतील, तर त्या कपड्याच्या आत राहतील, अशा पद्धतीने घातल्या पाहिजे. कोणीही साधूच्या रूपात सार्वजनिक ठिकाणी दिसू नये.

**त्रिपुरात बांगलादेशींना बंदी**

बांगलादेशात अल्पसंख्यक हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ त्रिपुरा राज्याने बांगलादेशींना हॉटेलमध्ये वास्तव्य आणि जेवण दोन्हींवर बंदी घातली आहे. काही दिवसांपूर्वी आगरतळा आणि कोलकात्यातील दोन मोठ्या रुग्णालयांनी बांगलादेशींच्या उपचारावर बंदी आणली होती. आता त्रिपुरातील हॉटेल्स बांगलादेशींना सेवा देण्यास साफ नकार देत आहेत. अगदी रेस्टॉरंटमध्ये त्यांना जेवणही देण्यास मज्जाव केला जात आहे.

# अतिरेक्यांना मदत करणाऱ्या दोन महिलांना अटक

जम्मू : जम्मू-काश्मिरातील उधमपूर जिल्ह्यात अतिरेक्यांना मदत करणाऱ्या दोन महिलांना मंगळवारी बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली. मरयमा बेगम आणि अर्शद बेगम अशी त्यांची नावे आहेत. मरयमा लोध्रा गावातील, तर अर्शद राय चक या बसंतगड परिसरातील रहिवासी आहेत. या दोघींकडून या क्षेत्राच्या सुरक्षेला धोका असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले, असे पोलिस प्रवक्त्याने सांगितले.

# चीनसोबत संबंध पूर्ववत करताना राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य

## लोकसभेत परराष्ट्र व्यवहार मंत्री जयशंकर यांचे निवेदन

**नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

चीनसोबतचे संबंध सुधारताना राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भारताची भूमिका असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज लोकसभेत निवेदन करताना स्पष्ट केले.

भारत चीन सीमेदरम्यानच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर एप्रिल २०२० पूर्वीची स्थिती बहाल करण्याचा निर्णय म्हणजे दोन देशांतील संबंध सुरळीत करण्याच्या दिशेन टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भारत-चीन संबंधांतील प्रगतीसाठी सीमा क्षेत्रात शांतता आणि सौहार्द प्रस्थापित करणे हे आवश्यक होते, असे जयशंकर म्हणाले.

भारत आणि चीन यांच्यात २१ ऑक्टोबरला झालेल्या कराराची तसेच यामुळे दोन देशातील संबंधात झालेल्या सुधारणांची माहिती देण्यासाठी निवेदन करताना जयशंकर म्हणाले की, भारत-चीन सीमेवर गेल्या काही महिन्यांत घडलेल्या घटना तसेच त्याचा दोन देशातील संबंधांवर झालेल्या परिणामांची सभागृहाला माहिती देण्यासाठी मी उभा आहे. २०२० पासून चीनसोबत आपले संबंध सुरळीत नव्हते. चीनच्या कारवायांमुळे सीमेवर शांतता तसेच सौहार्दभंग झाला होता. मात्र, गेल्या काही दिवसांतील भारताच्या मुत्सद्देगिरीच्या भूमिकेमुळे दोन देशातील संबंध सुरळीत होण्याची



प्रक्रिया सुरू झाली, असे ते म्हणाले.

१९६२ चा भारत-चीन संघर्ष तसेच त्या आधीच्या घटनाक्रमांमुळे चीनने अक्साई चीन भागातील ३८ हजार किमी भारतीय भूमीवर कब्जा केला आहे. याशिवाय पाकिस्तानने अवैधरीत्या भारताची ५,१८० चौरस किमी जमीनही चीनला सोपवली, जी १९४८ पासून त्याच्या ताब्यात होती, याकडे जयशंकर यांनी लक्ष वेधले. भारत-चीनदरम्यानचे मुद्दे सोडविण्यासाठी गेल्या अनेक दशकांपासून चीनसोबत वाटाघाटी होत होत्या. मात्र, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसह काही मुद्यांवर त्यांच्याशी आपली सहमती होऊ शकली नव्हती. चीनसोबतच्या सीमावादावर तोडगा काढण्यासाठी नि:ष्पक्ष तसेच परस्परमान्य अशा भूमिकेवर पोहोचण्यासाठी चीनसोबत द्विपक्षीय चर्चा करण्याची भारताची भूमिका आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**भेटींचे सत्र**

विविध पातळ्यांवर चीनशी चर्चा सुरू आहे. माझ्या पातळीवर मी चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांशी भेटलो. आपल्या संरक्षण मंत्र्यांनीही या मुद्यावर चीनच्या संरक्षण मंत्र्याशी चर्चा केली. आपले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार चीनमधील त्यांच्या समकक्ष अधिकाऱ्याला भेटले, असे स्पष्ट करीत जयशंकर म्हणाले की, चीनसोबतच्या सीमावादावर सहयोग आणि समन्वय कार्यशैलीने मुत्सद्देगिरीच्या पातळीवर तसेच दोन देशातील लष्करी अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली आहे. जून २०२० पासून मुत्सद्देगिरीच्या पातळीवर १७ तर लष्करी अधिकाऱ्याच्या पातळीवर २१ बैठकी आतापर्यंत झाल्या.

**मोदी-जिनपिंग चर्चेचे फलित**

कजना येथील ब्रिक्स शिखर संमेलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांची २३ ऑक्टोबरला भेट झाली. त्यात दोन देशातील संबंध पूर्ववत करण्याच्या भूमिकेचे स्वागत करण्यात आले तसेच दोन देशात परराष्ट्र मंत्री पातळीवरील चर्चा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला, याकडे त्यांनी प्रदीर्घ निवेदनातून लक्ष वेधले.

**जाहीर समन्स/नोटीस**

रे. मु. नं.२५३/२०२०
नि.नं. ११

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

**सौ. चंद्रकला गंगाराम माळी** -- वादी
**विरूध्द**
**दिलावर शाहू शेख, वगैरे** -- प्रतिवादी

प्रति,
**इन्नूस शाहू शेख,**
रा. मळेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर -- प्रतिवादी नं. ६
......... यांना

**ज्याअर्थी,**

सदरचा दावा यातील वादीने प्रतिवादीचे विरुध्द डिक्लेरेशन व निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी तुम्ही हजर राहावे म्हणून तुम्हांला वर दाव्यात नमूद केलेल्या वादी यास यास माहित असलेल्या वरील पत्त्यावर मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस पाठविले असता सदर समन्स / नोटीसीची बजावणी झालेली नाही, तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर राहत नसल्यामुळे त्याची डकवून बजावणी ही करता आली नाही. तुम्ही दाव्यात नमूद पत्त्यावर सध्या राहत नसून परगावी राहत असलेचा मे. बेलिफ यांचा रिपोर्ट आलेला आहे. त्यामुळे तुम्ही कोठे राहता तो नविन पत्ता मिळून आलेला नाही, त्यामुळे तुमचे विरुध्दचे सदर दाव्याचे समन्स/नोटीस न बजावता परत आलेली आहे.

त्याअर्थी,

तुम्ही प्रतिवादी नं. ६ यांनी सदर दाव्याचे कामी सदर जाहीर समन्स/नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमली ता. ५/१/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता मे. कोर्टात या दाव्याचे कामी स्वतः अगर कुलमुखत्यार यांचे मार्फत हजर राहून व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे याकामी दाखल करावे. तुम्ही सदर दाव्याचे कामी नेमलेले तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे कांही म्हणणे नाही, असे समजून मे. कोर्टाचे तुमचे विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागाहून तक्रार चालणार नाही.

कळावे हे जाहीर समन्स नोटीस मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिली. ता. २९/११/२४

**सही/-**
**लिपीक**

**सही/-**
**मा. सहाय्यक अधिक्षक, मा. दिवाणी न्यायालय, क. स्तर सो., बार्शी**

## अग्रलेख...

# पाकिस्तानच्या मार्गावर निघालेला बांगलादेश

शेख हसीना यांच्या विरोधातील कारस्थान यशस्वी झाल्यानंतर गेल्या चारेक महिन्यांपासून बांगलादेश एका वेगळ्या स्थितीतून जात आहे. हसीना यांना पदच्युत केल्यानंतरच्या काळात बहुसंख्यकांचा उन्माद वाढणे, अल्पसंख्यकांवर हल्ले होणे आणि या हल्ल्यांचा विरोध केला म्हणून इस्कॉन या सेवाभावी संघटनेचे नेते चिन्मय कृष्ण दास यांना अटक होणे, इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणी होणे, इस्कॉनच्या लोकांना कुठेही जाण्यास अटकाव करणे असे सारे अकल्पित वाटेल, असे बांगलादेशात घडू लागलेले आहे. इस्कॉनचा अपराध एवढाच की, त्या संघटनेने हिंदूंवरील अत्याचाराला संघटित विरोध दर्शविला आणि अल्पसंख्यकांना सरकारने संरक्षण द्यावे, अशी मागणी केली. बांगलादेशातून शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले. सध्या बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख नोबेल विजेते मोहम्मद युनूस हे आहेत. समाजाच्या शेवटच्या थरातील लोकांच्या आर्थिक सबलीकरणासाठी मायक्रो फायनान्सची संकल्पना मांडणारे हेच ते डॉ. मोहम्मद युनूस. हा माणूस अर्थशास्त्रात पीएच. डी. झालेला. त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार २००६ मध्ये मिळाला होता. पण, त्यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकारला बांगलादेशात शांतता प्रस्थापित करण्यात यश येताना दिसत नाही. बांगलादेशाची स्थापना ही प्रादेशिक व सांस्कृतिक ओळख तसेच धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांवर झाली होती. बंगाली मुस्लिमांना इतर प्रदेशातील मुस्लिमांच्या तुलनेत उदार मानले जाते. त्यांचे बांगला संस्कृती, खाद्य, वस्त्र प्रावरणे आणि रीतिरिवाज यावर प्रेम आहे. बांगलादेशाचे राष्ट्रगीत 'आमार शोनार बांगला' हे असून ते गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी लिहिलेले आहे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आल्यावर काही वर्षांनी बांगलादेशात पुन्हा धर्मवेडाने शिरकाव केला. सत्तांतरे झाली, लष्करी बंड झाले. गेल्या काही दशकांपासून शेख हसीना आणि खालिदा झिया या दोन महिलांभोवती बांगलादेशचे राजकारण फिरत असते. काही महिन्यांपूर्वी बांगलादेश अवामी लीगच्या नेत्या आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले. त्यांना देश सोडावा लागला. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या बेगम खालिदा झिया या शेख हसीना यांच्या राजकीय स्पर्धक-विरोधक. गेल्या २५-३० वर्षांपासून या दोघींनीच बांगलादेशचा कारभार चालविला आहे. एखाद्या मुस्लिमबहुल देशाचा कारभार दीर्घकाळ महिलांकडून चालविला जात असल्याचे बांगलादेश हे आशियातले एकमेव उदाहरण. आशियातला अल्पकालीन अपवाद म्हणजे पाकिस्तानच्या बेनझीर भुट्टो. १९७१ मध्ये भाषिक एकता, सांस्कृतिक अस्मिता आणि धर्मनिरपेक्षतेशी असलेली बांधिलकी या आदर्शांतून बांगलादेशचा जन्म झाला. १९७१ चा मुक्ती संग्राम हा केवळ स्वातंत्र्याचा लढा नव्हता तर सांस्कृतिक अस्मिता आणि धर्मनिरपेक्षता जपण्याची धडपडही होती. १९७२ च्या संविधानाने ही तत्त्वे अंगीकारली आणि बांगलादेशला धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक घोषित केले. बांगलादेशची सुरुवातीची वर्षे अल्पसंख्यक समुदायांना एकत्रित करण्यासाठी आणि धार्मिक भेदांपेक्षा सांस्कृतिक वारशाला महत्त्व देणारी प्रादेशिक व राष्ट्रीय ओळख निर्माण करण्यासाठी वापरली गेली. मात्र, लगेच तेथे राजकीय हत्यासत्रे, लष्करी उठावांची मालिका सुरू झाली. याउपरही आशियातील धर्मनिरपेक्ष तसेच प्रगतिशील मुस्लिम राष्ट्र ही ओळख बांगलादेशने दीर्घकाळ टिकविली. तयार कपड्यांसह एकूणच वस्त्रोद्योगात बांगलादेशने मोठी भरारी घेतली. अगदी अलिकडच्या काळापर्यंत वेगाने वाढत असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये बांगलादेशचा समावेश होता. एकीकडे पाकिस्तानमध्ये अंतर्गत कलह जोरात असल्यामुळे त्या देशाचा विकास ठप्प झालेला. अशात बांगलादेश विकसित होत होता आणि त्याचे कारण होते तेथे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे बऱ्यापैकी शांतता आणि स्थैर्य होते. ताज्या घडामोडी हे सांगतात की, बांगलादेशमधील शांतता आणि स्थैर्य भंग पावले आहे. त्यामागे गतकाळातील काही घटक कारण ठरले आहेत. एकीकडे औद्योगिक प्रगती सुरू असताना बहुसंख्यक वादाचा अनुनय करण्यासाठी बांगलादेशात मदरसा शिक्षणाला पाठबळ मिळू लागले. पुराणमतवादी विचारसरणीला प्रोत्साहन दिले जाऊ लागले. आर्थिक असमानता होतीच. ती हळूहळू दूर झाली असती. पण, कट्टरपंथीयांनी असमानतेचा वापर धार्मिक द्वेषाची पेरणी करण्यासाठी सुपीक जमीन म्हणून केला. त्यातून संघर्ष वाढले. हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चन यांसारख्या अल्पसंख्यक समुदायांना भेदभाव आणि हल्ल्यांना सामोरे जावे लागले. जातीय हिंसाचार वाढला. दुर्गापूजेदरम्यान हिंदू मंदिरांवरील हल्ले किंवा सेक्युलर ब्लॉगर्सच्या हत्या यासारख्या घटनांनी तेथील परिस्थिती चिघळत असल्याकडे आधीच अंगुलिनिर्देश केला होता. शेख हसीना यांना पदावरून घालवण्याची घटना हा दीर्घकाळ सुरू असलेल्या कटाचा शेवट नव्हता; तो मध्यंतर होता, हे आता स्पष्ट झाले आहे. कारण आता बांगलादेशात कुणीही प्रगती, अर्थकारणावर बोलत नाही. अल्पसंख्यकांच्या विरोधात बोलणे आणि त्यांच्यावर हल्ले करणे हा राष्ट्रप्रेमाचा पुरावा बनला आहे. महिलांच्या हक्कांवरही गदा आली आहे. खरे तर बांगलादेशने भारत आणि पाकिस्तान यांच्या उदाहरणांतून शिकावे, असे बरेच काही आहे. भारताची फाळणी धार्मिक मुद्यावर झाली होती. तरीही भारताने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा अंगीकार करून जागतिक स्तरावर नेता बनण्याएवढी प्रगती साध्य केली. धार्मिक आधारावर निर्माण झालेला पाकिस्तान मात्र फेल्ड स्टेट ठरला. बांगलादेशच्या निर्मितीत भारताची भूमिका होती. त्यामुळे त्या देशाचे भारताशी चांगले संबंध होते. अचानक त्या संबंधांत मिठाचा खडा पडल्यागत झाले. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारात प्रचंड वाढ झाली. भारतातही धार्मिक वैविध्य भरपूर आहे. लोकसंख्याही मोठी आहे. तरीही भारतीय संविधानानुसार राज्यशकट हाकले जात असल्यामुळे देशात शांतता, स्थैर्य आहे. ते असल्यामुळेच प्रगती आहे. भारताचे अनुकरण करणे बांगलादेशला शक्य होते. ते त्याने केले तोपर्यंत त्याचा विकास झाला. आता तो पाकिस्तानचे अनुकरण करायला निघाला असेल तर त्याचा विनाश ठरलेला आहे. याचे कारण असे की, कोणत्याही धर्माचा अतिरेक हा आधुनिक काळात प्रगतीचे मार्ग अवरुद्ध करतो. त्यातही इस्लामी कट्टरपंथी हे तर अडथळ्यांसाठीच ओळखले जातात. भारतात असोत, पाकिस्तानात असोत की बांगलादेशात; इस्लामी कट्टरपंथीयांना देशाविषयी आपुलकी वाटत नाही. त्यामुळे शांततामय सहजीवनाच्या तत्त्वावर त्यांचा विश्वास नसतो. बांगलादेशात जे काही घडते आहे, त्यावरून असे वाटते की, तो देश पाकिस्तानच्या मार्गावर निघालेला आहे. तसे झाले तर तिथली परिस्थिती आणखी बिकट होईल. म्हणायला घटनात्मक सुधारणा आणि सर्वसमावेशक धोरणांच्या निर्मितीची जबाबदारी अंतरिम सरकारकडे देण्यात आलेली आहे. मात्र, कट्टरपंथीयांचा दबाव कायम राहणार असेल तर अंतरिम सरकार फारसे काही करू शकेल, असे वाटत नाही. भारताने बांगलादेशच्या सरकारने अल्पसंख्यकांना संरक्षण देण्याचे आवाहन केलेले आहे. तरीही इस्कॉनसारख्या सेवाभावी संघटनेला दाबून टाकण्याचे प्रयत्न बांगलादेशात सुरूच आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांना, प्रचारकांना, समर्थकांना अटक करणे सुरू आहे. यातून शांतता कधीच निर्माण होऊ शकत नाही. शांततेचा मार्ग सामंजस्यातून जातो आणि सामंजस्य केवळ मोकळ्या चर्चेतून प्राप्त केले जाऊ शकते. अजूनही वेळ गेलेली नाही. बांगलादेशातील अंतरिम सरकारने पुढाकार घेऊन सर्वांत आधी अल्पसंख्यकांवरील हल्ले, हिंदूंवरील अत्याचार, इस्कॉनची मुस्कटदाबी हे सारे प्रकार थांबविले पाहिजेत. सर्वसमावेशकतेचे धोरण बांगलादेशसाठी नवे नाही. ते स्थापनेपासून तेथे अस्तित्वात होतेच. मध्यंतरी हा देश कट्टरपंथीयांमुळे भरकटला आणि आता विनाशाच्या काठावर पोहोचला आहे. धार्मिक वेडाचाराच्या अंधारडोहात उडी मारून स्वतःला कायमचे संपवून घ्यायचे की धर्मांधतेला गाडून नव्या प्रगतीच्या क्षितिजांकडे झेप घ्यायची, हे बांगलादेशच्या अंतरिम सरकारला आणि तिथल्या बहुसंख्यक मुस्लिमांना ठरवायचे आहे. अल्पसंख्यकांना मारणे आणि धाकात ठेवणे यातच बांगलादेशीयांना पुरुषार्थ वाटत असेल तर अल्लाहदेखील त्यांचे रक्षण करू शकत नाही, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. ▌

## प्रासंगिक

# आत्मक्लेश, आत्मपरीक्षण अन् आत्मवंचना!

**राहुल गोखले**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांनी राज्यातील महाविकास आघाडीसमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा केला असल्याने त्या आघाडीचे तिन्ही घटक पक्ष निकालांच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करीत आहेत, हे एक वेळ समजू शकते; कारण ते त्यांच्या बिथरलेपणाचे द्योतक आहे. तथापि, स्वतःस बिगर-राजकीय म्हणवून घेणारे समाजसेवक आणि लोकशाहीचे आपणच काय ते कैवारी असा दावा करणारे विश्लेषक व सामाजिक कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांच्या भूमिकेची री ओढण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे एक बरे झाले. या मंडळींच्या भूमिका वस्तुनिष्ठ नाहीत, हे पुन्हा एकदा उघड झाले. मतदान यंत्रांच्या मुद्यावरून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलेल्या के. ए. पॉल यांची जनहित याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी अतिशय मार्मिक आणि तितकीच तिखट टिप्पणी केली. 'तुम्ही हरलात की मतदान यंत्रांशी छेडछाड झालेली असते आणि तुम्ही जिंकलात की मतदान यंत्रांशी छेडछाड झालेली नसते' अशी टिप्पणी त्यांनी केली. पॉल यांना भारतातील मतदान यंत्रांद्वारे मतदानाची पद्धत का बदलायची आहे, असे विचारता पॉल यांनी 'आपण १५५ देशांचा प्रवास करून आलो आहोत आणि तेथे मतपत्रिकांवर मतदान घेण्यात येते' असा युक्तिवाद केला. तेव्हा 'भारताने वेगळा मार्ग का स्वीकारू नये?' असा प्रश्न न्यायालयाने पॉल यांना विचारला. त्यावर निवडणुकीतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी, असे कारण पॉल यांनी दिले. या युक्तिवादास काहीएक अर्थ नव्हता आणि त्यामुळे ती याचिका फेटाळून लावणे एवढाच पर्याय न्यायालयासमोर होता. असले उद्योग करून दिशाभूल करू पाहणारे पॉल एकटे नव्हेत.

पुण्यात समाजसेवक बाबा आढाव यांनी मतदान यंत्रांच्या विरोधात आत्मक्लेश उपोषण केले. मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला तो काँग्रेसच्या काळात. त्याच यंत्रांद्वारे मतदान होऊन काँग्रेस आणि बिगर भाजपा पक्ष २०१४ सालापर्यंत केंद्रासह राज्यांत सत्तेत येत होते. त्यावेळी मतदान यंत्रांत काही छेडछाड होत आहे, असे आढाव यांना वाटले नाही; ना त्यांच्या उपोषण स्थळी जमलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांना वाटले. आता केवळ भाजपाला सत्ता मिळत आहे म्हणून मतदान यंत्रांवर खापर फोडायचे हा केवळ दुटप्पीपणा नव्हे तर दांभिकपणा झाला. अर्थात समाजवादी आणि काँग्रेसजन असल्या दांभिकपणासाठीच ओळखले जात होते आणि जातात. आणिबाणीनंतर सत्तेत आलेल्या जनता पक्षाच्या सरकारला सुरुंग समाजवाद्यांमधीलच एका गटाने लावला होता. जनसंघाच्या सदस्यांच्या कथित दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा या हेकेखोर समाजवाद्यांनी त्यावेळी ऐरणीवर आणला होता. त्याने जनता पक्षाचे सरकार कोसळलेच; पण जो बिगर काँग्रेसवादाचा प्रयोग जुळवून आणलेला होता, त्याला कायमचा सुरुंग लागला. त्यानंतर अशी बिगर काँग्रेसवादाची मोट कधीच दिसली नाही. अर्थात प्रश्न तो नाही. प्रश्न आहे समाजवाद्यांच्या अगोचरपणाचा.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे निकाल इतके भिन्न कसे, असा प्रश्न याच समाजवाद्यांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नाचा एकच अर्थ; तो म्हणजे ते पूर्णपणे हतबल झाले आहेत. त्या अगतिकतेमुळे नेमके कोणते प्रश्न विचारायचे हेही त्यांना समजेनासे झाले आहे. याचे कारण हा बदललेला कल केवळ महाराष्ट्रात पाहायला मिळाला आहे असे नाही तर झारखंडमध्येदेखील तसेच घडले आहे. झारखंडमध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने १४ पैकी तब्बल ९ जागांवर विजय मिळविला होता. विधानसभा मतदारसंघांच्या फूटपट्टीवर भाजपा व मित्रपक्षांची सुमारे ५१ जागांवर आघाडी होती. मात्र, महाराष्ट्राबरोबरच झालेल्या विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा प्रणीत आघाडीने ५६ जागांवर विजय मिळवीत सत्ता प्राप्त केली; तर भाजपाला अवघ्या २१ जागा जिंकता आल्या. झारखंडमध्ये जनादेशात एवढा बदल कसा झाला असा प्रश्न या समाजवाद्यांपैकी किंवा त्यांच्या भोवती गोळा झालेल्यांपैकी कोणाला पडलेला नाही आणि पडला असल्यास तसा कोणी उपस्थित केलेला नाही.

महाराष्ट्रात मात्र असा कलबदल होणे म्हणजे 'सत्तामेव जयते' असा हा अतार्किक युक्तिवाद आहे. अर्थात हा केवळ अतार्किकपणा नव्हे किंवा खरोखरच लोकशाहीचा असणारा कळवळा तर मुळीच नव्हे, एवढा आटापिटा करूनदेखील आपण भाजपाचा वारू रोखू कसे शकलो नाही, ही ठसठस त्यातून जास्त डोकावते. जातिभेदापासून सर्व आयुधे भाजपाच्या विरोधात वापरूनदेखील भाजपाला १३२ जागांवर विजय मिळतो, हे पचनी पडणे कठीण असल्याने स्वतःची समजूत घालण्यासाठी आता मतदान यंत्रांवर खापर फोडणे, पुन्हा मतपत्रिकेवर मतदान घेण्यात यावे यासाठी सह्यांची मोहीम आखणे, उपोषण करणे इत्यादी उद्योग केले जात आहेत. अशाने या मंडळींचा केवळ दांभिकपणाच चव्हाट्यावर येतो आहे असे नाही तर त्यांचे हसे होत आहे. समाजवादी काय किंवा काँग्रेस काय अथवा काँग्रेसचे मित्रपक्ष काय; लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मात दिली तेव्हा मोदींच्या बहुमताला महाराष्ट्राने आळा घातल्याच्या उकळ्या याच मंडळींना फुटत होत्या. सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी येथे चपखल लागू पडते. लोकसभा निकालांमध्ये समाजवादी आणि काँग्रेस व मित्रपक्षांना राजकीय बदलाचा प्रारंभ दिसत होता; लोकशाहीचा विजय दिसत होता आणि भाजपाच्या घसरगुंडीची सुरुवात दिसत होती. आता अपेक्षाभंग झाल्याने मतदान यंत्रांचा हा विजय असल्याची आवई उठवली जात आहे. हा सगळा निव्वळ भंपकपणा आहे, यात शंका नाही. जनतेने आपल्याला नाकारले आहे हे स्वीकारून त्याच्या कारणांचा शोध घेण्याऐवजी असल्या रडकेपणात विरोधक धन्यता मानत आहेत. ते एकवेळ क्षम्य कारण पराभूत मनःस्थितीत त्यांच्याकडून उमदेपणाची अपेक्षा करता येणार नाही. प्रश्न स्वतःस समाजसेवक म्हणवून घेणाऱ्यांनी त्यात सामील व्हावे का हा एखाद्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लावणे, यात वरकरणी गैर काही नाही. त्यात प्रामाणिकपणा असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. मात्र त्यात सोयीस्करपणा असेल तर मात्र त्यामागील हेतूंवर प्रश्नचिन्ह लागल्याखेरीज राहत नाही. आपले आंदोलन भाजपाविरोधात आहे असे सकृद्दर्शनी भासवायचे नाही; आपला दृष्टिकोन व्यापक उद्दिष्टांसाठी आहे, असा दावा करायचा आणि प्रत्यक्षात २०१९ साली जनादेशाचा अवमान करणाऱ्यांच्या हस्तेच उपोषण सोडायचे हा विरोधाभास जनतेला समजत नाही, असे मानण्याचे कारण नाही. भाजपाला सत्ता मिळाली की लोकशाही धोक्यात येते आणि बिगर भाजपा पक्षांना सत्ता मिळाली की लोकशाही जिंकते, असा दुजाभाव करून आपण आपली वैचारिक दिवाळखोरीचे प्रदर्शन मांडत आहोत, याचे तरी भान राखणे गरजेचे. कोणीही आत्मक्लेश करून घेण्यास कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. पण ज्यांना आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे अशांच्याच गराड्यात ते करणे ही आत्मवंचना झाली! ▌

९८२२८२८८१९

## वेध

**गिरीश शेरेकर**

# आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची लगबग

लोकसभा निवडणुकीनंतर नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. आता कोरोनापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वेध लागले आहेत. सध्या निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. याच महिन्यात त्यावर सुनावणी होऊन निकाल आला तर येत्या मार्च महिन्यात या निवडणुका होतील, अशी चर्चा आहे. त्यामुळेच इच्छुकांची लगबग सुरू झाली आहे. आपल्या देशात कुठे ना कुठे वर्षभर कोणत्या ना कोणत्या निवडणुका सुरूच असतात. हा प्रकार कुठे तरी थांबावा म्हणून 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना पुढे आली. त्या अंतर्गत लोकसभा व सर्व विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचा मानस आहे तर स्थानिक स्वराज संस्थांया निवडणुकादेखील एकाच टप्प्यात व्हाव्यात, असे अनेकांना वाटते. दोन्ही संकल्पनांवर काम सुरू आहे. त्या संदर्भातला अहवाल माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीने सादर केला आहे. केंद्र सरकार त्यावर गंभीरतेने विचार करीत असून, त्या संदर्भातले विधेयक लोकसभेत येण्याची शक्यता आहे. हे विधेयक पारित झाल्यास वारंवार होणाऱ्या निवडणुकांच्या डोकेदुखीतून कर्मचाऱ्यांची सुटका होणार आहे. प्रशासकीय यंत्रणा पाच वर्षांतून एकदाच निवडणुकीत गुंतणार आहे. प्रशासकीय कामाला त्यातून गती मिळणार असून हा निर्णय लाखमोलाचा ठरणार आहे. नागरिकांनादेखील मोठा दिलासा त्यातून मिळेल.

प्रत्येक पक्षाला आपले संघटन मजबूत करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका फारच उपयोगी ठरत असतात. कार्यकर्त्यांची दमदार फळी तयार होऊन नवे नेतृत्व या निवडणुकांमधून समोर येत असते. या निवडणुकांची गेल्या तीन वर्षांपासून सर्वपक्षीय कार्यकर्ते आतुरतेने वाट पाहत आहे. ओबीसी आरक्षण, प्रभागांची संख्या व अन्य मुद्यांमुळे निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. त्यावर काही सुनावण्या झाल्या असून तारीख पे तारीख मिळत आहे. सदर प्रकरणावर याच महिन्यात पुन्हा सुनावणी होऊन निकाल येण्याची शक्यता आहे. राज्यात एकूण २८ हजार ८१३ ग्रामपंचायती आहेत. त्यातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका मध्यंतरी झाल्या होत्या. पण, राज्यातल्या २९ महानगर पालिका, २३२ नगर परिषदा, ३४ जिल्हा परिषदा, ३५५ पंचायत समित्यांच्या निवडणुका काही एक-दोन अपवाद वगळता थांबलेल्या आहेत. या निवडणुका आता लवकरच होतील, अशी चर्चा जोरात सुरू झाली आहे. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या तीन पक्षांना विधानसभेत चांगले यश मिळाल्याने या पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते उत्साहित आहेत. ते स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला लागले असून निवडणुका लवकर झाल्यास विधानसभेसारखा फायदा होऊ शकतो, अशी भावना या कार्यकर्त्यांची असल्याने त्यांचा निवडणुकांसाठी पाठपुरावा सुरू झाला आहे.

राज्यात भाजपाच्या नेतृत्वात नवे सरकार स्थापन झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचालींना वेग येऊ शकतो. महायुतीच्या मावळत्या सरकारने जो निर्णय घेतला होता, त्याच निर्णयानुसार प्रभाग रचना राहते की बदलते, याकडे आता लक्ष आहे. आरक्षणाचादेखील प्रश्न आहे. हे दोन्ही मुद्दे न्यायालयात चर्चेला आहेत. सर्व प्रश्न निकाली काढल्यावरच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा मार्ग मोकळा होणार आहे. जवळपास तीन वर्षांपासून थांबलेल्या या निवडणुका न्यायालयाचा आदेश होताच सरकारला घ्याव्या लागणार आहे. निर्णय झाल्यावर दहावी आणि बारावीच्या परीक्षा आटोपल्यावर या निवडणुका होऊ शकतात. सत्तेत बसणारे सरकार फार विलंब करणार नाही. कारण सध्या त्यांच्या बाजूने वातावरण आहे. त्याचा फायदा ते निश्चित घेण्याचा प्रयत्न करणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था थेट नागरिकांशी जुळलेल्या असतात. सर्वसामान्यांना ज्या प्राथमिक अडचणी येतात, त्या निकाली काढण्याचे कामच या संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडे व लोकप्रतिनिधींकडे असते. पण, तीन वर्षांपासून निवडणुकाच न झाल्यामुळे लोकप्रतिनिधी नाही. सर्व कारभार प्रशासकांच्या हाती आहे. जाब विचारणारा स्थानिक पातळीवरचा प्रतिनिधीच नसल्यामुळे कारभार सैरभैर झाला आहे. अधिकारी व कर्मचारी बिनधास्त आहेत. छोट्या छोट्या कामासाठी नागरिकांना हेलपाटे घ्यावे लागत आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मूलभूत सुविधांच्या अडचणी जास्त आहेत. एकदा लोकनियुक्त व्यवस्था उभी झाल्यास नागरिकांना आपल्या समस्या मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ मिळणार असल्याने निवडणुका आवश्यक आहेत. ▌

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# परंतु अन्न वाया दवडणे, हा धर्म नव्हे!

**प्रा. दिलीप जोशी**

आपल्या भारतीय संस्कृतीत अन्न हे पूर्णब्रह्म म्हणून ओळखले जाते. अन्नग्रहणाला 'उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' म्हटले आहे. श्रीमद्भगवद्गीतेत 'पचाम्यअन्नम् चतुर्विधम्- भक्ष्य, लेय्य, पेय्य, चोश्य' हे अन्नाचे प्रकार मीच पचवतो, हे भगवंतांनी सांगितले आहे. थोडक्यात भारतीय जीवन पद्धतीत अन्न हे देवस्वरूप आहे. पंचतत्त्वाची महत्त्वपूर्ण कडी आणि न्यूनं परिपूर्णता अन्न आहे.

सर्वांत प्रथम आकाशतत्त्व आहे. आकाशतत्त्वातून वायुतत्त्व निर्मिती आहे. वायुतत्त्वातून अग्नितत्त्व निर्माण झाले. अग्नीतून जलतत्त्व आणि जलतत्त्वातून पृथ्वीतत्त्व निर्माण झाले. पृथ्वीतत्त्वातून अन्न तयार झाले. थोडक्यात अन्न हे पंचतत्त्वाचा अर्क आहे. या अर्काचे मूर्तस्वरूप म्हणजे आपला देह आहे. आपला देह हा पंचतत्त्वांचा बनलेला आहे. म्हणजे पंचतत्त्वाचे स्थूलस्वरूप देह आहे.

जर अन्नाचे इतके महत्त्व आहे तर अन्नाकडे आपण 'पूर्णब्रह्म' म्हणून गांभीर्याने पाहतो का? तर, याचे उत्तर नाहीच येईल. जगात अजूनही अब्जावधी लोक दररोज उपाशी झोपतात. आपण रोज जे खरकटे टाकतो, त्यात किंवा शिळे अन्न म्हणून फेकून देतो, त्यात करोडो लोक जेवू शकतात. पण त्याकडे आपण अजिबात लक्ष देत नाही. आपली कुटुंब संख्या जितकी, तितक्या प्रमाणात आपण अन्न शिजवतो का? याचेही उत्तर नकारार्थीच येईल. एखाद्या दिवशी अंदाज चुकला तर आपण समजू शकतो. पण रोजच्या रोज पातेलेभरून भाज्या, पोळ्यांची थप्पी आणि भाताचे कुप्पे वाया जात असतील तर आपल्याला चिंतनाची गरज आहे.

घरातील शीतकपाट (फ्रिज) एकदा इमानदारीने उघडा आणि मनातून तपासा. खराब झालेले दही-दूध, सडलेला पालक, पिचलेले टमाटे, घट्ट वरण असे अनेक अन्नपदार्थ आठवडा आठवडा तसेच पडून असलेले दिसतील. म्हणजे अन्न खराब होऊ नये म्हणून फ्रिजमध्ये अनेक दिवस ठेवतात आणि मग खराब झाले म्हणून फेकून दिले जातात. फ्रिजच्या फ्रीजरबद्दल न बोललेले बरे. बर्फाने ओतप्रोत भरलेला फ्रीजर; बर्फात अडकलेले हिमक्रीम, पेय आणि बरेच काही. काही लक्षात येते का आपल्या?

दरवर्षी लोणचे घालण्याचा मिथ्याग्रह शेजारीण घालते म्हणून मी घातलेच पाहिजे म्हणून उगाच दिसता घाट करायचा आणि दोन-चार महिन्यांनी खराब झाले म्हणून रात्री चोरून कचराकुंडीत टाकून आमचे लोणचे चविष्ट झाले म्हणून 'संपले सर्व'ची दवंडी पिटायची. आग्रहपूर्वक फळफळावळ आणायची आणि दोन-चार दिवस न खाताच तसेच पडून राहतात आणि खराब झाले म्हणून फेकून द्यायचे. विशेषतः डाळिंब, सफरचंद, शेवटची दोन-चार केळी हमखास फेकून दिली जातात. चिरायचा, सोलायचा कंटाळा हे त्याचे कारण.

घरात अन्न तयार असून उगाच पिज्झा, मंच्युरियन किंवा हॉटेलातील पदार्थ आणायचे. ते पण पूर्ण न खाता सकाळी फेकून द्यायचे, रात्रीच्या उरलेल्या शिळ्या अन्नासोबत. अन्न आणि पैशाचा अपव्यय उगाच. धान्यसाठा हवा घरात म्हणून पोत्याने धान्य विकत घ्यायचे. त्याची काळजी न घेता तशीच साठवण करायची. दोन-तीन महिन्यांतच कीड लागली म्हणून त्यातले अर्धाधिक धान्य फेकून द्यायचे. कुरडया, खारोड्या, शेवया बनवायच्या; हल्ली विकत आणतात. त्या डब्यात घालून ठेवायच्या. त्या आहेत याचा विसर पडतो. काही दिवसांनी कुठल्या तरी कारणांनी डब्यापर्यंत आपण पोहोचतो. लक्षात येते की, अरे! याचा तर वास येतोय. मग काय! द्या फेकून. सातूचे पीठ, लाह्याचे पीठ, मेतकूट यांच्याबाबतीतही हेच होते. वर्षभरातील अन्नाचा विचार केला तर जवळजवळ ३० टक्के अन्न वरील प्रकारे वाया दवडतो आपण. याला समर्थांनी 'अधर्म' म्हटले आहे. पूर्वी आपल्याकडे म्हणायचे की, 'खाऊन माजा, टाकून माजू नका!' पूर्वीच्या काळी स्वयंपाकापूर्वी अंदाज घेतला जायचा. त्यानुसार स्वयंपाक केला जायचा. एकत्रित भोजन घेतले जायचे. अन्नपूर्णा असायची. एक माणूस जेवू शकेल इतके अन्न घरात असायचे, पण वाया जाईल इतके शिजत नसे. आणि चुकलाच अंदाज एखादवेळी तर दुसरे दिवशी 'शिळीसप्तमी' असायची. म्हणजे भात उरला तर त्याला फोडणी देऊन चमचमीत फोडणीचा भात बनायचा. पोळ्या उरल्या तर तुकडे बनवले जायचे. त्या पदार्थातील शिळेपणा मारून टाकला जायचा. ते खाण्यातही किती उल्हास असायचा. उल्हास गृहिणीमध्येही आणि खाणाऱ्या कुटुंबीयांमध्येही असायचा. दुर्दैवाने हा उल्हास घराबाहेर कुठेतरी हरवला. 'गाडीवाला आया घरसे कचरा निकाल' हा भोंगा कानावर पडताच शिळे पदार्थ वापरात आणण्यापेक्षा फेकून देण्याचीच घाई. लक्षात ठेवा! लग्न समारंभादी विविध कार्यक्रमांत होणारी अन्नाची नासाडी न बघवता येणारी आहे. रेल्वे किंवा इतर प्रवासात खाणे कमी आणि फेकून अधिक देतात माणसे. अन्न पूर्णब्रह्म आहे. त्याचा आदर करा. अजूनही दुर्गम भागात मागून आणलेल्या पोळ्या-भाकरी उन्हात सुकविल्या जातात. वर्षभर त्याच भाकरी शिजवून खाल्ल्या जातात. इतकी बिकट स्थिती अन्नाची आहे. अनेक जण अन्नान्न जीवन जगत आहेत जगात.

अन्न सुरक्षा निर्देशांकात भारत ११३ प्रमुख राष्ट्रांतून ६८ व्या क्रमांकावर आहे. वैश्विक उपासमारीत भारत १२५ प्रमुख देशांपैकी १११ व्या क्रमांकावर आहे. भारतात १९५ दशलक्ष कुपोषित बालके आहेत. बिकट स्थिती त्यांच्यावर आहे. आपल्यावर जर ही स्थिती नसेल तर देवाची कृपा समजा. आपल्या घरातील अन्नाचा कणही वाया जाणार नाही, याची काळजी घ्या.

स्वयंपाक करताना घरातील सर्व यथेच्छ जेवले पाहिजेत याची काळजी घ्या; पण जेवढे आवश्यक तितकेच शिजवा. फळफळावळ जरूर आणा, पण ती फळे केवळ चिरण्याचा कंटाळा म्हणून वाया जातात. कुणीतरी पुढाकार घेऊन चिरली पाहिजेत; विशेषतः डाळिंब फोडून दाणे काढून त्यावर चव म्हणून मीठ-साखर घालून सर्वांना खायला दिली पाहिजे. लोणची दररोजच्या जेवणात आवर्जून ठेवा म्हणजे ती वापरात येतील. कुरडया, खारोड्या, सातू हे पदार्थ एकत्रित बसून त्याचा आस्वाद घ्या. हे पदार्थ वाया जातात. कारण त्याची प्रक्रिया कंटाळवाणी आहे. गप्पाटप्पांनी ती आनंददायी होते.

धान्य साठवण योग्य प्रक्रिया करून ठेवा नाहीतर महिन्याला एकेक कट्टा आणा. आजकाल साठवणुकीची गरज नाही. पदार्थ बनविताना 'तुम करते म्हणून हम करते' असा भाव नको. घरातील सदस्यांना काय आवडते ते बनवा. उगाच शेजारणीशी मिथ्या शर्यत नको. लग्न समारंभात तर सर्वांनी खूप काळजी घेतली पाहिजे.

एका हॉटेलने नियमच केला की, ताटात टाकाल तर दंड आणि टाकलेले अन्न घरी घेऊन जा! जगात अनेकांना खायला मिळत नाही आणि आपला अन्न टाकून माज असतो. वाया घालविल्याचे जराही दुःख, लाज-शरम, चुकल्याची भावना आपल्या चेहऱ्यावर नसते. उलट त्याचा गर्व आणि अभिमान वाटतो कित्येकांना. हे पशुवत् वागणे आहे. आपण जर महिन्यातून एक दिवस उपवास धरला तर जगातील अब्जावधी माणसे पोट भरून जेवू शकतात. उपवास जाऊ द्या, पण काटकसर तर करा. म्हणूनच समर्थ रामदासांनी आपल्याला खडसावले...

*आपण यथेच्छ जेवणे । उरले ते वाटणे ॥*
*परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ॥* ▌

९८२२२६२७३५

### पथदिव्यांची शोकांतिका

नागपूरमध्ये नवनवीन पद्धतीने सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. त्यात महत्त्वाचा वाटा पथदिव्यांचा आहे. त्यामुळे रात्री परिसर सुंदर दिसतो व नागरिकांची सोय होते. पण त्या पथदिव्यांची दुरुस्ती व देखभाल होत नसल्याने सुशोभीकरणाचे तीनतेरा वाजले आहेत. उदाहरणार्थ प्राईड हॉटेल ते चिंचभुवन बसस्टॉपपर्यंत जवळपास १५० ते २०० पथदिवे आहेत पण ते सुरू नसतात. खांबांवरील दिवे गायब आहेत. जूने काढून नवीन आकर्षक खांब लावले पण ते फक्त देखावा आहे त्यावरील दिवे नसतात किंवा बंद आहेत. इतका पैसा खर्च होतो पण नागरिकांना काहीच फायदा नाही. वरून सरकारची बदनामी होते. चिंचभुवन पुलावरील पथदिवे नागपूर महानगर पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग या तीन संस्थांच्या भांडणात दुरुस्तीची वाट पाहत आहे. चिंचभुवन परिसरातील नागरिक किती काळ अंधारात चाचपडत राहतील, हा प्रश्नच आहे. याकडे अधिकारी लक्ष देतील अशी अपेक्षा आहे.

**आनंद हरकरे**/९४०३२११२२८

### शत्रूसुद्धा शिवरायांसारखा असावा


निवडणुकीच्या निकालाच्या निमित्ताने जी गरळ विरोधकांकडून ओकली जात आहे ती ऐकल्यावर औरंगजेबाच्या शब्दांची आठवण होते, तो म्हणाला होता, शत्रूसुद्धा शिवासारखा असावा, याचा बोध सध्याचे विरोधक घेतील का? मशाल विझली, तुतारीचे सूर थांबले, हिंदू जागा झाला आणि तलवारी तळपू लागल्या. हिरव्या फूत्कारांचा पराभव झाला, कर्ण पांडव असताना सुद्धा दुर्दैवाने दुर्योधनाचा मित्र बनून कौरवांच्या पक्षाला मिळाला आणि सर्व विद्या फुकट जाऊन तो मारला गेला हा महाभारताचा इतिहास आहे. पैशाने विकत घेता येते हा भ्रमाचा भोपळा मतदारांनीच फोडला. शेंडी-जानव्याच्या वाटेला गेले आणि संतांचा अपमान केला की भट, ब्राह्मणांचा परशुरामही होतो हेच या निकालातून स्पष्ट झाले. लाचार चाणक्य हिरव्याची तरफदारी करतो तेव्हा तो फक्त १०-२० जागांवरच विजयी होतो हेसुद्धा स्पष्टपणे दिसले. काफिरांना पंधरा मिनिटात कापून काढण्याची भाषा करणारे ओवैसी यांनीही औरंगजेबापासून बोध घ्यावा. वडिलोपार्जित हिंदुत्व सोडल्यामुळेच पराभव झाला हे आता तरी उद्धव ठाकरे मान्य करतील का? पाच टक्के मतदान वाढल्यामुळे सिंहाने फक्त शेपटी हलवून आयाळीवरची माशी बेशुद्ध पाडली आहे, जर संपूर्ण हिंदू निद्रेतून जागा झाला तर काय घडेल? याचे चिंतन महाआघाडीने केले तरच विरोधी नेते म्हणून तरी सभागृहात बसण्याची संधी प्राप्त होईल अन्यथा भविष्य ना उरले हाती, अशी झाली दुर्गती आणि सत्ताधारी श्रीराम सतत गर्जती हे बघण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### प्लॅस्टिक कप टाळावेत

प्लॅस्टिक कपमधील चहा आरोग्यास हानिकारक असल्याचे अनेक वेळा वाचण्यात आले आहे. परंतु आजही अनेक हॉटेल्स, टपरीमध्ये ग्राहकास प्लॅस्टिक कपातच चहा



दिला जातो. हॉटेल, टपरीमालक यांनाही हे चांगल्या प्रकारे माहीत असताना देखील ते प्लॅस्टिक कपच का वापरतात, हेच समजत नाही. हॉटेलमालक आणि हॉटेलमधील नोकरांच्या अज्ञानामुळे हे घडत असेल तर आता चहा पिणारे ग्राहकच मोठ्या प्रमाणात जागरूक होणे आवश्यक आहे. प्लॅस्टिककपातील चहा आरोग्यास हानिकारक आहे. याचा चहा पिणाऱ्या प्रत्येक ग्राहकाने जाणीवपूर्वक विचार करून केवळ चिनी मातीतील कपातच चहा विक्रीसाठी हॉटेल, टपरीचालकास प्रवृत्त करावे. केवळ चहा पिणाऱ्या ग्राहकावरच हे अवलंबून आहे. चहा पिणाऱ्यांनी तातडीने चिनी मातीच्या कपाचा आग्रह धरावा. आपले आरोग्य सांभाळावे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### मविआचे विकासाकडे दुर्लक्ष, ईव्हीएमकडे लक्ष

नुकतेच विधानसभा निवडणुकीचे निकाल जनतेसमोर आले असून, त्यांचा कल ज्याकडे होता ते विधानसभा निवडणुकीत दिसून आले आणि जनतेचे उमेदवार विजयी झाले. त्यामुळे महायुतीला त्यात बहुमत प्राप्त झाले परंतु निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बहुतांश उमेदवारांना पराभूत व्हावे लागल्याने त्यांनी ईव्हीएम यंत्रावर आक्षेप घेतला आणि आंदोलन उभारले. सत्ताप्राप्तीसाठी राज्यभर आंदोलन छेडले जात आहे. निवडणूक ही मतदारांच्या पसंतीनुसार होते. ज्याकडे त्यांचा कल असतो तेच उमेदवार निवडून येतात. प्रत्यक्ष मतदान आधारावर जय-पराजय होत असतो याची जाणीव असून देखील विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाल्याने त्यांनी मतदान यंत्रावर आक्षेप घेतला आहे. त्यांचे विकासाकडे, जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाले आणि पराभवाचे तोंड पाहावे लागले. ▌

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### पत्नीकडून पतीला लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**

पत्नीकडून पतीला लाथाबुक्क्याने मारहाण केली. शिवाजी सिध्दप्पा नरळे (वय ४९, रा. उध्दव नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) असे जखमी पतीचे नाव आहे. ३ डिसेंबर रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास राहत्या घरी घरगुती कारणावरून शिवाजी नरळे यांच्या पत्नीने शिवाजी नरळेला लाथाबुक्क्याने मारहाण करून ढकलून दिले. त्यामध्ये शिवाजी यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पूर्व वैमनस्यातून तरूणास रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**

पूर्व वैमनस्यातून तरूणास लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. शोएब उबेदली खतीब (वय २०, रा. शास्त्री नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३ डिसेंबर रोजी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास मौलाली चौकातील सेंट्रल हॉस्पीटलसमोर काल झालेल्या भांडणाचा राग मनात धरून शोएब खतीब यास मुर्तुज गोट्यालकर, अय्युब कोतकुंडे व इतर ५ जणांनी मिळून फायटर, लाकडाने तसेच लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. शोएब खतीब यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात स्वार जखमी झाला. दत्तात्रय माणिक शिंदे (वय ४०, रा. खेड, ता. उत्तर सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३ डिसेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास दत्तात्रय शिंदे हे लांबोटी येथून खेडकडे दुचाकीवरून येत होते. त्यावेळी कोंडीजवळील फुरडे कलेक्शनजवळ कुत्रा आडवा आल्याने शिंदे यांची दुचाकी घसरली व अपघात झाला. यामध्ये शिंदे यांच्या हाता-पायास जबर जखमा झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### साप चावलेल्या तरूणाचा उपचारावेळी मृत्यू

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**

सोलापूर - साप चावलेल्या तरूणाचा उपचारावेळी मृत्यू झाला. आण्णासाहेब दिगंबर आलदर (वय २९, रा. पुळुज, ता. पंढरपूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. १ डिसेंबर रोजी सकाळी आण्णासाहेब आलदर हा स्वतःच्या शेतात काम करीत असताना ऊसाच्या पिकातून अचानक साप येऊन आलदर यास दंश केला. त्यामुळे आलदर यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचार सुरु असताना ३ डिसेंबरला पहाटेच्या सुमारास आलदर याचा मृत्यू झाला. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## निधन वृत्त...

### महावितरणचे कार्यकारी संचालक सुनिल पावडे

**बारामती, दि. ३ डिसेंबर -**



महावितरणचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) सुनिल रंगनाथ पावडे (वय ५४ वर्षे) यांचे सोमवारी रात्री जळगाव येथे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुख:द निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पारनेर (जि. अहिल्यानगर) तालुक्यातील दरोडी या त्यांच्या मूळ गावी बुधवारी (दि. ४) सकाळी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. पावडे यांच्या पश्चात त्यांची पत्नी निशिगंधा, मुलगी मृणाल व मुलगा सोहम असा परिवार आहे.

### प्रा. सुनीला नुलकर

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**



दयानंद शिक्षण संकुलामधील बीएड महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापिका सुनीला नुलकर (वय ९२) यांचे दि.३ डिसेंबर रोजी पहाटे ४ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ज्येष्ठ पत्रकार स्वर्गीय प्रभाकर नुलकर यांच्या पत्नी तर इतिहास संशोधक डॉ. सत्यव्रत नुलकर यांच्या मातोश्री होत. मरणोत्तर नूलकर फॅमिलीनी मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांना अभ्यास करता यावा म्हणून त्यांचे देहदान केले आहे.

### चारुशीला कुलकर्णी

**बार्शी, दि.३ डिसेंबर**



वैरागच्या विद्यामंदिर कन्या प्रशालेतील गणित आणि शास्त्र विषयाच्या नामवंत माजी शिक्षिका चारुशीला पंडितराव कुलकर्णी यांचे सोलापूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मुकुंदराज कुलकर्णी आणि प्रा. संजय कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

### बन्सीलाल फत्तेवाले

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर**



सोलापूर लोधी समाजातील कुशल उद्योजक कै. बन्सीलाल भगवानसिंग फत्तेवाले (वय-७८ रा. बालाजी सोसायटी, कुमठा नाका), सोलापूर यांचे शुक्रवार २२ नोव्हेंबर रोजी निधन झाले होते. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, भाऊ, बहिण असा मोठा एकत्रित परिवार आहे. त्यांचा तेरावा क्रियाविधी बुधवार ४ डिसेंबर रोजी आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM Re-Tender 4th call Notice**

Digitally signed online bids are invited through Re-tender (4th call) process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000033383 RE-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:13/2024-2025**, (4th call) **Particulars: -** Work of replacement of existing old 220 kV & 132 kV Coupling Capacitor by new 220 kV & 132 kV Coupling Capacitors at various EHV Substation under EHV O&M Circle Solapur, Estimated **cost:** Rs. 19,60,681/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost): Rs** 19,606/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 02.12.2024 to 12.12.2024 **Last Date of Submission:** 12.12.2024 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 13.12.2024 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

# ‘जीनोम टू ओम’ विज्ञानाकडून मेटासायन्सचे संक्रमण शोधतो

## यूजीसीचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन




**पुणे, दि.३ डिसेंबर-**

''आधुनिक आणि तंत्रज्ञानातील नेत्रदीपक प्रगती मुळे आपले जीवन अधिक आरामदायी बनले आहे. परंतु ते अधिक निरोगी किंवा शांततेचे नाही. जीनोम टू ओम हे आधुनिक विज्ञानाकडून मेटासायन्सकडे इच्छित संक्रमण शोधून काढतो. जीवनाच्या सर्व पैलूंमधील परस्परसंबंध ओळखून नैतिक आणि आध्यात्मिक अंतदृष्टी यांचे मिश्रण करते. हे सर्वांगीण वैज्ञानिक दृष्टिकोनावर जोर देते.'' असे विचार यूजीसीचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने युनेस्को अध्यासना अंतर्गत आयोजित २९वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेत ‘जीनोम टू ओम’ या विषयावर ते बोलत होते. सत्राच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते. तसेच डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस व २९ व्या तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमालेचे समन्वयक व प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, डॉ. चौधरी व डॉ.अनिल हिवाळे उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले,'' जीनोम गतिशील आधुनिक विज्ञानाचे प्रतिनिधित्व करतो तर ओम वैश्विक चेतनेला अंतिम वास्तव म्हणून मूर्त रूप देतो. हे पुस्तक प्रायोगिक ज्ञान आणि उच्च शहाणपणा यांच्यातील अंतर भरून काढण्याचा एक प्रयत्न आहे. जीनोम टू ओम हे मेटा सोसायटीच्या अर्थपूर्ण प्रगतीची आशा देते आणि वैज्ञानिक प्रगती आणि कालातील मानवी मूल्ये यांच्यात सामंजस्याने पुढे जाण्याची आशा देते. तसेच सार्वत्रिक शांतता आणि कल्याणासाठी विविधतेमध्ये एकता शोधण्याच्या आपल्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी आणि प्रवास सुरू ठेवण्यासाठी जीवनाचा ओम मार्ग आहे.''

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,'' मन आणि आत्मा या गोष्टींचे अधिक चिंतन होणे गरजेचे आहे. जीवनाचा हेतू व कर्तव्य काय आहे याची जाणिव यातून होते. सृष्टीवरील सर्व धर्म हे मानवाला कसे जगावे आणि कसे जगू नये याची शिकवण देतात. ओम यामध्ये संपूर्ण विश्वाचे ज्ञान समावलेले आहे.''

तत्पूर्वी प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी प्रेम आणि विश्वास या गोष्टीवर भर देऊन आज प्रत्येकाला प्रेमाची गरज का आहे हे सांगितले. प्रेमाच्या भावनेने शरीरात होणाऱ्या हालचालीचे विस्तृतीकरण केले. त्यामुळे व्यक्तीची मन स्थिती किती उत्तम राहते हे समजावले. सूत्रसंचालन डॉ. मिलिंद पात्रे आणि डॉ. यांनी आभार मानले.

# भुमि अभिलेखाच्या अधिकाऱ्यांना अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**



येथील भुमि अभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक नितीन सावंत, शिरस्तेदार मकरंद काडगावकर, छाननी लिपीक श्रीशैल काळे यांची भुमि अभिलेख प्रकरणामध्ये बेकायदेशीरपणे मोजणी करून पोट हिस्सा मंजूर केल्याबद्दलच्या गुन्ह्यामध्ये अतिरिक्त सत्र न्यायाधिश जे.जे. मोहिते यांनी सशर्त अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

यातील फिर्यादी एस.व्ही. पोतदार यांनी सोलापूर हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील बिनशेती खुली जागा सर्व्हे नं. ३०६/१ यासी नवीन सव्र्हे नं. १५४/१ या जागेचे एकूण क्षेत्र ४ हे. ७६ आर. या मिळकतीवर पोतदार व त्यांचे ५ चुलत भाऊ असे एकूण ६ जणांचे वारसा हक्काने मालकी आहे. त्यासंदर्भात अर्जदार अप्पासाहेब भोपळे यांना मोजणी मागण्याचा अधिकार नाही, प्रकरणाची कोणतीही कल्पना अथवा नोटीस न देता फिर्यादी यांचे गैरहजेरीत वर नमूद मिळकतीचा परस्पर मोजणी करून यातील संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करून इतर मिळकत धारकांना त्याचा फायदा करून दिला, अशी फिर्याद सदर बझार पोलिस ठाण्यात दिली होती.

सदर प्रकरणी भुमि अभिलेख अधिकारी नितीन सावंत, मकरंद काडगावकर, श्रीशैल काळे यांनी अटकपूर्व जामीन मिळणेकामी अर्ज दाखल केला. या अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपींनी कोणतीही बनावट कृत्ये केलेली नाहीत व त्यांना पोलीस कोठडीची आवश्यता नाही व आरोपी हे पोलीसांना तपासकामात सहकार्य करतील असा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांनी केला. हा युक्तिवाद विचारात घेऊन सत्र न्यायालयाने आरोपींना पोलीस ठाण्यात दर रविवारी हजेरी लावण्याच्या अटीवर सशर्त अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

याकामी आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. रणजीत चौधरी, ॲड. प्रणव उपाध्ये यांनी काम पाहिले.




# महापालिकेतील अधीक्षक दोंतुल यांचा सेवा निवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**


महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल हे ३६ वर्ष प्रदीर्घ सेवेनंतर स्वेच्छानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती बद्दल आज महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. गेल्या दोन वर्षापासून दोंतुल यांच्याकडे महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यालयीन अधीक्षकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यांनी या विभागाची जबाबदारी नियोजनपूर्वक आणि नेटक्या पद्धतीने सांभाळली. महापालिकेच्या वतीने गुणवंत अधिकारी म्हणूनही त्यांचा गौरव करण्यात आला होता.

महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्याकडे स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज सादर केला होता. अखेर या अर्जास महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली. महापालिकेत दोंतूल यांनी प्रदीर्घ अशी ३६ वर्ष ७ महिने सेवा बजावली आहे. सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा निरोप सत्कार समारंभ पार पडला. महापालिका आयुक्तांनी त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मुख्य सफाई अधीक्षक एन. सी.बिराजदार यांच्या हस्तेही त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आरोग्य निरीक्षक संघटनेच्या वतीने मुख्य आरोग्य निरीक्षक सुधाकर नागटिळक, नागेश मेंडगुळे, गोटे, अन्वर शेख, बाबासाहेब इंगळे, आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट, अशोक पाटील यांनी सत्कार केला. तसेच महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे यांनीही दोंतुल यांचा सत्कार केला.

# पोलिस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. ३ डिसेंबर -**



सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातील १३ पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय स्तरावर अंतर्गत बदल्या करण्याचे आदेश पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी दिले आहेत.

यात नव्याने हजर झालेले पोलीस निरीक्षक दत्तात्रय कोकरे यांची नियंत्रण कक्षात, पोलीस निरीक्षक संतोष कोकरे यांची आर्थिक गुन्हे शाखेत, सहायक पोलीस निरीक्षक श्रीगणेश कवितके यांची आर्थिक गुन्हे शाखेत, सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे यांची आर्थिक गुन्हे शाखेतून गुन्हे शाखेकडे, सहायक पोलीस निरीक्षक श्रीनाथ महाडिक यांची गुन्हे शाखेकडून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

सहायक दादासाहेब शाखेकडून ठाण्यात, निरीक्षक पोलीस निरीक्षक मोरे यांची गुन्हे एमआयडीसी पोलीस सहायक पोलीस तुकाराम घाडगे यांची आर्थिक गुन्हे शाखेतून गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे. सहायक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे यांची दंगा नियंत्रण पथकाकडून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात, सहायक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांची गुन्हे शाखेतून आर्थिक गुन्हे शाखेत, पोलीस उपनिरीक्षक गोविंद पवार यांची नियंत्रण कक्षातून कोर्ट पैरवी, नव्याने रुजू झालेले पोलीस उपनिरीक्षक प्रवीण भोपळे यांची सायबर पोलीस ठाण्यात, पोलीस उपनिरीक्षक पवनकुमार अंधारे यांची नियंत्रण कक्षातून दहशतवादविरोधी पथकात तर पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड यांची विशेष शाखेतून गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दीतील भद्रावती पेठ टी.पी. ०१ येथील सिटी सव्हे नं. १०३८१/१६/१७/२७ याचे एकूण क्षेत्र १८५.६० चौ. मीटर इतके आहे. यावर संपूर्ण क्षेत्र लोडबेअरींग बांधकाम आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- श्री. अंकम यांची घरजागा, दक्षिणेस :- श्री. गंगुल यांची घरजागा, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- रस्ता. येणेप्रमाणे चतुःसीमेतील घरजागा, त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह. ही मिळकत १) श्री. प्रशांत अंजन गंगशेट्टी, रा.१६६ बी, एकता नगर, सोलापूर, २) श्री. राकेश अंजन गंगशेट्टी, रा.बी/२६, कांता अपार्टमेंट, घाटकोपर पूर्व, मुंबई पंत नगर, महाराष्ट्र, यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची असून त्यांचेकडून ही मिळकत आमचे अशिल हे खरेदीने घेण्यासाठी व्यवहार करणार आहेत, तरीही नमूद घरजागेच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०३/१२/२०२४

**अशिलातर्फे**
**सही/- ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर,**
**सोलापूर मो.नं. ९८८१२४०५१६**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९१०/२०२४

### सोलापूर येथील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

**कु. स्वाती मंगलमुर्ती धोकटे**
वय २९ वर्षे, धंदा घरकाम,
रा. १७४, शिवगंगा नगर नं.२. विजापूर रोड,
जुळे सोलापूर, सोलापूर. - **अर्जदार**

विरुध्द

**१) हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स**
न्यू पाच्छा पेठ, कमटम कारखान्यासमोर, सोलापूर.
**२) लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**
डफरीन चौक, सोलापूर. - **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. श्री. मंगलमुर्ती शशिकांत धोकटे व कै. सौ. मंजूषा मंगलमुर्ती धोकटे यांचे पश्चात या दोघांचे कायदेशीर वारस म्हणून बँक ऑफ महाराष्ट्र, सेवानिवृत्ती वेतन उपदान भारतीय जिवन बिमा निगम यांमध्ये असलेल्या रकमांसाठी तसेच वरील मयत व्यक्तिच्या सेवेचे लाभ मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी या मा. न्यायालयात अर्ज केला आहे.

त्याअर्थी कै. श्री. मंगलमुर्ती शशिकांत धोकटे व कै. सौ. मंजूषा मंगलमुर्ती धोकटे यांचे वारस म्हणून वर नमुद रकमेमध्ये, लाभामध्ये ज्यांचा हक्क हितसंबंध आहे अशा व्यक्तींना स्वतः अगर अधिकृत प्रतिनिधी यांचे मार्फत दि. ०६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कागदपत्रांसह लेखी हरकत / तक्रार दाखल करावी, जर कोणाची तक्रार / हरकत न आल्यास मा. न्यायालय पुढील योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दि. ३०/११/२०२४ रोजी दिली असे.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर**

जाहीर निविदा प्रसिध्दीकरण

## करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर

### जाहीर निविदा प्रसिध्दीकरण सूचना

करमाळा नगरपरिषदेकडील बांधकाम विभागासाठी कामांसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी अ.क्र.१ ते ६ **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत** करावयाच्या खालील कामांसाठी जाहिर निविदा अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | कोरी निविदा किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | चांदगुडे गल्ली येथील न.पा. मुलांची शाळा नं. ४ कोपरा ते बरडे टपरी रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ९,९९,३८१.००/- | १०,०००/- | १,०००/- |
| २ | चांदगुडे गल्ली येथील बरडे टपरी ते संजय मुरकुटे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,९८,८७४.००/- | १०,०००/- | १,०००/- |
| ३ | चांदगुडे गल्ली येथील कल्याण रजपूत ते संजय मुरकुटे घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,९८,८७४.००/- | १०,०००/- | १,०००/- |
| ४ | चांदगुडे गल्ली येथील रामगुडे घर ते क्षीरसागर घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ६,२३,२९८.००/- | १०,०००/- | १,०००/- |
| ५ | चांदगुडे गल्ली येथील कल्याण रजपूत घर ते महादेव मंदिर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,९९,९९९.००/- | १०,०००/- | १,०००/- |
| ६ | चांदगुडे गल्ली येथील अभिमान चांदगुडे घर ते राऊत घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. Part A | ५,०१,४५१.००/- | १०,०००/- | १,०००/- |

१. जाहीर निविदा फॉर्म न.पा. कार्यालयात दि. ०४/१२/२०२४ पासून ते दि. १९/१२/२०२४ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विक्रीसाठी उपलब्ध आहत.
२. जाहिर निविदा फॉर्म स्वीकृती दि. ०४/१२/२०२४ पासून ते दि. २०/१२/२०२४ दुपारी ४.०० वाजेपर्यंत राहील.
३. जाहिर निविदा उघडण्याचा दि. २३/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता (शक्य झाल्यास)
४. सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांसाठी निविदा फॉर्म न.पा.च्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध आहेत.

**शर्ती व अटी :-**
१. कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
२. निविदाधारकांनी निविदा फॉर्म लिफाफे दि. २०/१२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत करमाळा नगरपरिषद कार्यालयात जमा करावयाची आहेत.
३. कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहील.

**सही/-**
**श्री. आकाश वाघमारे**
**बांधकाम अभियंता**
**करमाळा नगरपरिषद**

**सही/-**
**श्री. सचिन तपसे**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापुर

**९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर**
**‘नमुना झेड’**
**नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा**

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी खाली सही करणार विशेष वसुली अधिकारी, लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सोलापुर ९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर यांनी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या थकबाकीदार कर्जदार व त्यांचे जामीनदार यांचेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ (१) अंतर्गत संस्थेने प्राप्त केलेल्या वसुली दाखल्यास अनुसरून कलम १५६ व नियम १०७ मधील तरतुदीस अनुसरून थकबीदार कर्जदारांना प्रथम मागणी नोटीस देऊन त्यांचाकडील थकबाकीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले होते परंतू थकबाकीदार कर्जदारांने रक्कम भरण्यास कसूर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या उपरी ऋणकोने त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या नोटीसीव्दारे त्यांच्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेतल्याबाबत कळविण्यात येत आहे. तसेच सर्व नागरिकांना देखील सूचित करण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या थकबाकीदार,

कर्जदार यांच्या मालमत्तेवर ताबा नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) नुसार विशेष वसुली अधिकारी यांनी घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे. सदर ताबा घेतलेल्या मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार केल्यास लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या , सोलापुर या संस्थेच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला संबंधितांना अधीन राहावे लागेल.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | कर्जदाराचे नांव | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन | क्षेत्राचे एकक हे. आर. | जप्ती आदेश दिनांक | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र रविंद्र चव्हाण | खुनेश्वर ता. मोहोळ जि. सोलापूर गट नं ४५० | १.६८ | २३/०५/२०२४ | १९/०६/२०२४ |
| २ | श्री. किरण साहेबराव पाटील | दादपुर ता. मोहोळ जि. सोलापूर गट नं ९९/२ | ४.२५ | ०७/०३/२०२३ | १६/०२/२०२४ |
| ३ | श्री. शशिकांत वसंत क्षिरसागर | कातेवाडी ता. मोहोळ जि. सोलापूर गट नं १२४ | २.०९ | ०६/०३/२०२३ | १६/०२/२०२४ |
| ४ | श्री. बसवराज रेवणसिध्द कोणदे | बंकलगी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर गट नं ४५ | ०.८० | १८/१२/२०२१ | १२/०३/२०२४ |
| | | बंकलगी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर गट नं ४८ | ०.२४ | | |
| ५ | श्री. राजेंद्र भाऊसाहेब देशमुख | दारफळ बी.बी. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर गट नं. ३९५/३ | ०.४० | १८/०६/२०१९ | १२/०३/२०२४ |
| | | दारफळ बी.बी. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर गट नं. ३९५/१ | १.५९.५० | | |

(सदरची ताबा नोटीस आज दिनांक ०४.१२.२०१४ रोजी माझ्या सहीने देण्यात आली आहे.)

**स्थळ : सोलापूर**
**दि. ०४.१२.२०२४**

शिक्का

**सही/-**
**(श्री. अंबरकर ऋषिकेश रमण)**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

## महत्त्वाचे


### तलवारबाजीत आखिरीला सुवर्ण, सारिकाला रौप्यपदक

**पाटलीपुत्र** : हरयाणाची तलवारबाज आखिरीने ३२व्या राष्ट्रीय ज्युनियर तलवारबाजी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी मुलींच्या सेबर वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले, तर सारिकाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. क्रीडा विभाग आणि बिहार राज्य प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने बिहारमध्ये प्रथमच ही स्पर्धा आयोजित केली जात आहे. पाटलीपुत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या इनडोअर स्टेडियममध्ये तरुण तलवारबाज आपले कौशल्य दाखवत आहेत. गुजरातच्या रितू प्रजापती आणि मणिपूरच्या लैशराम अबीने कांस्यपदक पटकावले. तर ईपी वैयक्तिक स्पर्धेतील मुलांच्या गटात पंजाबच्या बळीराम जोशीने सुवर्णपदक, तेलंगणाच्या लोकेश बेमाणीने रौप्यपदक, हरियाणाच्या गौरव आणि पंजाबच्या शौर्य अश्विनीने कांस्यपदक पटकावले. फॉइल वैयक्तिक मुली तलवारबाजी प्रकारात छत्तीसगडच्या दीपांशीने सुवर्णपदक, हरयाणाच्या प्राचीने रौप्यपदक, मणिपूरच्या ताखेलांबम मांगेलीबी आणि तामिळनाडूच्या आशिता एस जॉयसने कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी बिहारचे क्रीडा मंत्री सुरेंद्र मेहता, अल्पसंख्यक कल्याण मंत्री जामा खान आणि बिहार राज्य क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक कम मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्रन शंकरन यांनी खेळाडूंची भेट घेऊन त्यांना प्रोत्साहन दिले.



मुंबईत सध्या टेनिस प्रीमियम लीग सुरू आहे. यात गुजरात पँथर्सविरुद्ध झालेल्या सामन्यात खेळताना राजस्थान रेंजरचा खेळाडू रोहन बोपण्णा

### स्क्वॅशपटू राज मनचंदा यांचे निधन



**नवी दिल्ली** : भारताचे महान स्क्वॅशपटू राज मनचंदा यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. सहा वेळा राष्ट्रीय विजेतेपद पटकावणाऱ्या मनचंदा यांनी रविवारी अखेरचा श्वास घेतला, अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांच्या जवळच्या सूत्रांनी दिली. अर्जुन पुरस्काराने सन्मानित मनचंदा हे भारतीय स्क्वॅश जगतात सर्वांत लोकप्रिय होते. १९७७ ते १९८२ पर्यंत ते राष्ट्रीय विजेते होते आणि त्यांनी लष्करासाठी ११ वेळा विजेतेपद पटकावले. या काळात मनचंदा यांनी आशियाई अजिंक्यपद आणि जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले आणि १९८३ मध्ये त्यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मनचंदा जेव्हा लष्कराचे कर्णधार झाले आणि वयाच्या ३३ व्या वर्षी पहिले राष्ट्रीय विजेतेपद जिंकले तेव्हा ते प्रसिद्धीझोतात आले. १९८१ मध्ये, आशियाई चॅम्पियनशिप दरम्यान, १९८० च्या दशकात स्क्वॅशमध्ये वर्चस्व गाजवणाऱ्या दिग्गज जहांगीर खानशी त्याचा सामना झाला. कराची येथे १९८१ च्या आशियाई सांघिक स्पर्धेत रौप्य पदक संघाचे नेतृत्व करण्यासह अनेक प्रसंगी मनचंदा यांनी भारतीय संघाचे नेतृत्व केले.

### मिझोराम, झारखंड, मध्य प्रदेश आणि ओडिशा उपांत्य फेरीत.

**सिकंदराबाद** : मिझोराम, झारखंड, मध्य प्रदेश आणि ओडिशा यांनी मंगळवारी येथे आपापल्या उपांत्यपूर्व फेरीतील सामने जिंकून १४ व्या हॉकी इंडिया सब ज्युनियर महिला राष्ट्रीय अजिंक्यपद २०२४ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत मिझोरामने उत्तर प्रदेशचा १-० असा पराभव केला तर दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीत झारखंडने महाराष्ट्राचा १२-० असा पराभव केला. अन्य उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांमध्ये मध्य प्रदेशने पिछाडीवरून परतत हरयाणाविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला तर ओडिशाने दिल्लीचा ३-० असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

### ॲपलवर आपल्याच कर्मचाऱ्यांची हेरगिरी केल्याचा आरोप

**कॅलिफोर्निया** : ॲपलवर त्यांच्या कामगारांच्या वैयक्तिक डिव्हाईसेस आणि आयक्लॉड खात्यांवर बेकायदेशीरपणे निरीक्षण केल्याचा आरोप आहे आणि त्यांना त्यांच्या वेतन आणि कामाच्या परिस्थितीवर चर्चा करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.

# भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघ ओमानला रवाना

## आशिया चषक विजेतेपद कायम राखण्याचे आव्हान

◆ **बंगळुरू, ३ डिसेंबर**

भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघ मंगळवारी आशिया चषक स्पर्धेतील विजेतेपद राखण्यासाठी मस्कतला रवाना झाला. या स्पर्धेमुळे संघाला पुढील वर्षी होणाऱ्या एफआयएच ज्युनियर विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरण्यास मदत होईल.

ज्युनियर आशिया चषक स्पर्धा ७ ते १५ डिसेंबर दरम्यान होणार आहे. रविवारी बांगलादेशविरुद्ध भारत आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. या स्पर्धेतील अव्वल तीन संघ चिलीतील सँटियागो येथे होणाऱ्या विश्वचषकासाठी पात्र ठरतील.



स्पर्धेत सहभागी होणारा भारतीय ज्युनियर महिला हॉकी संघ

'अ' गटात भारताचा सामना चीन, मलेशिया, थायलंड आणि बांगलादेश यांच्याशी होईल तर गट 'ब' मध्ये दक्षिण कोरिया, जपान, चायनीज तैपेई, हाँगकाँग आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. भारताच्या मोहिमेचे नेतृत्व कर्णधार ज्योती सिंग आणि उपकर्णधार साक्षी राणा करणार आहेत. वरिष्ठ संघासोबत खेळण्याचा अनुभव असलेल्या खेळाडूंचाही संघात समावेश आहे.

संघ रवाना होण्यापूर्वी ज्योती म्हणाली, आम्ही आमच्या मोहिमेबद्दल खूप उत्साही आहोत. आमच्याकडे चांगला आणि अनुभवी संघ आहे. आम्ही गेल्या काही महिन्यांत कठोर परिश्रम केले आहेत आणि संघ मस्कतमध्ये आमची सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी उत्सुक आहे. ◂(वृत्तसंस्था)

# बुमराहचा सामना करण्यास ऑस्ट्रेलियन फलंदाज सज्ज

### फलंदाज एलेक्स कॅरीचा विश्वास



◆ **ॲडिलेड, ३ डिसेंबर**

ऑस्ट्रेलिया संघ एकसंध आणि चांगल्या रणनीतीसह मैदानात उतरण्याचा आत्मविश्वास बाळगून आहे. ६ डिसेंबरपासून येथे सुरू होणाऱ्या दुसऱ्या दिवस-रात्र क्रिकेट सामन्यात जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील भारतीय आक्रमणाचा सामना करण्यासाठी मैदानात उतरेल, असा विश्वास ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक-फलंदाज एलेक्स कॅरी याने व्यक्त केला.

भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहने पर्थ येथे खेळल्या गेलेल्या बॉर्डर- गावस्कर चषकाच्या पहिल्या कसोटी सामन्यात आठ गडी बाद करीत भारताच्या २९५ धावांच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना कामगिरी करता आली नाही.

कॅरीने येथे पत्रकारांना सांगितले की, बुमराह निश्चितच एक उत्कृष्ट गोलंदाज आहे आणि गेल्या अनेक वर्षांपासून तो चांगली कामगिरी करत आहे. आमचे फलंदाज देखील जागतिक दर्जाचे आहेत आणि आम्ही त्याच्या गोलंदाजीचे मूल्यांकन केले आहे. आम्ही त्याच्या पहिल्या दुसऱ्या स्पेलचा सामना करू शकू. पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात ट्रॅव्हिस हेडने कसे प्रतिआक्रमण केले हे आपण पाहिले, असे कॅरीने सांगितले.

आम्हाला आमच्या फलंदाजांवर पूर्ण विश्वास आहे. केवळ बुमराहच नाही तर भारताच्या इतर गोलंदाजांचा सामना करण्याचा मार्ग आम्ही शोधू. भारताने पहिल्या कसोटी सामन्यात काही नवीन गोलंदाजांसह प्रवेश केला होता आणि त्यांनीही चांगली गोलंदाजी केली होती, असेही एलेक्स कॅरीने सांगितले.



ऑस्ट्रेलियाच्या ड्रेसिंग रूममध्ये तणाव असल्याच्या अफवा कॅरीने फेटाळून लावल्या. तुम्ही फलंदाजांना विचाराल तर, आम्हा सर्वांना चांगली कामगिरी करायची आहे, असे त्याने सांगितले.

आमचा संघ एकजूट आहे. आम्हा सर्वांना फलंदाजीची संधी मिळते आणि आम्ही सर्वजण मोठी धावसंख्या उभारण्यासाठी उत्सुक आहोत आणि मला विश्वास आहे की आमचे खेळाडू असे करण्यात यशस्वी होतील, असा विश्वास एलेक्सने व्यक्त केला. ◂(वृत्तसंस्था)

## आयजीयू निवडणुकीसाठी प्रमोद कोहली मतदान अधिकारी

◆ **नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

सिक्कीम उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश प्रमोद कोहली यांची १५ डिसेंबर रोजी होणाऱ्या इंडियन गोल्फ युनियन (आयजीयू) निवडणुकीसाठी मतदान अधिकारी म्हणून मंगळवारी नियुक्ती करण्यात आली. पूर्वीचे मतदान अधिकारी आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश ओ. पी. गर्ग यांनी राजीनामा दिल्यानंतर निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आयजीयूचे अध्यक्ष ब्रिजंदर सिंग यांनी गेल्या गुरुवारी गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्यांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये म्हटले होते की, अपरिहार्य परिस्थितीमुळे निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या (आयओए) अध्यक्ष पी. टी. उषा यांनीही निवडणूक पुढे ढकलण्याच्या निर्णयावर आयजीयू प्रमुखांकडून स्पष्टीकरण मागितले होते.

पी. टी. उषा यांनी उत्तर असमाधानकारक आढळल्यास तदर्थ संस्था स्थापन करण्यासह कठोर कारवाईचा इशारा दिला होता. आयजीयूने मंगळवारी सांगितले की, त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका मूळ वेळापत्रकानुसारच होतील. अध्यक्ष ब्रिजंदर सिंग यांच्या नेतृत्वाखालील विद्यमान गव्हर्निंग कौन्सिलची मुदत संपल्याने, २०२४-२०२६ या कालावधीसाठी नवीन पदाधिकारी निवडले जातील, असे आयजीयूने निवेदनात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## टॉड ग्रीनबर्ग क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे नवे सीईओ

**मेलबर्न** : माजी राष्ट्रीय रग्बी लीग प्रमुख टॉड ग्रीनबर्ग पुढील वर्षी क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून निक हॉकली यांची जागा घेतील. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने मंगळवारी याची घोषणा केली.

ग्रीनबर्ग सध्या ऑस्ट्रेलियन क्रिकेटर्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. पुढील वर्षी मार्चमध्ये ते त्यांचे नवीन पद स्वीकारतील. चालू देशांतर्गत हंगामाच्या अखेरीस आपण आपले पद सोडू, असे त्यांनी ऑगस्टमध्ये जाहीर केले होते.

ग्रीनबर्गने यापूर्वी क्रिकेट न्यू साऊथ वेल्समध्ये काम केले आहे. मी सिडनीच्या रँडविक क्रिकेट क्लबसाठी एक आघाडीचा फलंदाज म्हणून खेळत असे, असे ग्रीनबर्ग म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय एरोबिक्स स्पर्धेत बोध्दूल, गानेर या जोडीस सुवर्ण

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

शिर्डी (अहिल्यानगर) येथे २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत पार पडलेल्या १९व्या राष्ट्रीय एरोबिक्स स्पर्धेत येथील वृंदा बोध्दूल व स्वरा गानेर या जोडीने महाराष्ट्र संघाकडून खेळताना सुवर्ण पदकाची कमाई केली.

या कामगिरीवर दोघींची १२ ते १८ डिसेंबर दरम्यान डिनॉमो स्पोर्ट्स सेंटर, मॉस्को (रशिया) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फिटनेस एरोबिक्स चॅम्पियनशिपसाठी भारताच्या संघात निवड झाली.

महाराष्ट्राने राष्ट्रीय स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. महाराष्ट्राला सांघिक विजेतेपद मिळवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. यात देशातील १९ राज्यातील ८५६ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्राकडून वृंदा व स्वराने फिटनेस एरोबिक क्रीडा प्रकारात ही सुवर्ण कामगिरी केली.

या दोघींना त्यांच्या प्रशिक्षका डॉ. मोहिनी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. दोघींचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी अभिनंदन केले.





२० व्या आशियाई महिला हॅण्डबॉल अजिंक्यपद स्पर्धेत मंगळवारी झालेल्या भारत विरुद्ध हाँगकाँगच्या सामन्यात भारताच्या भावनाला रोखताना हाँगकाँगची खेळाडू

## आयएमएसच्या इंगोले हिची राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**



येथील इंडियन मॉडेल स्कूल सी.बी.एस.ईच्या उन्नती इंगोले हिची राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली. येरवडा पुणे येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात उन्नतीने तिसरा क्रमांक मिळविला. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

## सिद्धेश्वर स्कूलच्या मिताली पाटील हिला रौप्यपदक



**सोलापूर** : डहाणू-पालघर (मुंबई) येथे झालेल्या राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाने रौप्य पदक संपादिले. यात सिद्धेश्वर स्कूलच्या मिताली पाटील हिचा समावेश होता. तिला क्रीडाशिक्षक पवन भोसले व वेदांत पवार यांचे मार्गदर्शन केले. या सुयशाबद्दल श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी, करिष्मा फुलारी आदींनी अभिनंदन केले.

## पी. व्ही. सिंधू २२ डिसेंबरला अडकणार विवाहबंधनात



उदयपूरमध्ये विवाह, हैदराबादध्ये स्वागत समारंभ

◆ **बंगळुरू, ३ डिसेंबर**

रविवारी लखनौ येथील सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेत विजेतेपदाचा दुष्काळ संपवणारी माजी विश्वविजेती पी. व्ही. सिंधू पोसाइडेक्स टेक्नॉलॉजिजचे कार्यकारी संचालक असलेले हैदराबाद येथील व्यंकट दत्ता साई यांच्याशी विवाहबद्ध होणार आहे.

सिंधूचे वडील पी. व्ही. रमणा यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, दोन्ही कुटुंबे एकमेकांना ओळखत होते, पण एक महिन्यापूर्वीच सर्व काही ठरले होते. हीच वेळ होती कारण जानेवारीपासून सिंधूचे शेड्यूल खूप व्यस्त असणार आहे, म्हणूनच दोन्ही कुटुंबांनी २२ डिसेंबरला लग्न समारंभ आयोजित करण्याचा निर्णय घेतला. २४ डिसेंबर रोजी हैदराबादमध्ये स्वागत समारंभ होणार आहे. पुढील सत्र अत्यंत महत्त्वाचे असल्याने ती लवकरच तिचे प्रशिक्षण सुरू करणार आहे.

२० डिसेंबरपासून लग्नाशी संबंधित कार्यक्रम सुरू होतील. सिंधूला भारतातील सर्वांत दिग्गज खेळाडूंपैकी एक मानले जाते. तिने २०१९ मध्ये सुवर्णासह जागतिक स्पर्धेत पाच पदके जिंकली आहेत. याशिवाय तिने ऑलिम्पिक स्पर्धेतही रौप्य आणि कांस्यपदक जिंकले आहे.

सिंधूने रिओ २०१६ आणि टोकियो २०२० मध्ये सलग ऑलिम्पिक पदके जिंकली आणि २०१७ मध्ये करीअर-सर्वोत्तम जागतिक क्रमवारीत दुसरे स्थान मिळवले. ◂(वृत्तसंस्था)

# एडोआर्डो बोवे मैदानावर बेशुद्ध

◆ **इटली, ३ डिसेंबर**

इटालियन लीग सेरी ए च्या एका महत्त्वाच्या सामन्यात, इंटर मिलान विरुद्धच्या सामन्यात फिओरेंटिनाचा मिडफिल्डर एडोआर्डो बोवे मैदानावर बेशुद्ध पडला. त्याला बेशुद्धावस्थेत जवळच्या कारेगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याला अतिदक्षता विभागात (आयसीयू) दाखल करण्यात आले आहे.

२२ वर्षीय बोवे मैदानावर पडताच दोन्ही संघातील खेळाडूंनी त्याला घेरले आणि तातडीने वैद्यकीय मदत मागितली. त्याच्यावर प्राथमिक उपचार करून त्याला स्ट्रेचरवर मैदानाबाहेर आणून रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना सामन्याच्या १६व्या मिनिटाला घडली. यानंतर सामना पुढे ढकलण्यात आला. 'फ्लोरेन्स तुमच्यासोबत आहे' असे फलक घेऊन बोवेचे समर्थक हॉस्पिटलबाहेर जमले. सुरुवातीच्या हृदय आणि मेंदूच्या चाचण्यांमध्ये केंद्रीय मज्जासंस्था आणि हृदय श्वसन प्रणालीला तीव्र नुकसान होण्याची शक्यता नाकारण्यात आली आहे. काही तासांनंतर त्याची पुन्हा चाचणी केली जाईल. बोवेला रुग्णवाहिकेतच शुद्ध आली होती आणि तो स्वत: श्वास घेत होता, असेही सांगण्यात येत आहे. ◂(वृत्तसंस्था)



# श्री सिद्धेश्वर स्कूलच्या १२ खेळाडूंची राज्य डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

चौदावी सब ज्युनिअर मुले मुली महाराष्ट्र स्टेट डॉजबॉल स्पर्धा जालना येथे होणार असून त्या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा संघात सिद्धेश्वर स्कूलच्या सात मुली व पाच मुले यांची निवड झाली. विजेत्या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले व वेदांत पवार यांनी मार्गदर्शन केले.

**निवडलेले खेळाडू** : अमृता शृंगारपुरे, नंदिता नंदुरकर, वैष्णवी लोंढ, संध्या गुब्याडकर, आनंदी मदनशेट्टी, प्रांजली शिंदे, रितिका पवार, अवधूत कांबळे, साकल्य चव्हाण, रितेश पवार, शार्दुल फडतरे, अंशुमन बळकोटे.

# 'खेलो इंडिया'मुळे २७८१ खेळाडू प्रकाशझोतात

## जागतिक क्रीडा प्रदर्शनात वाढ : मांडविया

◆ **नवी दिल्ली, ३ डिसेंबर**

खेलो इंडिया उपक्रमाने पॅरा ॲथलेटिक्ससह २१ खेळांमधील २७८१ खेळाडूंना प्रकाशझोतात आणले आणि त्यांना खेलो इंडिया टॅलेंट डेव्हलपमेंट प्रोग्रामचा एक भाग म्हणून आवश्यक समर्थन प्रदान केले आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले.

खेलो इंडिया योजना आपल्या खेलो इंडिया टॅलेंट डेव्हलपमेंट प्रोग्रामद्वारे विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे आणि निकषांच्या आधारे पॅरा ॲथलेटिक्ससह २१ क्रीडापटूंना समर्थन देऊन प्रतिभा ओळखते आणि त्यांचे पालनपोषण करते, असे मांडविया यांनी लोकसभेत लेखी उत्तरात सांगितले.

आतापर्यंत, २७८१ खेलो इंडिया खेळाडू या योजनेअंतर्गत ओळखले गेले आहेत. त्यांना प्रशिक्षण, उपकरणे, वैद्यकीय सेवा अशी मदत दिली जाते.

खेलो इंडिया म्हणून ओळखले जाणारे खेळाडू, नॅशनल सेंटर्स ऑफ एक्सलन्स तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) अंतर्गत इतर मान्यताप्राप्त अकादमींमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

मांडविया म्हणाले की, हा कार्यक्रम भारताच्या क्रीडा प्रतिभांचा समूह मजबूत करत आहे आणि जागतिक स्तरावर देशाच्या वाढत्या यशात योगदान देत आहे.

२०२२ हँगझोऊ आशियाई खेळ आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी होऊन देशाला गौरव मिळवून देणाऱ्या खेलो इंडियाच्या खेळाडूंची माहितीही मंत्र्यांनी दिली.

चीनमधील हँगझोऊ येथे २०२२ च्या आशियाई खेळांमध्ये ६४४ भारतीय खेळाडूंपैकी १२४ खेलो इंडिया खेळाडू होते आणि त्यांनी नऊ सुवर्ण पदकांसह भारताच्या १०६ पदकांपैकी ४२ पदके जिंकून महत्त्वपूर्ण योगदान दिले, अशी माहिती मंत्र्यांनी दिली.

मांडविया यांनी सांगितले की, 'ग्रामीण आणि स्वदेशी/आदिवासी खेळांना प्रोत्साहन' हे खेलो इंडिया योजनेचा एक भाग आहे आणि देशभरात ग्रामीण आणि देशी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी समर्पित आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ऊसतोडीसाठी मजूर घेऊन निघालेला ट्रॅक्टर विहिरीत पडला

## तीन मुलांचा मृत्यू; क्रेनच्या सहाय्याने ट्रॅक्टर काढले बाहेर

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ३ डिसेंबर-**

उसतोडीसाठी मजूर घेऊन निघालेला ट्रॅक्टर विहिरीत पडून ट्रॅक्टरवरील उसतोड कामगारांच्या अवघ्या तीन ते चार वर्षाच्या तीन मुलांचा विहिरीतील पाण्यात बुडून दुर्दैवी अंत झाला. ही घटना दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ६ वा. सुमारास शिंगेवाडी ता.माढा येथे घडली. रिंकु सुखलाल वसावी (वय ३ वर्षे), आरव वसंत पाडवी (वय ४ वर्षे), नितेश शिवा वसावी (वय ३ वर्षे) सध्या सर्व रा. शिगेवाडी (ता.माढा) अशी विहिरीत बुडून मृत्यूमुखी पडलेल्या मुलांची नावे आहेत. याबाबत सुखलाल करमा वसावी (रा.पिंपळबारी ता.धडगाव जि.नंदुरबार) यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. या घटनेची माहिती गावात पसरताच सर्वत्र शोककळा पसरली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी सुखलाल करमा वसावी



हे (रा.पिंपळबारी ता.धडगाव जि.नंदुरबार) येथील रहिवासी असून ते उसतोड कामगार आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील पाडली (ता.धडगाव) येथील उसतोड मुकादम खिमजी जालम्या तडवी याने उसतोडणीसाठी फिर्यादीसह इतर उसतोड कामगारांची टोळी तयार करुन दि.६ नोव्हेंबर २०२४ रोजी उसतोडणीसाठी शिंगेवाडी (ता. माढा) येथे सदर उसतोड कामगारांना आणले होते.शिंगेवाडी येथे नागनाथ कोंडीबा शिंदे यांच्या येथे हे कामगार राहण्यास होते. तुकाराम मुरलीधर शिंदे यांच्या शेतामध्ये उसतोडणी असल्याने कानिफ मच्छिंद्र परबत रा.शिंगेवाडी यांचा

घटनेची माहिती समजताच गावकऱ्यांनी विहिरीकडे धाव घेऊन ५ विद्युत मोटारीच्या सहाय्याने विहिरीत असलेले २० फूट पाणी बाहेर काढले व क्रेनच्या सहाय्याने ट्रॅक्टर बाहेर काढण्यात आला.

कुबोटा ट्रॅक्टर एम एच ४५ ए एल ४७५३ या ट्रॅक्टरला ट्रॅक्टरगाडी जोडून मुकादम खिमजी हा फिर्यादी व फिर्यादीची पत्नी सायकु सुखलाल वसावी, त्याची मुलगी रिंकू, उसतोड जोडीदाराची पत्नी निमा शिवा वसावी, तिचा मुलगा नितेश शिवा वसावी, व परमिला वसंत पाडवी व तिचा मुलगा आरव वसंत पाडवी यांना घेऊन सकाळी ६ वा. सुमारास तुकाराम मुरलीधर शिंदे यांच्या शेताकडे निघाला होता. ट्रॅक्टर मुकादम खिमजी जालम्या तडवी हा स्वतः चालवत असताना नागनाथ कोंडीबा शिंदे यांच्या शेतातील बिरोबा मंदिराजवळील विहिरीजवळ ट्रॅक्टर आला असता ट्रॅक्टर चालक मुकादम खिमजी याला सदर शेतामध्ये विहिर असल्याचे माहिती असतानासुद्धा अविचाराने, हयगयीने धोकादायक रित्या चालविल्यामुळे ट्रॅक्टर गाडीसह विहिरीतील पाण्यात पडला. यावेळी प्रसंगावधान राखून ज्यांना पोहता येत होते.

ते पाण्याबाहेर पडले आणि महिलांनाही पाण्यातून बाहेर काढले. मात्र ट्रॅक्टरच्या हेडवर बसलेली लहान तीन मुले विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडली. यावेळी ट्रॅक्टरवरील चालक मुकादम खिमजी जालम्या तडवी हा अपघातानंतर विहिरीतून बाहेर येत घटनेचे गांभीर्य ओळखून पसार झाला. या घटनेत तीन लहान बालकांचा मृत्यू झाल्याने संतप्त उसतोड कामगारांनी मुकादमाच्या खोपाटाची मोडतोड केली.

# पथ निरीक्षक ट्रॉलीला रेल्वे धडकली

### लोकोपायलटच्या प्रसंगावधानामुळे दुर्घटना टळली

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. ३ डिसेंबर-**

जेऊर ते भाळवणी रेल्वे स्थानकाच्या दरम्यान रेल्वे ट्रॅकची पाहाणी करत असलेल्या रेल्वे पथ निरिक्षक ट्रॉलीला पाठीमागून येणाऱ्या विशाखापट्ट्णम् एक्सप्रेसची धडक बसली, मात्र लोकोपायलटच्या प्रसंगावधानामुळे कोणतीही जिवितहानी न होता मोठा अनर्थ टळला. रेल्वे पथ निरिक्षक ट्रॉलीवरील अधिकाऱ्यासह इतर तीघेजण बालंबाल बचावले. ही घटना दि. २ डिसेंबर रोजी दु १२.३० ते १२.४५ वा जेऊर ते भाळवणी दरम्यान घडली.

दि. २ डिसेंबर रोजी दुपारी १२.३० दरम्यान विशाखापट्ट्णम् रेल्वे एक्सप्रेस गाडी क्र.१८५२० ही मुंबईकडून




रेल्वे पथ निरीक्षकाला ज्यावेळी रेल्वेलाईन तपासणीसाठी ट्राली घेऊन रेल्वे लाईनवरुन जायचे असते त्यावेळी त्यांनी काही सुरक्षा विषयक नियम व अटी पाळल्या होत्या का नाही. याबाबत दबक्या आवाजात चर्चा सुरु होती.

सोलापूरच्या दिशेने जात होती. या दरम्यान जेऊर ते भाळवणीच्या मध्ये सदर एक्सप्रेस गाडी धावत असलेल्या रेल्वे लाईनवर रेल्वे पथ निरीक्षकाची ट्रॉली असल्याचे लोकापायलटच्या निदर्शनास आले. त्यावेळी लोकोपायलटने हॉर्न वाजवून त्यांना सावध केले असता सदर पथ निरीक्षक ट्रॉलीवरील पथ निरीक्षक व इतर तिघे जणांनी सदर ट्रॉलीवरुन उड्या मारून बाजूला झाले मात्र त्यांना रुळावरील पथ निरीक्षक ट्रॉली बाजूला काढता आली नाही. तोपर्यंत लोकोपायलट ने इमर्जेन्सी ब्रेक मारला मात्र थोडक्यात विशाखापट्ट्णम्चे इंजिन पथ निरीक्षक ट्रॉलीला येऊन धडकले आणि काही अंतर पुढे जाऊन ट्रॉलीसह गाडी पुढे जाऊन थांबली. यावेळी इंजिनच्या पुढच्या भागात रेल्वे पथ निरिक्षकाची ट्रॉली अडकलेली होती. लोकोपायलटने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे कोणतीही जिवितहानी न होता मोठा अनर्थ टळला. याबाबत वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांना मोबाइलवरुन फोन लावला असता प्रतिसाद मिळाला नाही.

# बार्शी तालुक्यात बिबट्याचा वावर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ डिसेंबर-**

परांड्यानंतर आता बार्शी तालुक्यातील उपळाई ठोंगे येथील बाळू देवराम माळी यांच्या शेतातील तीन शेळ्यांचा बिबट्या सदृश्य प्राण्याने हल्ला केला आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनास्थळी बिबट्या सदृश्य प्राण्याचे ठसे आढळल्याने ग्रामस्थांमध्ये सुरुवातीला भीतीचे वातावरण पसरले आहे. तसेच, नागरिक सोशल मीडिया माध्यमातून एकमेकांना सावध राहण्याचे संदेश पाठवत आहेत.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, बिबट्याने तीन शेळ्यांचा फडशा पाडला आहे. त्यानंतर घटनास्थळी बिबट्या सदृश्य प्राण्याचे ठसे आढळल्याने या प्राण्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या रब्बी हंगामातील ज्वारी, गहू आणि हरभरा पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांचा मोठा कष्टाचा काळ चालू आहे आणि बिबट्याच्या वावरणामुळे शेतकऱ्यांमध्ये आणखी चिंता वाढली आहे.

### बार्शी वन विभागाच्या सूचना

घराभोवती पाळीव कुत्रे सुरक्षितपणे बांधावेत. मोकळ्या कुत्र्यांच्या वासाने बिबट्या घराच्या जवळ येऊ शकतो. बिबट्या किंवा बिबट्या सदृश्य प्राणी दिसल्यास तात्काळ वन विभाग आणि पोलीस यंत्रणेला माहिती द्यावी. बिबट्या किंवा इतर वन्य प्राण्यांसोबत सेल्फी काढणे किंवा व्हिडिओ घेणे टाळावे, कारण हे कायदेशीर दृष्टीकोनातून चुकीचे ठरु शकते. घराभोवती स्वच्छतेचे पालन करणे आवश्यक आहे. कचरा किंवा शिल्लक सामग्री घराबाहेर फेकू नये, यामुळे भटक्या कुत्र्यांचा समावेश होऊ शकतो. घराच्या बाहेर पुरेसा उजेड असावा, जेणेकरून रात्री बिबट्या घराच्या जवळ येणार नाही. रात्री घराबाहेर न पडण्याची सूचना दिली आहे, कारण रात्री बिबट्याचा वावर अधिक असतो.

## संक्षिप्त वृत्त



### चैतन्य मूकबधिर विद्यालयात दिव्यांग दिन साजरा

**अणदूर, दि. ३ डिसेंबर-**

चैतन्य मूकबधिर निवासी विद्यालयात जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रहार संघटना तुळजापूर तालुका उपाध्यक्ष अनिल महाबोले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून शाळेतील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रारंभी शाळेच्या वतीने प्रहार संघटनेचे पदाधिकारी अनिल महाबोले, दत्ता पाटील, मुकेश स्वामी, महादेव धनशेट्टी, किशोर जगताप, कापसे, आयडियल पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवाजी कांबळे यांचा पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक आर. बी जाधव, शिवाजी कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. तसेच प्रहार संघटने तर्फे शाळेतील सर्व मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. सूत्रसंचालन मुख्याध्यापक जाधव यांनी केले तर आभार आलाट यांनी मानले.



### विरशैव लिंगायत समाजातर्फे संदेश पलसे यांचा सत्कार

**सांगोला, दि.३ डिसेंबर-**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे सर्पमित्र संदेश पलसे यांची नुकतीच केंद्रीय मानव अधिकार संघटना दिल्लीच्या सांगोला शाखा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वीरशैव लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर युवक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभास महाराष्ट्र विरशैव सभेचे माजी प्रांतिक अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला महात्मा बसवश्वर महाराजांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी प्रा.पी.सी.झपके, मनोज उकळे यांनी मनोगत व्यक्त करत पलसे यांना शुभेच्छा दिल्या. महेश गुळमिरे यांनी आभार मानले.



### अर्णव शैक्षाणिक संकुलात नशामुक्त भारत अभियानार्तंगत व्यायाम, आरोग्याचे महत्त्व

**वैराग, दि. ३ डिसेंबर-**

नशा मुक्त भारत अभियान सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकारचा उपक्रम सशक्त भारत अभियान व व्यसनमुक्त होण्यासाठी अभियान कार्यक्रमाचे आयोजन अर्णव उच्च माध्यमिक विद्यालय व सावित्रीबाई प्राथमिक शाळा येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. नशा मुक्त भारत अभियानाचे ब्रँड अँबेसिडर महेश वैद्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सशक्त भारत यासाठी व्यायामाचे प्रकार व व्यसनमुक्ती यावर आपले विचार मनोगत व्यक्त केले. तरुण वर्ग नशेच्या दिशेच्या भरकटत चालला आहे. तंदुरुस्त राहण्यासाठी व्यायाम ही आजच्या काळाची गरज आहे. आरोग्य धनसंपदा म्हणजे आरोग्याचे महत्व सांगितले याबाबत प्रात्यक्षिक करून दाखवले व विद्यार्थ्यांचे मन जिंकले. या कार्यक्रमास पंचायत राज्य ग्रामविकास विभागाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष विशाल निलाखे उपस्थित होते. प्रस्ताविक सुहास ढेकणे यांनी केले. सूत्रसंचालन पंचायत राज्य ग्राम विकास विभाग सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र नाईक निंबाळकर यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका अर्चना डिसले, हिमंत ढेंगळे, सोमननाथ घायतिडक, प्रशांत चव्हाण, काकडे, राजश्री शिंदे, दिपाली देशमुख उपस्थित होते.

### पराभवाला खचणारे नसून आम्ही लढणारे कार्यकर्ते : बसवराज हौदे

**अक्कलकोट,दि.३ डिसेंबर-**



विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ईव्हीएम मशीनचा गैरवापर झाल्याने महाविकास आघाडीचे दारुण पराभव झाला आहे. तसा प्रकार अक्कलकोट विधानसभा निवडणुकित झाल्याने माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचा पराभव झाला आहे. परंतु आम्ही अशा पराभवाला खचणारे नसून लढणारे कार्यकर्ते आहोत. संघर्षाचे वादळ आहोत, अशी माहिती काँग्रेसचे युवा नेते बसवराज हौदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. नुकत्याच विधासभा निवडणुकीत अक्कलकोट तालुक्यातील दोड्याळ येथील बूथ वर राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार सुनील बंडगर यांनी व त्यांचे असंख्य हितचिंतक मतदार शिट्टीला मतदान केले असताना दोड्याळ येथील बूथवर शिट्टीला एकही मतदान मिळाले नाही.हे दुर्दैवी बाब आहे. महाराष्ट्रात गेल्या पन्नास वर्षात बोटावर मोजण्या इतके उमेदवार पन्नास हजार पेक्षा जास्त मताधिक्य घेऊन निवडून आलेले आम्ही बगितले आहे. परंतु यंदाच्या निवडणुकीत सत्ताधरी पक्षाचे ८० टक्के उमेदवार पन्नास हजार पेक्षा जास्त मताधिक्य घेवून निवडून आले आहेत. यामुळे ई व्ही एम मशीनचे गैर वापर झाल्याचा हा ताजे उदाहरण आहे.हे लोकशाहीला घातक आहे.वास्तविक पाहता जनतेनी सिध्दाराम म्हेत्रे यांना विजय केला असताना ईव्हीएम मशीनचे गैर वापरामुळे पराभव झाला आहे. याबाबत महाराष्ट्रात महाविकास आघाडी कडून योग्य तो निर्णय घेतले जाणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकीत काँग्रेस पक्ष व कार्यकर्ते पुन्हा एकदा जोमाने कामाला लागून काँग्रेसला सत्तेत आणणाराच आहे. मागील अनेक वर्षांच्या राजकारणात म्हेत्रे कुटुंबीय सत्तेत असताना तालुक्यांचे मोठ्या प्रमाणात विकास केला आहे.

### ‘स्वेरी’त शनिवारी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

**पंढरपूर, दि. ४ डिसेंबर-**

येथील स्वेरी संस्थेच्या अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील माजी विद्यार्थ्यांचा ‘ऋणानुबंध-२०२४’ हा मेळावा येत्या शनिवारी (ता.७) सकाळी ११ वाजता स्वेरीच्या प्रांगणात आयोजित केला आहे. यासाठी स्वेरीतून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, इंजिनिअरिंगच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, व सचिव प्रा. अविनाश मोटे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. या मेळाव्यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळणार आहे. या मेळाव्यात पदवी अभियांत्रिकीच्या स्थापनेपासून म्हणजे १९९८ पासून ते गतवर्षीपर्यंत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्वेरीमध्ये इंजिनिअरींगचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने विद्यार्थी पुणे, मुंबई, बेंगलोर तसेच भारतातील अन्य प्रमुख शहरांमध्ये व परदेशात स्थायीक झालेले माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहेत. माजी विद्यार्थी मेळाव्यासंबंधी अधिक माहीतीसाठी ९९२३४०३७०८, ९८८१७७६१९६, ९९७५३९१०४८ व ९९७०८४९५८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# उमरडचा सोन्या बैल गाजवतोय बैलगाडा शर्यती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील उमरड गावचा तरुण गणेश गुलाबराव मारकड या तरुणाने केवळ नाद म्हणून सोन्या ७५७५ नावाचा गावरान खिलार जातीचा आदत खोंड पळाला आहे. अत्यंत चपळ धावणाऱ्या या बैलाने बैलगाडा शौकिनांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने माळशिरस तालुक्यातील मोटेवाडी,बारामती तालुक्यातील परवाडी मैदानावर गेट पास तर परांडा तालुक्यातील शेळगावच्या मैदानार तृतीय क्रमांक पटकावला आहे.अशी अनेक मैदाने तो जिंकत चालला आहे म्हणून सद्या सोन्या बैल सर्व शौकिनांच्या गळ्यातील ताईत बनला आहे.

हा खोंड केवळ आठ महिन्याचा होता तेंव्हापासून मालक गणेश मारकड त्याचा धावण्याचा सराव घरी आणि जिंती येथील नगरे ट्रेनर स्कूल येथे करतात. तेथे बैल जोड किंवा घोडा जोड देऊन त्याची रनिंग घेतली जाते.

पांढरा वर्ण, धारदार शिंग,बांधीव शरीरयष्टी अशी रुबाबदार ठेवण असणाऱ्या हा शर्यतीचा खोंड सांभाळण्यासाठीचा



आमचा सोन्या ७५७५ हा गावरान खिलार जातीचा आदत खोंड आहे.त्याचा पळ चांगला असून तो स्वभावाने गरीब आहे.केवळ नाद म्हणून मी या क्षेत्राकडे आलो आहे.हे व्यवसाय म्हणून या खेळात उतरलो नाही.आम्हाला अनेक मोठमोठी मैदाने जिंकायची आहेत.माझा आदर्श फलटणच्या निंबाळकर सरांचा सर्जा हा बैल आहे.

**- गणेश मारकड,** सोन्या ७५७५ बैलाचे मालक

खर्च- महिन्याला वीस हजार येतो. याचा आहार दिवसातून दोन वेळा दूध पाजावे लागते.त्याला मका भरडा, कणिक, खापरी पेंड,उडीद डाळ तसेच वैरण,हिरवी मका असा आहार त्याला दिला जातो.

शर्यतीच्या ठिकाणी त्याला टेम्पोत टाकून नेला जातो.हे काम त्याचा सांभाळ करणारे मित्रप्रेम ग्रुप वर सोपवले आहे.ते सर्व बैलगाडा शर्यत शौकीन तरुण काम पाहतात.

शर्यतीच्या ठिकाणची योग्य जोडीला बैल शोधून शर्यत लावली जाते. हा बैलगाडा पळवण्यासाठी प्रशिक्षित ड्रायव्हर नेमला जातो. सोन्याच्या बैलगाड्यावरती राजेवाडी येथील प्रसिद्ध भालू ड्रायव्हर काम पाहतो.

### माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या महिला विभाग जिल्हा उपाध्यक्षपदी हावनूर

**अक्कलकोट, दि. ३ डिसेंबर-**



माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ या संघटनेच्या सोलापूर जिल्हा महिला विभागाच्या उपाध्यक्षपदी वैशाली हावनूर यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले आहे. सदरची निवड ही दिनांक १ डिसेंबर २०२४ चे पुढील तीन वर्षापर्यंत राहणार आहे. शिवसेना अक्कलकोट शहर महिला आघाडीच्या शहर प्रमुख म्हणून वैशाली हावनूर या कार्यरत आहेत. महिलांच्या विविध प्रश्नावर वैशाली हावनूर यानी आवाज उठवण्याच्या काम केले आहे. या निवडीबद्दल वैशाली हावनूर यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.


# पोषक हवामान; रब्बी पिकांना लाभदायक

## पिकांच्या अधिक उत्पादनासाठी पावसाची प्रतीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३ डिसेंबर-**

रब्बी हंगामातील पोषक हवामानामुळे गहू, ज्वारी, हरभरा, मका, तूर यासह इतर पिके जोमात दिसून येत आहेत. पिकांच्या अधिक उत्पादनासाठी पावसाची प्रतीक्षा असून पिकांच्या वाढीमुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

यावर्षी खरीप हंगामात मृग, पुष्य, मघा, हस्त आदी नक्षत्राच्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने तूर, मूग, मटकी, भूईमूग, बाजरी, उडीद, सोयाबीन आदि पिकांची पेरणी करण्यात आली. पिकांच्या वाढीनुसार पावसाने हजेरी लावल्याने मूग, उडीद, मटकी व बाजरीची काढणी करण्यात आली आहे. तर तूर पिकाची काढणी सुरू आहे. तूर पिक जोमात असून प्रति क्विंटल दहा हजार रूपये दर असल्याने तूर काढणीची लगबग सुरू आहे. यावर्षी पोषक हवामानामुळे तूरीवरील औषध फवारणी खर्च कमी झाला आहे. त्यामुळे तूर पिक शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरत आहे.



### पोषक हवामान शेतकऱ्यांसाठी लाभदायक

यावर्षी सर्वच नक्षत्रातील पावसाने दमदार हजेरी लावल्याने खरीप व रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली. रब्बी हंगामात पिकांना पोषक वातावरण असल्याने गहू, ज्वारी व हरभरा पिकांची वाढ उत्तम होत आहे. त्यामुळे औषध फवारणी खर्चातही बचत होत आहे.

**- प्रभाकर कोरे,** शेतकरी, मंद्रुप

रब्बी हंगामातील पावसाने दडी मारल्याने ज्वारी, हरभरा पिकांच्या पेरणी क्षेत्रात घट झाली आहे. तर बागायत गहू पिकाची पेरणी क्षेत्रात वाढ झाली आहे. आठवडाभरातील थंडीमुळे हरभरा व गहू पिक जोमात दिसून येत आहे. शिवाय त्यांची वाढही उत्तम होत आहे.

ज्वारी पिकाला पावसाची प्रतीक्षा असून पाऊस झाल्यास अधिक उत्पादन मिळणार आहे. म्हणून शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे.



### केंद्र सरकारच्या केळी पी अक कृषी निर्यात क्षेत्रात जिल्ह्याचा समावेश करावा

#### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ डिसेंबर-**

केंद्र सरकारने निर्यातीस चालना देण्यासाठी राबवलेल्या क्षेत्रनिहाय विकास कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्याचा केंद्र सरकारच्या केळी पिकाच्या कृषी निर्यात क्षेत्रात समावेश करावा अशी मागणी खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली आहे. त्या संदर्भात नवी दिल्ली येथे वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांची भेट घेवून चर्चा करून खा. मोहिते-पाटील यांनी निवेदन दिले.

सोलापूर जिल्ह्यात केळी लागवडीखालीत क्षेत्रात प्रचंड वाढ होत असून सुमारे १९ हजार हेक्टर क्षेत्र केळी पिकाखाली आलेले आहे. महाराष्ट्रातील एकुण केळी निर्यातीपैकी सुमारे ५८ टक्के निर्यात सोलापूर जिल्ह्यातून होते. गेल्या वर्षी महाराष्ट्रातून सुमारे ११ लाख २३ हजार ५२४ हजार मेट्रीक टन केळी एक्सपोर्ट झाली. यातील सुमारे ६ लाख ४८ हजार २६२ मेट्रीक टन केळी सोलापूर जिल्ह्यातून एक्सपोर्ट झाली आहे. एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत राज्यातून सुमारे २५ हजार कंटेनर केळीची निर्यात झाली. त्यातील १६ हजार कंटेनर केळी जिल्ह्यातून निर्यात झाली आहे.



## १०३ माथाडी कामगारांनी घेतला क्षयरोग शिबिराचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
सोलापूर रेल्वे रामवाडी मालधक्का येथे सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागच्या व सोलापूर रेल्वे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्षय रोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत १०३ माथाडी कामगारांसाठी मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

महानगरपालिकेचे क्षय रोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांच्या देखरेखीखाली या कार्यक्रम ाचे आयोजन केले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सोलापूर रेल्वे विभागचे सिनिअर डी. सी. एम. योगेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याच बरोबर या शिबिरास जिल्हा ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष उदयशंकर चाकोते, सोलापूर जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे सचिव प्रकाश आवळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यामध्ये प्रामुख्याने ड्रायव्हर्स, कॅरियर्स, हेल्पर्स आणि माथाडी कामगार यांचा समावेश होता. या शिबिरात सर्वांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी, निदान आणि औषधांचा वितरण करण्यात आले. शिवाय उपस्थित डॉक्टरांनी माथाडी कामगारांना श्वासोच्छ्वास व्यायामाचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी उपस्थित माथाडी कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी, वैद्यकीय अधिकारी, डॉ. शिप्रा पिंजरकर , डॉ. सागर चुंगी, डॉ. पुत्रा शेळगे, देगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली बेंद्रे यांनी केले. त्याचबरोबर रेल्वे मुख्य माल परिवेक्षक सलीम काझी, दीपक मिश्रा व इतर कर्मचारीगन नखिल टिकोळे, संचित साबळे, योगेश कोनापुरे, शैलेश पुनाळे यांच्या मदतीने हे अरोग्य शिबीर यशस्वी झाले.

# रोड स्वीपर गाड्या धुळखात; डफरीन हॉस्पिटल आवारात अस्वच्छतेचे दर्शन

- या गाड्या हटविण्यास पालिकेला मुहूर्त मिळेना
- स्वच्छता मोहीम इथेही राबविण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूती गृह (डफरीन हॉस्पिटल)च्या आवारात गेल्या अनेक वर्षापासून महापालिकेच्या २ रोड स्वीपर मशीन गाड्या गंजत पडून आहेत. या भंगार गाड्यांमुळे या हॉस्पिटलच्या परिसरात अस्वच्छतेचे विदारक दृश्य दिसून येते. या गाड्या हटविण्यास पालिकेला मुहूर्त मिळत नसल्याचे चित्र आहे.




सोलापूर महापालिकेने गेल्या दहा वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करत २ रोड स्वीपर मशीन खरेदी केल्या होत्या मात्र त्या काही म हिन्यातच बंद पडल्या. स्वच्छता करणारे ब्रश व इतर कारणास्तव मेंटेनन्स करता येऊ शकत नसल्याने कायम स्वरूपातच म हापालिकेच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृहाच्या आवारात धुळखात पडून आहेत.

गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणी या दोन स्वीपर म शीन वाहन गंजत पडून आहेत. या दोन गाड्या बंद पडल्याने महापालिकेला लाखोचा भुर्दंड झाला. अनेक वर्षे उलटले तरीही दुरुस्ती होतच नसल्याने येथे गाड्या इथेच गंजत पडून आहेत. वाहनांची दुरवस्था झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासून या स्लीपर मशीन गाड्या हॉस्पिटलच्या मधोमध पडून असल्याने या वाहनांच्या आजूबाजूला अस्वच्छता निर्माण झाली आहे. यामुळे मच्छर वगैरे निर्माण होत आहे.

मध्यवर्ती वर्दळीच्या ठिकाणी अस्वच्छतेचे दर्शन घडत आहे. यामुळे महापालिकेने विशेष स्वच्छता मोहीम येथेही राबविण्याची गरज वर्तवली जात आहे. वास्तविक पाहता हॉस्पिटल म्हटलं की आरोग्यदायी, स्वच्छ, प्रसन्न असे वातावरण असले पाहिजे. विशेष म्हणजे याच ठिकाणी बालाजी अमाईन्स कंपनीच्या सहकार्याने कोट्यावधी रुपये खर्च करून येथील प्रसूतिगृह अत्याधुनिकरण करण्यात आले आहे. यामुळे येथील वातावरण, परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवणे आवश्यक आहे. या परिसरात हॉस्पिटल आणि जन्म मृत्यू दाखला कार्यालयासाठी नागरिकांची मोठी वर्दळ असते. इतकेच नव्हे येथेच महापालिका झोन कार्यालय आहे. तरीसुद्धा या आवारात ही वाहने धूळखात पडून असल्याने अस्वच्छतेचे विदारक चित्र पहायला मिळते. या हॉस्पिटल ऐवजी इतर ठिकाणी या गाड्या हलवण्याची आवश्यकता आहे.

## हिंद केसरी पै. समाधान पाटील यांना उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
वाळू उपसा करण्यासाठी भीमा नदीच्या पात्रालागत शेती असणाऱ्या शेतकऱ्याने नदी पात्रात जाण्यासाठी रस्ता देण्यास नकार दिला म्हणून त्यास मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी हिंद केसरी पैलवान समाधान पाटील (रा. नजीक पिंपरी, ता. मोहोळ) यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या अट्रोसिटी प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या प्रकरणाची हकीकत अशी की, यातील फिर्यादी यांची भीमा नदीचे पात्रालगत शेती आहे. आरोपी समाधान पाटील यांना नदीच्या पात्रातून वाळू उपसा करायचा होता म्हणून ते फिर्यादीच्या शेतातून रास्ता मागत होते. परंतू फिर्यादी यांनी त्यास नकार दिल्याने पै. समाधान पाटील यांनी फिर्यादिस बेगमपूर येथील हॉटेलमध्ये बोलवून घेऊन जातीवाचक शिवीगाळ करून म ारहाण केली अशी फिर्याद कामती पोलीस स्टेशनला दाखल झाली होती. आरोपी समाधान पाटील यांनी सोलापूर सत्र न्यायालयात केलेला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. त्यानंतर आरोपी पै. समाधान पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन अर्जासाठी धाव घेतली होती. या अटकपूर्व जाम ीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्यासमोर झाली. जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील ड. जयदीप माने यांनी युक्तिवाद केला की आरोपीचा उत्कर्ष सहन होत नसल्यामुळे त्याचा मत्सर करणाऱ्या लोकांनी फिर्यादीला हाताशी धरून खोटी केस केलेली आहे. न्यायमूर्तींनी सरकारी पक्ष, फिर्यादीचे वकील व आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून आरोपी समाधान पाटील यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. याप्रकरणी आरोपी पै. समाधान पाटील यांच्यातर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारपक्षातर्फे ॲड. रश्मी तेंडुलकर यांनी काम पाहिले.



## कॉलेज ऑफ फार्मसी येथे राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर येथे इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल व राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिन साजरा करण्यात आला.

प्रदूषणाच्या धोक्यांबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी, पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण दिवस म्हणून साजरा केला जातो. ''स्वच्छ हवा, हरित पृथ्वी; शाश्वत जीवनाच्या दिशेने एक पाऊल'' हा सन २०२४ साठी राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिवसाचे संदेश आहे.यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नंदिनी पाटील, शुभांगी पारशेट्टी, कुशल नरवणे, आयुष कुलकर्णी, श्रीदत्त स्वामी, जयश्री साठे, मयुरी मिरजकर व मिसबा ढाले यांनी प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसान व त्याच्या नियंत्रणासंबंधी भाषण, कविताच्या माध्यमातून पृथ्वी, जल व वायूवर होणाऱ्या प्रदुषणाबद्दल जागरुकतेपर भाष्य केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील होते.` सूत्रसंचालन कश्मिरी काटेकर आणि आभारप्रदर्शन श्रीनिधी पट्टणशेट्टी यांनी केले.

## दोन लाखांसाठी पत्नीचा छळ

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर -**
दोन लाख रुपयांसाठी पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत भाग्यश्री प्रमोद शेटे (वय ३०, रा. समाधान नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती प्रमोद शेटे, सासू सुनंदा शेटे, दीर महेश शेटे (रा. बदलापूर, ठाणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑगस्ट २०२१ ते २६ एप्रिल २०२४ या कालावधीत भाग्यश्री या बदलापूर येथे सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व त्याच्या घरातील लोकांनी भाग्यश्री हिस नविन घर घेण्यासाठी २ लाख रुपये माहेरून आण म्हणून छळ केला. पैसे नाही आणले तर नांदविणार नाही असे म्हणून भाग्यश्रीला जेवण न देणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे असा मानसिक व शारीरीक त्रास दिला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## 'मी सोलापूर, माझे सोलापूर' परिवर्तन व विकास समितीचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
आजपर्यंत सोलापूरच्या विकासासाठी व शहरवासीयांच्या मूलभूत गरजा सोडविण्यांचा कोणताही राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी प्रामाणिक प्रयत्न केले नाही. त्यामुळे मी स्वतः सोलापूरकरांना सोबत घेऊन सोलापूर शहराचा विकास व परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही 'मी सोलापूर म ाझे सोलापूर' परिवर्तन व विकास समितीचे संस्थापक व निमंत्रक विष्णू कारमपुरी यांनी समितीच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी प्रास्ताविक भाषणात दिली.

मी सोलापूर माझे सोलापूर या समितीचे उद्घाटन २ डिसेंबर रोजी (पद्मशाली चौक) येथील कार्यालयात डॉ. राजेश फडकुले, आर्किटेक्चर अतुल कोटा, राजशेकर रोडगीकर, निवृत्त डीवायएसपी विश्वनाथ राठोड, निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल चव्हाण, प्रा. मधुकर जक्कन, पत्रकार सुरक्षा समितीचे अध्यक्ष यशवंत पवार, स्वरांजली चॅनलचे दयानंद मामड्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत व वेद ब्राह्मण बोल्ली (पंतुलू) यांच्या वेदमंत्र पठणाने विष्णू कारमपुरी यांच्या हस्ते श्री भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कारमपुरी यांनी शेवटी पुढील कामकाजाची रूपरेषा व उद्देश लवकरच जाहीर करण्यात येईल, असे सांगताना सामाजिक कार्यकर्त्यांनी आपले सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा. श्रीशैल वाघमोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन रेखा आडकी यांनी केले.




## 'अभाविप'च्या प्रदेश अधिवेशन लोगोचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**
अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ५९ वे प्रांत अधिवेशन सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशाला येथे.

येत्या २३ ते २५ डिसेंबर रोजी होणार आहे. या अधिवेशनाचे लोगो प्रकाशन क्षेत्रीय संघटन मंत्री गीतेश चव्हाण, प्रांत संघटन मंत्री मित ठक्कर, प्रदेशसह मंत्री आदित्य मुस्के, प्रदेश सहमंत्री शुभंकर बाचाल, स्वागत समिती सचिव सुहास जोशी, व्यवस्था प्रमुख चन्नवीर बंकुर, अधिसभा सदस्य बिराजदार यांच्या हस्ते झाले.

यावेळी व्यासपीठावर महानगर मंत्री यश उडणशिव महानगर अध्यक्ष प्राध्यापक प्रशांत चाबुकस्वार आदी उपस्थित होते.



सोलापूर : दिव्यांग सहाय्यता दिनानिमीत्त जिल्हा परिषदेतील दिव्यांग, मुक व कर्णबधीर कर्मचारी यांचा ग्रामीण पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील महिला कर्मचारी यांनी सन्मान केला.

## ईव्हीएम हटाव बॅलेट पेपर लाओ लोकशाही बचाव

### वंचित बहुजन आघाडीचे अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**
राज्यात नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पाडल्या. राज्यात महाविकास आघाडीसाठी अनुकूल वातावरण असताना, महायुती सरकारला मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. यावरून ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड केल्याचा दावा केला जात असून ईव्हीएम मशीन हटावचा नारा दिला जात आहे.



**मोहिमेद्वारे जिल्हा पातळीवर उभारणार जन आंदोलन**
ईव्हीएम मशीन विरोधात सोलापूर जिल्हा पातळीवर बैठक घेऊन मोठे जन आंदोलन उभारण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. जिल्हास्तरावर तालुका स्तरावर आणि गाव पातळीवर बैठक घेऊन यासंबंधी कामकाज केले जाणार आहे.
**- चंद्रशेखर मडीखांबे, वंचित जिल्हाध्यक्ष**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांच्या आदेशाने संपूर्ण राज्यभर दि. ३ ते १६ डिसेंबर रोजी पर्यंत ईव्हीएम हटाव लोकशाही बचाव यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने आज महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्याच्या प्रत्येक गाव खेड्यातून ईव्हीएम हटाव च्या संदर्भात स्वाक्षरी घेऊन मोठे जनांदोलन उभारण्यात येणार आहे. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, महासचिव अनिरुद्ध वाघमारे, महिला जिल्हाध्यक्ष श्वेता राजगुरू, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महासचिव विनोद इंगळे, काम गार संघटनेचे महासचिव सुरज आरखराव आदी उपस्थित होते.

# अगोदर सुविधा द्या; नंतर भाडे वाढ करा

### ● प्रवाशांचे खडेबोल; एसटीच्या १४.१३ टक्के भाडेवाढीस लागणार ब्रेक?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर**
सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या वतीने सा सार्वजनिक प्रवासी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, सर्वत्र काहूर माजले आहे. आधी सुविधा द्या नंतर भाडेवाढ करा अशी मागणी आता सर्वसामान्य प्रवासी आणि जनतेमधून जोर धरू लागली आहे.

**बसेसमध्ये सर्व सुविधा पुरवा**
सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी एसटी महामंडळाने प्रवाशांना सर्व सुविधा पुरवाव्यात. एसटी स्टँड परिसर आणि एसटी बसेसमध्ये स्वच्छता करण्यात यावी. त्याच पद्धतीने स्टैंडवर सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. एसटी स्टँड आणि आगारातील वाहनतळ खड्डे मुक्त करावे सर्वत्र स्वच्छता ठेवावी त्यानंतर खुशाल भाडेवाढ करावी.
**-अशोक स्वामी, प्रवासी**

**लाडक्या बहिणीच्या योजनेची वसुली करू नका**
एसटीच्या प्रवासी भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे कळत आहे. राज्य शासनाने लाडकी बहिणी योजना राबवून, माहागाई वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने लाडक्या बहिणीच्या योजनेची वसुली करू नये ? असा प्रश्न आता यावरून उपस्थित होत आहे. असे असेल तर, शासनाने सदरचा भाडेवाढ प्रस्ताव रद्द करावा.
**-विना पाटील, प्रवासी**

दरम्यान, एसटी म हामंडळाने गत तीन वर्षात कोणतीही प्रवासी भाडेवाढ केली नाही. तसेच यंदाच्या दिवाळी हंगामात देखील हंगामी भाडेवाढ केली नाही. त्यामुळे यंदाच्या वर्षी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील एसटी महामंडळाच्या प्रवासी भाड्यामध्ये तब्बल १४.१३ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे.

मात्र आता हा प्रस्ताव मागे पडणार असल्याचे दिसत आहे. कारण राज्यभर या भाडेवाढी विरोधात तीव्र विरोध होत आहे. आधी सुविधा पुरवा नंतर भाडेवाढ करा. असे म्हणणे ऐकण्यास मिळत आहे. आगारातील तसेच एसटी स्टँडवर सर्व सुविधा पुरवाव्यात. स्टॅन्ड तसेच आगारात पडलेले खड्डे, अस्वच्छता दूर करावी. तदनंतर प्रवासी भाडेवाढ करण्याचा प्रस्ताव द्यावाअसे बोलले जात आहे.



उद्यापासून भव्य प्रारंभ
WILDFIRE COMING 05 DEC
भागवत उमामंदिर
7.00 AM | 10.45 AM | 2.30 PM | 6.15 PM | 10.00 PM


ॲडव्हान्स बुकींगसाठी संपर्क : 9158142780
प्रेशकांसाठी खास सेल्फी पॉईंटची सोय

WILDFIRE COMING 05 DEC
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
उद्यापासुन आयकॉन स्टारचा तेलगू ॲक्शन धमाका
सकाळी.८. दु १२,३||,९ वा


थियटवर दिवसभर ॲडव्हान्स बुकींग चालु आहे ग्रूप बुकिंगसाठी कॉल करा
7028810756,9970003525
खास प्रेशकांसाठी सेल्फी पॉईंटची सोय
शेवटचे १ दिवस -लकि भास्कर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोन्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

माहेरून सोने आणण्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पुजा बसवराव जाधव (वय २७, रा. माने वस्ती, सम्राट चौक, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती बसवराज जाधव, सासू शोभा, दीर संतोष (रा. मड्डी, सुलर जवळगे, ता. अक्कलकोट), नणंत आश्विनी माने, पतीचे मामा भोलप्पा भंजत्री (रा. शिडशाड, ता. इंडी, जि. विजयपूर, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ डिसेंबर २०२२ ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत पुजा या त्यांच्या सासरी मड्डी येथे नांदण्यास होत्या. त्यावेळी पती व इतरांनी किरकोळ कारणांनी पुजा हिस घालून पाडून बोलून शिवीगाळ व मारहाण केली. तसेच नणंद अश्विनी हिने पुजा हिने माहेरून सोने घेऊन यावे म्हणून तिला टोचून बोलून शिवीगाळ केली व पती बसवराज यांचे मामा भोलप्पा याने पुजाला शिवीगाळ करून मारहाण केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक येळे पुढील तपास करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त उद्या कँडल मार्च, विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

येथील त्रिरत्न बौध्द महासंघाच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ५ डिसेंबरला सायंकाळी सात वाजता शांती कँडल मार्च (मूकपद यात्रा) काढण्यात येईल. फॉरेस्ट येथील डॉ. आंबेडकर हायस्कूलपासून धम्मचारी करूणादित्य यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून ही यात्रा निघणार आहे. डॉ. आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून कँडल मार्चचा समारोप होईल. तसेच ६ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता सुवर्णदीप बुद्ध विहार अवसे वस्ती आमराई येथे पुण्याचे धम्मचारी आदित्यबोधी यांचे प्रवचन होईल. ७ डिसेंबरला डॉ. आंबेडकर सोसायटी अंत्रोळीकर येथे धम्म मित्रासाठी कार्यशाळा होईल. ८ डिसेंबरला सकाळी शिवाजीनगर मोदी खाना येथे धम्म अभ्यासाचे वर्ग होतील. ९५२७४८५९४६ या मोबाईलवर संपर्क साधावा.

### अक्कलकोट रोडवर चारचाकीने अनेक वाहनांना ठोकरले

**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

अक्कलकोट रोडवर चारचाकी वाहनाने रिक्षा व तीन दुचाकींना ठोकरल्याने झालेल्या अपघातात तीन जखमी झाले. हा अपघात मंगहवारी दुपारी तीनच्या सुमारास झाला. सुनिल राम गावडे (वय ५४, रा. रमन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर), जाविद अब्दुलगनी बागवान (वय ४५, रा. कर्णिक नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर), सादीक महिबुबसाब शेख (वय ५०, रा. कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) अशी जखमींची नावे असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील जखमी हे सर्वजण अक्कलकोट नाका येथील बिराजदार हॉटेलजवळ थांबले होते. त्यावेळी अक्कलकोटकडून सोलापूरकडे जाणाऱ्या एमएच १३ एझेड ५१५३ या चारचाकी कारच्या चालकाने कार भरधाव व निष्काळजीपणे चालवून एमएच १३ सीटी १६७७ क्रमांकाच्या रिक्षाला व एमएच १३ ईबी ३६६५, एमएच १३ ईबी ६२५१ आणि आणखी एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात वरील तिघेजण जखमी झाल्याने त्यांना उत्तम गावडे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील तरूणी जखमी

**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

चारचाकी वाहनाच्या धडकेने घराकडे दुचाकीवरील जाणारी तरूणी जखमी झाली. ऐश्वर्या राजकुमार भोसले (वय २५, रा. कर्णिक नगर, सोलापूर) असे जखमी तरूणीचे नाव आहे. ऐश्वर्या भोसले या मंगळवारी दुपारी दोनच्या सुमरास अक्कलकोट रोडवरील सादूल पेट्रोल पंपासमोरू स्वतःच्या दुचाकीवरून घरी जात होत्या. त्यावेळी एका अज्ञात चारचाकी वाहनाने ऐश्वर्या यांच्या दुचाकीला धडक दिली. यामध्ये ऐश्वर्या भोसले यांच्या सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना वडील राजकुमार भोसले यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सोलापूर बाजार समितीत कांद्याची ११ कोटींची उलाढाल, सरासरी दर रु.२६००

**● पावसाच्या भीतीपोटी व चांगला दर मिळण्यासाठी शेतकरी करत आहे काढणीची घाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**






देशातील फेंगल चक्रीवादळाने राज्यात पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. त्याचे परिणाम स्वरूप गेल्या काहीं दिवसांपासून दिवस दिवसभर ढगाळ वातावरण जाणवत आहे. काही ठिकाणी हलक्या सरींचा शिडकावाही झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील कांदा विक्रीसाठी सोलापूर बाजार समितीत आणण्यास सुरुवात केली आहे. आज मंगळवार दि.३ डिसेंबर रोजी ४४३ ट्रक मधून सुमारे ८८ हजार ६८८ क्विंटल इतक्या कांद्याची आवक बाजार समितीत आली होती. त्याला सर्वात कमी ५०० ते सर्वाधिक ७५०० आणि सरासरी २६०० इतका दर मिळाला. एकूण उलाढाल ११ कोटी ५२ लाख ९०८ इतकी झालीय. मात्र सद्यः स्थितीत बाजार समितीमध्ये कांद्याची आवक स्थिर असल्याची माहिती बाजार समितीचे सचिव दत्तात्रेय सूर्यवंशी यांनी दिली.

दरम्यान, सोमवारची पहाट उजाडण्यापूर्वीच सोलापूर बाजार समितीच्या आवारात ५८७ ट्रक कांदा आला. ५८ हजार ७०८ क्विंटल कांद्याचा सकाळी लिलाव झाला. क्विंटलला किमान ५०० ते कमाल ७ हजार रुपयांचा दर मिळाला होता. ज्या शेतकऱ्यांनी कांदा काढून चाळणीला ठेवलेला होता तो भिजण्याच्या भीतीने बाजारात आणला. शिवाय चांगला दर असल्याने मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक झाली. रविवारी बाजार समितीला सुटी होती. तरीदेखील रात्रीच काही वाहने येऊन धडकली होती. सोमवार आणि मंगळवारी पहाटे तर वाहनांची वर्दळ दिसून आली.

### नव्या कांद्यापेक्षा जुन्या कांद्याला सर्वाधिक मागणी व दर

सोलापूर उत्पन्न बाजार समितीत नव्या कांद्यापेक्षा जुन्या कांद्याला सर्वाधिक मागणी आहे. त्यामुळे जुन्या कांद्याचा दर हा वधारला आहे. सद्यस्थितीत बाजार समितीमध्ये नव्या कांद्याला ५००० रुपयापर्यंत घाऊक दर मिळत आहे. तर जुन्या कांद्याला ७५०० इतका घाऊक दर मिळत आहे. सदरचा दर मिळविण्यासाठी शेतकरी आपल्या शेतातून कच्चा कांदा विक्रीसाठी बाजारपेठेत आणत आहे. त्यामुळे कांद्याची प्रतवारी घसरत आहे. त्याचा परिणाम कांद्याच्या दरावर होत असल्याचे सांगण्यात येत आहे.

| बाजार समितीत आलेली कांद्याची आवक | |
|---|---|
| २९ नोव्हेंबर | ३७१ ट्रक |
| ३० नोव्हेंबर | ४८० ट्रक |
| २ डिसेंबर | ५८७ ट्रक |
| ३ डिसेंबर | ४४३ ट्रक |

# खराडी येथे १६ डिसेंबरला मोफत दिव्यांग शिबिर

**रा.स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर,**



भारत विकास परिषदेच्या विकलांग केंद्राच्या वतीने सोमवार दि. १६ डिसेंबर रोजी खराडी (पुणे) येथील ढोले पाटील कॉलेज इऑन आयटी पार्क येथे दिव्यांगाना अत्याधुनिक कृत्रिम मॉड्युलर, पाय - हात, कॅलिपर मोफत बसविण्यासाठी राज्यस्तरीय दिव्यांग शिबिराचे आयोजन केले आहे, अशी माहिती सोलापूरचे अध्यक्ष महादेव न्हावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हा उपक्रम आयोजित केला आहे. सोमवारी १६ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे या शिबिरास भेट देणार आहेत. याप्रसंगी रौप्य महोत्सवी वर्षाचा समारोप सम रंभात त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. दिव्यांगाना कृत्रिम अव्यय बसविणे हा प्रमुख राष्ट्रव्यापी सेवा प्रकल्प आहे. पुण्यातील या शिबिरात १ हजार दिव्यांगांचे उद्दिष्ट आहे. लाभार्थ्यांना कोणतेही आर्थिक निकष नसून राज्यातील सर्व होतकरू दिव्यांग यात सहभागी होऊ शकतात. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगांनी स्वतः पूर्व नोंदणी करणे आवश्यक असून अधिक माहितीसाठी साठे - ९१ ७५ ५५ ८३ ५६, अनिकेत - ९४ २२ ७९ ७१०६, राजेंद्र - ८५ ५१ ०६ ४२ ०४ या नंबर वर संपर्क साधावा असे आवाहन न्हावकर यांनी केले आहे. गेल्या पाच वर्षापासून परंपरागत जयपुर फूट ऐवजी ५० हजार रुपयांचा अत्याधुनिक कृत्रिम मॉड्युलर, पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर मोफत बसविण्यात येतात. या शिबिरासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस, ब्रिज नेक्स्ट, ऑटो हँगर, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, वात्सल्य ट्रस्ट, रोटरी क्लब पुणे हेरिटेज यांचा आर्थिक सहयोग लाभला आहे.या पत्रकार परिषदेस गौरी आमडेकर, लक्ष्मीकांत कुर्रा, सुधीर देव, रवींद्र नाशिककर, श्रीकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.





# बाळे खंडोबा मंदिरात घटस्थापना, दीपसोहळा

**● श्रींच्या दर्शनासाठी अबालवृद्ध भाविकांच्या लागल्या रांगा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर,**

श्री क्षेत्र बाळे येथे मार्गशीर्ष महिन्यात खंडोबा देवाची यात्रा सालाबाद प्रमाणे भरत असते. शनिवार दि.७ डिसेंबर रोजी चंपाषष्ठी सोहळा आहे. या सोहळ्याच्या ५ दिवसांपूर्वी श्री क्षेत्र बाळे खंडोबा मंदिरात घटस्थापना व दीपप्रज्वलित करण्याचा धार्मिक विधी पार पडला. सोमवारी सकाळी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. श्री क्षेत्र बाळे येथील मानकरी व भाविकांच्या घरात आजपासून पाच दिवस घटस्थापना व दीपप्रज्वलन केली गेली.

दरम्यान, या पाच दिवसांच्या काळात भाविक उपवास व्रर्तव्यकल्य करत असतात. शेवटी चंपाषष्ठीला उपवास सोडतात. यावेळी श्रींना भरीत रोडगा, पुरण पोळीचा नैवेद्य दाखविण्याचा मान असतो. खंडोबा बाळे मंदिरात सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी अबालवृद्ध भाविकांनी येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करीत भंडारा उधळून देवाचे दर्शन घेतले.

### नवदांपत्यांनी श्रींचे दर्शन घेऊन केली सुखी संसाराची सुरुवात

दिवाळीतील तुळशी विवाह संपन्न झाल्यानंतर लग्नसराई सुरू झाली आहे. गत महिन्याभरात अनेक लग्न समारंभ संपन्न झाले. लग्न समारंभ संपन्न झाल्यानंतर नवविवाहित दांपत्यांनी आपल्या कुलदैवतासह शहरातील इतर देवतांचे देखील दर्शन घेऊन सुखी संसाराची सुरुवात केली. त्याच अनुषंगाने तीर्थक्षेत्र श्री खंडोबा देवस्थान बाळे येथे देखील नवविवाह दांपत्यांची श्रींचे दर्शन घेण्यासाठी गर्दी होती. नवविवाहित जोडप्यांनी श्रींचे दर्शन घेऊन संसार सुरू केला.

### यात्रा कालावधीत भाविकांची गर्दी

पदार्थाचा नैवेद्य असतो. आठ तारखेला पहिला रविवार यात्रेचा असतो. एकूण चार रविवार यात्रेचे आहेत. सोलापूरसह राज्याच्या अनेक शहारातून, कर्नाटक आणि बाहेरच्या देशातील भाविक दर्शनासाठी येतात. सौरभ पुजारी, खंडोबा देवस्थान ट्रस्टी अध्यक्ष विनय ढेपे नियोजन करीत आहेत.

**- विनय ढेपे, अध्यक्ष श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान बाळे**

# लाडक्या बहिणीला लागले पुढील हप्त्याचे वेध

**▸ गेमचेंजर लाडकी बहिण योजना अडकली प्रश्नांच्या वर्तुळात**
**▸ योजनेचे नियम बदलल्याने होतीय सर्वत्र एकच चर्चा**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

महायुतीसाठी विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढील पुढील काळात चालू राहील का?, लाडक्या बहिणीचा निधी मिळणार का?, सदरचा हप्ता कधी मिळणार याची प्रतीक्षा लाभार्थी महिलांना लागून राहिली आहे. त्यातच महायुतीला मोठे बहुमत मिळाल्यानंतर आता या योजनेचे निकष बदलणार असल्याचेही सांगितले जात आहे. परिणामी, लाडक्या बहिणी आता चिंताक्रांत बनाले आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरू करून, महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे पाऊल उचलले आहे. सुमारे ७ हजार इतका निधी महिलांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. त्यानंतर विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाल्याने या काळात योजनांचा लाभ देता येत नसल्याने निवडणूक संपताच खात्यात पैसे जमा करण्याचे आश्वासन सरकारने यापूर्वी दिले होते. नवीन सरकार सत्तेवर येणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सहाव्या हप्त्याबाबत बहिणींमध्ये उत्सुकता लागली आहे. विधानसभा निवडणुकीत ही योजना महत्त्वपूर्ण ठरल्याने महायुती सरकार विक्रमी मताधिक्याने पुन्हा एकदा सत्तेवर आले आहे. आता या लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याची प्रतीक्षा असून, तो खात्यात कधी जमा होणार, याची चर्चा आहे. सरकार पुन्हा सत्तेत आल्यास या योजनेचे पैसे दीड हजार रुपयांवरून २ हजार १०० रुपये करणार असल्याचे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. आता महायुतीचे सरकार आल्याने या योजनेचा हफ्ता वाढणार का? याकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागून राहिले आहे.

### लाडक्या बहिणींना सतावतेय भिती

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेचे निकष बदलणार असल्याचे सध्या सांगितले जात आहे. लाभार्थी महिलेचा पती आयकर भरतो का ? कुटुंबाकडे चारचाकी वाहन आहे का ?एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांनी अर्ज केले आहेत का? विधवा, परित्यक्ता, निराधार महिला व अन्य योजनांचा लाभ घेतला जात असताना या योजनेचा लाभ घेतला जातो आहे का ? असे निकष तपासले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. जर या निकषांतर्गत महिला अपात्र ठरल्या तर त्यांना लाडक्या बहिणीचा हप्ता जमा होणार नाही अशी भीती सतावत आहे.

# सासू वरचढ ठरला जावई !

**● काकांना जे जमलं नाही ते पुतण्याने करुन दाखवले ● आजोबांनी वर्तविलेले भाकीत खरे ठरले**



**कानोसा समाजमनाचा**
**बालसिध्द चिडगुपकर**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने अस्सल सोलापुरी राजकारणात सासू वरचढ जावई ठरल्याची म जेशीर घटना घडली. राज्यभरातील पद्मशाली समाजाच्या पहिल्या महिला महापौर होण्याचा बहुमान भारतीय जनता पार्टीच्या श्रीकांचना यन्नम यांनी गत अडीच ते तीन वर्षापुर्वी मिळविला होता. त्यांचे जावई असलेले आ. देवेंद्र कोठे यांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकीत पद्मशाली सम ाजातील आजवरचे यवा आमदार होण्याचा मान पटकावला. त्यामुळे सोलापूरसह राज्यभरातील राजकीय क्षेत्रात या घटनेविषयी गंमतीदार चर्चे च्या पैऱ्या झाडण्यात येत आहेत. आ. देवेंद्र कोठे हे भारतीय जनता पार्टीच्या कमळ या चिन्हावर सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून आमदारकी पटकावली. त्यांचे आजोबा स्व. विष्णुपंत कोठे हे काँग्रेसचे बडे प्रस्थ होते. त्यांनी काँग्रेस पक्षाच्या तळागाळातील अनेक कार्यकर्त्याना सोलापूर महापालिकेच्या राजकारणात आणले. यातील अनेकांना म हत्वाच्या पदावर संधी दिली. त्यामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग होता. शासन, प्रशासन स्तरावरही त्यांच्या शब्दाला वजन होते. माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या स्थानिक ते केंद्रीय स्तरावरील राजकीय जडणघडणीतही त्यांचा सिंहाचा वाटा होता.

स्व. विष्णुपंत कोठे यांना काँग्रेसने आमदार करावे, अशी इच्छा कोठे यांचे समर्थक आणि इतर पक्षातील अनेक नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची होती. परंतु त्या त्या वेळी राजकोय पुलाखालून वाहून गेलेल्या पाण्यामुळे अखेरपर्यंत स्व. विष्णुपंत कोठे यांना आमदार पदावर संधी दिली गेली नाही. याउलट त्यांच्यापेक्षा सिनिअर्सना आम दार करण्यात काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने धन्यता मानत गेली. स्व. विष्णुपंत कोठे आणि माजी महापौर महेश कोठे यांना आमदार करण्यात काँग्रेसने शेवटपर्यंत हात आखडता घेतला होता.









त्यातच आ. प्रणिती शिंदे यांच्याकडूनही अंतर्गत विरोध होत होता.

या सर्व प्रकाराला कंटाळून स्व. विष्णुपंत कोठे यांच्या हयातीतच माजी महापौर महेश कोठे आणि माजी नगरसवक देवेंद्र कोठे या काका-पुतण्याने काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतले होते. महेश कोठे यांनी काँग्रेस, शिवसेना, अपक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार असे चारवेळा विधानसभेची निवडणूक लढविली. मात्र, प्रत्येकवेळी पराभवाला सामोरे जावे लागले. तर इकडे देवेंद्र कोठे यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करुन पहिल्याच झटकयात आमदार झाले. त्यामुळे काकांना जे जमले नाही ते पुतण्याने करुन दाखविले, असे बोलले जात आहे. स्व. राजेश कोठे हे आ.देवेंद्र कोठे यांचे वडील. डॉ. सूर्यप्रकाश कोठे हे सख्खे तर माजी नगरसेवक प्रथमेश कोठे हे चुलत बंधू, आ. देवेंद्र कोठे हे सन २०२४ साली भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर आमदार होतील, असे भाकीत त्यांचे आजोबा स्व. विष्णुपंत कोठे यांनी खासगीत बोलताना वर्तविले होते. त्यांचे हे भाकीत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत तंतोतंत खरे ठरले. भारतीय जनता पार्टीचे नेते, माजी मुख्यमंत्री देवेंद्र पडणवीस यांनी आ. देवेंद्र कोठे यांना भारतीय जनता पार्टीत आणून सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघात उमेदवारी देत निवडूनही आणले.

# 'त्या' ५२ शाळेतील कंत्राटी शिक्षकांची भरती समायोजनानंतरच

**● प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर**

सोलापूर जिल्ह्यात जवळपास ५२ शाळेत कंत्राटी शिक्षकांची भरती केली जाणार आहे. मात्र ही कंत्राटी शिक्षकांची भरती शिक्षकांचे समायोजन केल्यानंतरच करण्यात येणार आहे. हे मात्र निश्चित झाले आहे. अशी माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली आहे.

दरम्यान, विधानसभेच्या आचार संहितेमुळे कंत्राटी शिक्षकांची भरतीची प्रक्रिया रखडली होती. मात्र, आता आचारसंहिता संपल्यामुळे कंत्राटी शिक्षकांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाने दहा पट पेक्षा कमी शाळेत दोन शिक्षक असलेल्यांची माहिती मागविली आहे. त्याशाळेतील शिक्षकांचे अगोदर समायोजन केले जाणार आहे. त्यासाठी दहा पट पेक्षा कमी असलेल्या मात्र त्या ठिकाणी दोन शिक्षक असतील तर तेथील एका शिक्षकांचे समायोजन दुसऱ्या शाळेत करण्यात येणार आहे. ही समायोजनाची प्रक्रिया पुढील आठवड्यात राबविली जाणार आहे. समायोजन झाल्यानंतर कंत्राटी शिक्षकांच्या भरतीला सुरूवात होणार आहे. कारण हा कंत्राटी शिक्षक त्या गावातील शिक्षकांना प्राधान्य दिले जाणार आहे. दरम्यान, शासनाने नवीन शासन निर्णय काढला असून, त्यानुसार जिल्ह्यातील डीएड. व बीएड उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कंत्राटी शिक्षक नौकरी मिळणार आहे. सदरची नोकरी ही शिक्षकांना अकरा महिने करारावर मिळणार आसल्याचे सांगण्यात आले आहे.

### ३०४ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ

दहा पटसंख्या पेक्षा कमी असलेल्या शाळेतील एका शिक्षकांचे इतर शाळेत समायोजन केले जाणार आहे. समायोजन झाल्यानंतर कंत्राटी शिक्षकांची भरती केली जाणार आहे. याबरोबरच जिल्ह्यातील ३०४ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला. जो दोन वर्षापासून प्रलंबित होता.

**- कादर शेख,**
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६३

**पुत्राचे अपराध । जरी जाहले अगाध ।**
**तरी पिता साहे निर्द्वंद्व। तैसे साहिजो जी ।।**

श्रीमद्भगवद्गीता म्हणजे श्रीकृष्ण भगवंतांनी अर्जुनाला विविध अंगांनी केलेला उपदेश आहे. श्री ज्ञानेश्वरी म्हणजे या श्रीमद्भगवद्गीतेचे मराठी भाषेत रुपांतर आहे, हे जरी सत्य असले तरीही, श्री ज्ञानेश्वरी हा केवळ रुपांतर केलेला ग्रंथ नाही तर समाजातील अनेक समस्यांची, प्रश्नांची उकल श्री ज्ञानदेवांनी अनेक उदाहरणांच्या, अनुभवांच्या सहायाने श्री ज्ञानेश्वरीत केली आहे. श्री ज्ञानेश्वरी म्हणजे केवळ श्रीमद्भगवद्गीतेचे मराठीकरण असते, तर आज वाचकांची संख्या सातत्याने वाढत गेली नसती. एक-दोनदा गीतेचा अर्थ मराठीत समजून घेऊन वाचक थांबले असते. पण या ज्ञानेश्वरीमध्ये समाजातील सर्व बाबींचे प्रतिबिंब अत्यंत उत्कृष्ट प्रकारे व आपल्या ऱ्हदयाला झेपेल अशा प्रकारे माऊलींनी रेखाटले असल्याने ही ज्ञानदेवी अमर झाली आहे. समाज जिवनाचा एक अविभाज्य घटक बनण्याचे सामर्थ्य या ज्ञानदेवीमध्ये आहे. माऊलींना अशा अनेक ओव्या सूचल्या आहेत की, ज्या ओव्यांना आपण जणू काही माझ्यासाठीच लिहिल्या आहेत की काय, असे वाचकांना वाटते. उदाहरण म्हणून आजची ओवीच पहा, माऊली म्हणतात, पुत्राचे अपराध । जरी जाहले अगाध । तरी पिता साहे निर्द्वंद्व । तैसे साहिजो जी ।।. अर्थात, पुत्राचे आपराध कितीही जरी मोठे, अगाध असले तरीही बाप त्याच्याशी वैर न करता, ते अपराध तो सहन करतो, आपल्या पोटात घालतो. माऊलींचे हे उदाहरण आपणा सर्वांनाच लागू पडते, यात शंका असण्याचे कारणच नाही, आणि जर ही ओवी आपणाला लागू पडत नसेल तर आपण बाप कसले नि पुत्र कसले?



अर्जुनाने भगवंतांना खूप त्रास दिला, हे सत्य जरी असले तरी भगवंतांना त्याचे काही वाटले नाही. पण अर्जुनाला स्वत:लाच वाईट वाटले. म्हणून तो म्हणतो आहे, हे भगवंता मी तुला न ओळखल्याने मी तुझ्याशी कसाही वागलो, तुला मी वाट्टेल तसे प्रश्न विचारले माझ्याहातून तुझ्याबाबतीत नको ते घडले. हे भगवंता हे सर्व माझ्याहातून केवळ तुझा परिचय न झाल्याने घडले. त्यामुळे तु मला माझ्या वडिलांप्रमाणे माफ कर, कारण तु मला माझ्या वडिलांच्या ठिकाणी आहेस. माऊली, अर्जुनाचा हा लडीवाळपणा, नम्रपणा अत्यंत मार्मिकतेने सांगतांना उपरोक्त ओवींचा आधार घेत आहेत. बापाचे -हदय मुलांचे अपराध सहन करण्याचे सामर्थ्य ठेवते, हे जरी सत्य असले तरीही, पुत्राने सुध्दा विचार करावा की, आपण आपल्या बापाला किती त्रास देतो. आयुष्यभर अपराध सहन करणा-या बापाला म्हातारपणीतरी त्रास दिला जाणार नाही याची काळजी पुत्रांनी घ्यावी. आयुष्यभर अपराध सहन केलेले ऱ्हदय म्हातारपणी थकलेले असते, त्या ऱ्हदयात पुत्रांनी आपले प्रेम भरुन पित्याचे ऱ्हदय तरुण केल्यास पुत्राचा खऱ्या अर्थाने उध्दार होईल यात शंका असण्याचे कारणच नाही. आई वडिलांकडे लक्ष देणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारीच असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. ४ डिसेंबर २०२४ | भारतीय नौदल दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. तृतीया (१३.१०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाषाढा (१७.१४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - गंड (१३.५५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (२५.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या.

# एच.आय.व्ही जनजागृती व संवेदनशीलता ही काळाची गरज

### एड्स प्रबोधन शिबिरातील सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

एड्स हा रोग असाध्य रोग असून तो बरा होऊ शकत नाही. त्याची लस ही नाही मात्र नियंत्रणात ठेवू शकतो व एड्स सहित जगणारी व्यक्ती अनेक वर्षे औषधाच्या साहाय्याने जगू शकते. एड्स झालेल्या लोकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. हा रोग संसर्गजन्य रोग नाही. तसेच हा एकच रोग असा आहे जो कळत किंवा नकळतपणे मानवाच्या चुकीमुळे होतो. जगात १ कोटी, भारतात २५ लाख तर सोलापुरात १७ हजार रुग्ण असल्याची नोंद आहे.

एड्सच्या रुग्णाशी संवेदनशीलतेने वागले पाहिजे. काळजी, दक्षता, निष्कलंक चारित्र्य, जोडीदाराशी निष्ठा या बाबी प्रत्येकाने लक्षात ठेवाव्यात. विवाह करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींनी कुंडली पाहण्यापेक्षा एच.आय.व्हीची तपासणी करून घ्यावी. ही केवळ आरोग्य विषयक समस्या नसून, मोठी सामाजिक समस्या आहे. सामान्य जीवन जगण्याचा त्यांनाही हक्क आहे याचे भान असावे. इतर सामान्य माणसांप्रमाणे त्यांनाही जगता आले पाहिजे म्हणून अशा प्रकारच्या प्रबोधनाची आवश्यकता ही काळाची गरज आहे असा सूर एड्स जनजागृती प्रबोधन शिबिरात उमटला.




सोलापुरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष सोलापूर व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रोटरी क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. राजीव प्रधान आणि फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी शिबिरात कारणे परिणाम व प्रबोधनाची गरज याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे हे होते.

यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. देवराव मुंडे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा पर्यवेक्षक कृष्णा सकट, एम.एन.ई. ऑफिसर दिनेश राठोड, पराग कुलकर्णी, प्रा. डॉ. अनिल कांबळे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रबोधन शिबिर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, प्रा. संतोष मारकवाड, प्रा. डॉ. किशोर पवार, प्रा. डॉ. अशोक भोग, प्रा. सातपुते मॅडम, आकाश गायकवाड, संपूर्ण सुरक्षा योजनेचे प्रकल्प अधिकारी शिवराज कुंभार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या ढेपे यांनी केले तर आभार यांनी प्रा. डॉ. अनिल कांबळे यांनी मानले.



## भारतीय जैन संघटना विद्यादानासारखे शैक्षणिक उपक्रम राबविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

भारतीय जैन संघटना सोलापुरात पुढील २ वर्षासाठी अनेक सामाजिक व लोकहिताचे उपक्रम राबविणार असल्याचे राज्यकार्यकारणी सदस्य श्याम पाटील व विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते यांनी सांगितले.

पुण्यात भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार शरद पवार, लोकमत समुहाचे विजय दर्डा, अभिनेता अमीरखान, उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ, उद्योजक प्रकाश धारिवाल, संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथ्था यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या अधिवेशनात पुढील २वर्षासाठी कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच विद्यादान सारखे अनेक शैक्षणिक उपक्रम राबविणार आहेत. यावेळी सोलापुरातील संघटनेचे केतनभाई शहा, शाम पाटील, अभिनंदन विभूते, देशभूषण व्हसाळे, अशोक भालेराव, वालचंद पाटील, विक्रांत बशेट्टी, कोमल पाचोरे, प्रशांत वर्धमाने, माया पाटील, मानसी शहा, निर्मला मेहता, अरुण धुमाळ, महावीर नळे, सुरज व्हसाळे, सुजाता देशमाने आंदीची उपस्थिती होती.

## वालचंद महाविद्यालयात ओपन हाऊस उपक्रमाद्वारे पालक, विद्यार्थ्यांचे मूल्यमापनात्मक समुपदेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयात ११वी व १२वी कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थी व पालकांसाठी ओपन हाऊस उपक्रमाद्वारे पालक, विद्यार्थ्यांचे मूल्यमापनात्मक समुपदेशन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रातील वर्गातील उपस्थिती, शैक्षणिक गुणात्मक प्रगती याची कल्पना देऊन, मंथली टेस्ट व प्रथम सत्र परीक्षा यांच्या मूल्यमापन केलेल्या उत्तर पत्रिका विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना, प्रत्यक्ष अवलोकनार्थ दाखवल्या. त्यानंतर, प्रत्येक विद्यार्थ्याला व त्यांच्या पालकांना विषय शिक्षकांनी, वैयक्तिक समुपदेशन करून, त्याच्या त्रुटी लक्षात आणून देऊन, अभ्यासात व उत्तरपत्रिका लेखनात कशाप्रकारे सुधारणा करू शकतो, याची याप्रसंगी संपूर्ण मार्गदर्शन/माहिती दिली. ११वी व१२वीतील प्रत्येक विषयानुरूप, स्वतंत्र वर्गात विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या बैठक व्यवस्थेचे नियोजन उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या मार्गदर्शनानुसार केले होते.



रविवारचा सुट्टीचा दिवस असून सुद्धा, कला व विज्ञान शाखेतील, ४५०हून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी व पालकांनी आवर्जून उपस्थित राहून, महाविद्यालयाचा ओपन हाऊस हा उपक्रम यशस्वी केला. उपस्थित काही पालकांनी याप्रसंगी हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल उपक्रमाचे, संस्थेचे, महाविद्यालयाच्या व्यवस्थापन कौशल्याचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक लेखाजोखा घेण्याच्या संदर्भातील हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी याप्रसंगी नमूद केले.

## आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती शिबीर १० डिसेंबरपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने दहा डिसेंबरपासून दुसरे आनंद अनुभूती शिबीर एस.पी.एम. इंग्लिश स्कूल येथे सकाळ व संध्याकाळच्या दोन स्वतंत्र सत्रात सुरु होणार असल्याची माहिती रघुराज चौहान यांनी दिली.

प्रत्येक मनुष्य विविध ताणतणावात जगत असून त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत आहे. सर्व ताणतणावापासून मुक्ती देत आत्मविश्वासाने जीवन जगण्यास प्रेरित करणारे आनंद अनुभूती पहिले शिबीर आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने ह.दे. प्रशालेतील एस.पी.एम. स्कूल नुकतेच येथे पार पडले.



रघुराज चौहान, स्वाती चौहान, अमिता कीलजे, डॉ. रविकांत पाटील, सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवस चाललेल्या या शिबिरात साधकांना ताणतणावापासून कशी मुक्ती मिळवावी, शांत, प्रसन्न मन व स्वस्थ शरीर कसे राखावे, रोगप्रतिकारक शक्तीमध्ये वृद्धी होण्यासाठी करण्यात येणारे योगासन व प्राणायाम, सुदर्शन क्रिया यासह प्रत्येक क्षण आनंदी कसे जगायचे याचे कौशल्य विकसित करण्याचे तंत्राबदल माहिती देण्यात आली. शिबीराच्या समारोप प्रसंगी परमपूज्य श्री. श्री. रविशंकर यांचे संदेशपर व्हिडीओ दाखविण्यात आले. यावेळी एस.पी. एम. इंग्लिश स्कूलचे प्राचार्य शिवानंद शिरगावे यांनी शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या शैक्षणिक व भारतीय संस्कृती प्रचार कार्याची माहिती दिली. शिबिरार्थींचे अनुभव कथन, गायन व भजनाने सांगता झाली. श्रुती शिरगावे स्वाती जाधव, तनुजा शिंदे, कांचन माने, अंजू क्षीरसागर आदी उपस्थित होती.

## दिव्यांग अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत सीईओ संदीप कोहीनकर यांचा चहापान

### दिव्यांग दिनानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर**

जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन च्यावतीने सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणाऱ्या दिव्यांग अधिकारी कर्मचारी यांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा परिषद सोलापूरचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या हस्ते जिल्हा परिषदेमधील दिव्यांग अधिकारी कर्मचारी यांचा विशेष सन्मान करून डायरी व पेन भेट देण्यात आले.

यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा परिषदेच्या प्रगतीमध्ये आपलाही उल्लेखनीय वाटा आहे. त्यामुळे यापुढे देखील असेच चांगलं काम करा, सोलापूर जिल्हा परिषदेचे नाव अधिक उज्वल करावं असे आवाहान करत जागतिक दिव्यांग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संघटनेचे राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी देखील उपस्थित दिव्यांग अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.



यावेळी सर्व दिव्यांग अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सोबत कोहिनकर यांनी चहापान कार्यक्रम केला. याप्रसंगी दिव्यांग कर्मचारी संघटनेचे सचिव लक्ष्मण वंजारी, हरीश मेत्रस, पिराजी सुरवसे, मुशीर कलादगी, मनोज राठोड, भीमाशंकर तेली, राम चव्हाण, आरती माढेकर, प्रज्ञा कुलकर्णी, वीरभद्र हिरजे, रामकृष्ण पाटील, शैलेश पाठक, जयंत पाटील संजय सातपुते,अमित शहा, संतोष निळ, पंकज वेदपाठक, रामकृष्ण पेरला, प्रताप चव्हाण, मनोज राऊत आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक अध्यक्ष तजमुल मुतवली यांनी सूत्रसंचालन डॉ. एस. पी. माने तर आभार प्रदर्शन पिराजी सुरवसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्याध्यक्ष बसवराज दिंडोरे, सचिव विलास मसलकर, राकेश सोडी, श्रीशैल देशमुख, रफिक शेख, वर्षा अवधूर्ती, महानंदा कुंभार, विशाल घोगरे आदींनी परिश्रम घेतले.

## दुचाकी घसरल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि.३ डिसेंबर-**

छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौकात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरूण जखमी झाला. गोपाळ बाबू जानगवळी (वय ३२, रा. मित्र नगर, शेळगी) असे जखमीचे नाव आहे. ३ डिसेंबर रोजी सकाळी गोपाळ जानगवळी हे सिध्दार्थ चौक येथून बाळे येथे कामासाठी जात होते. त्यावेळी जुना पूना नाका येथील संभाजी महाराज पुतळ्याजवळ गाडी स्लीप होऊन खाली पडले. त्यामध्ये जानगवळी यांच्या छातीला व बरगडीला जबर मार लागल्याने त्यांना उपचारसाठी बजरंग बोदीवाले यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# तर प्रातिकात्मक नेपथ्यात भर पडली असती

**भारतीय क्रीडा, शिक्षण व नाट्य मंडळ या संस्थेने 'लपून छपून' हे नाटक सादर केले. या नाटकाचे लेखक हर्ष शिवशरण यांनी केले तर दिग्दर्शक सुमीत फुलमामडी यांनी केले.**

------------------------

एक हिंदी सिनेमा आणि एक मराठी सिनेमा वरून कथानक बेतलेले. हॉस्टेल वरची चार मुलं राहण्यासाठी जागा हुडकत आहेत. एका अंध, वयस्क जोडप्याच्या घरात घुसून काय धिंगाणा घालतात आणि वयस्क जोडपं त्यांना माफ का करतं? ते म्हणजे हे नाटक. पडदा उघडताच सुरू होते रस्त्यावरचे दृष्य. चारजणांना सोसायटीचा रखवालदार हकलतो आहे. ते सर्वजण गयावया करतात पण रखवालदार हकलून देतो या प्रसंगाने नाटकाची सुरुवात होते.

अन्या (अजिंक्य वाईकर) सिनेमाचे वेड असलेला जन्या (संतोष दंडी) सतत गहिवरणरा आई वेडा. अतिशय भित्रा पण मुलगी पाहिली की एकदम धीट होणारा मन्या ( कृष्णा सुरवसे) टग्या म्होरक्या (किरण फडके). रखवालदार (वसिम नाबाद). सोनाली (सांस्कृती शिंदे), मोनाली (अनन्या पिंपळेकर), इन्स्पेक्टर (हर्षद कानडे), जाई (सुनंदा शेंडगे) आणि अप्पा (अशोक किल्लेदार) अशी पात्र योजना. नेपथ्यात एका फ्लॅटचा सीन.बाहेरचा दरवाजा, शेजारी टेबल, त्यावर ट्रान्जिस्टर, फोन ,पाण्याचे तांब्या-भांडे. घराच्या एका बाजूला स्वयंपाकघर, दुसऱ्या बाजूला बेडरूम.त्या शेजारी वॉशरूम, बेडरूमच्या बाजूला बाल्कनी. बाल्कनीत तुळस आणि दोन, तीन कुंड्या असा टुमदार फ्लॅट. हे सुटसुटीत नेपथ्य. मुख्य दरवाजा ॲंगल बदलून लावला असता तर पहिल्या आणि दुसऱ्या अंकातील दरवाजा बाहेरील हालचाली अडचण न होता स्पष्ट दिसल्या असत्या. नेपथ्यकाराने प्रॅक्टिसच्या वेळी हे लक्षात घेणे आवश्यक. तसेच बाल्कनीतली गर्दी (कुंड्याची) कमी करून प्रातिकात्मक नेपथ्यात भर पडली असती.



के. जयप्रकाश यानी प्रकाश योजनेच्या बाबतीत खूप विचार केलेला जाणवत होते. रस्त्यावर पूर्ण प्रकाश, घरातला अंधार, रात्र, जाईच्या स्वगताच्या वेळचा स्पॉट हे छान होतं पण पात्र स्पॉट सोडत होती. सुरवातीचा रस्त्याच्या सीनमध्ये दोन्ही बाजूला स्टॅण्ड स्पॉट देऊन ही कलाकारांना स्पॉट घेता आले नाहीत. एकमेक झाकले जात आहोत या कडेही लक्ष देणे हवे होते. प्रत्येक गोष्ट सिनिअर्सच्या नाटकात सांगत नसतात. काम करणाऱ्या कलाकारानी आपापल्या भूमिकांचा विचार करायचा असतो असं माझं वैयक्तिक मत आहे. पार्श्वसंगीत पहिल्या अंकात योग्य होते पण दुसऱ्या अंकात अनेक जागा रिकाम्या गेल्या. याकडे लक्ष देणे आवश्यक होते. छोटी मोनाली-अनन्या पिंपळेकरने वातावरण हलके, सहज बनवले. कोणालाही मोदका सारखीच आवडेल. सोनाली - सांस्कृती शिंदेचा नवखेपणा जाणवत होता. पोलिसाचे काम करताना कधीच कॅप नव्हती. जाईचे काम करणाऱ्या सुनंदा शेंडगे भूमिकेत शोभून दिसल्या. काही गोष्टींकडे लक्ष द्यावयास हवे होते.घरात येताना पहिल्या अंकात हातात असलेली काठी दुसऱ्या अंकात गायब.कोचवरून उठून जाताना चाचपडते पण टेबलावरचे पाण्याचे तांब्या-भांडे सराईत पणे उचलले जाते हे कसे? तुळशी जवळ रांगोळी काढली पण पेलाभर पाणी आणि लहानशी उदबत्ती हवी होती. केस धुतले म्हणून पंचा बांधला पण पंचा काढला तर अंबाडा?

अप्पा अशोक किल्लेदार भूमिकेत शोभले पण काही गोष्टी खटकल्या पहिल्या अंकात रात्री झोपताना पायात पायमोजे होते पण बाहेरून येताना पायमोजे कुठेत? घरात भामटे, चोर शिरलेतची तक्रार शेजारी पोलीस रहात असताना एकदम पोलीस चौकीत का? याचा विचार करावयास हवा.गोष्टी बारक्या असतात पण त्या कलाकाराच्याच लक्षात यायला हव्यात नाही तर आपण नाटकात काम करतो म्हणजे नक्की काय? याचा विचार सर्वांनी करावयास हवा.

**नाट्य समीक्षण**
**विद्या काळे**

- **आजचे नाटक :** शरदातले चांदणे
- **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक व दिग्दर्शक :** नागेंद्र माणेकरी

६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२४-२५

## संक्षिप्त वृत्त



### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) च्या निवडी जाहीर

**नातेपुते, दि. ३ डिसेंबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) सोलापूर शहर व जिल्ह्याच्या वतीने पक्ष वाढीसाठी बैठक समृद्धी हॉल, सोलापूर येथे झाली. त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष जकाप्पा कांबळे यांनी होते. याप्रसंगी नूतन महाराष्ट्र अध्यक्ष झाल्याबद्दल त्यांचे सत्कार करण्यात आला. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्रीकांत नानासाहेब सावंत महाराष्ट्राचे उपाध्यक्ष- दत्ता सावंत सोलापूर जिल्हा अध्यक्ष धर्मा माने, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रावसाहेब प्रक्षाळे, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष राजू लोंढे यांच्या उपस्थितीत होते तसेच याप्रसंगी अल्पसंख्यांक सर्व पदाधिकारी व रिपाईच्या सर्व महिला पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष वैभव धांईजे यांची निवड करण्यात आली. तर माळशिरस तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट) तालुकाध्यक्षपदी. रमेश साळवे. यांची निवड करण्यात आली. व महादेव समिंदर यांची माळशिरस तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली तसेच महिला पदाधिकाऱ्यांची व अल्पसंख्यांक पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आल्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया( गवई गटाच्या) माळशिरस तालुकाध्यक्षपदी रमेश साळवे यांची निवड करण्यात आली. यापूर्वी रमेश साळवे यांनी जिल्हा महासचिवपदी काम केले असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची माळशिरस तालुका अध्यक्षपदी निवड केली.



### रिपाइं आठवले गटाच्यावतीने संदीप कोहिनकर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.३ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर हे दुसऱ्यांदा त्यांच्याकडे २१ दिवसांसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार दिल्याने रिपाइंच्या आठवले गटाच्या वतीने त्यांचा सत्कार रिपाइं अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रिपाइं तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,गौतम मडिखांबे,शिवराज जमगे, गणेश कांदे, उमेश पांढरे आदी उपस्थित होते



### अशोक नागटिळक महाराज यांचा भगवंत ब्लड बँकेकडून सन्मान

**बार्शी, दि. ३ डिसेंबर-**

मानवता बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे (रातंजन) संस्थापक अध्यक्ष अशोक नागटिळक महाराज यांचा भगवंत ब्लड बँकेकडून जनसंपर्क अधिकारी गणेश जगदाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी भगवंत ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी गणेश जगदाळे, महामानव सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भैरवनाथ चौधरी, मानवता संस्थेचे सचिव बापू नागटिळक, उपाध्यक्ष गौतम नागटिळक, टेक्निशियन प्रसाद जगदाळे, स्वप्नील भालशंकर, निलेश गिराम, बँकेचे कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



### आ. सचिन कल्याणशेट्टी यांची शिवपुरी संस्थेला भेट

**अक्कलकोट दि.३ डिसेंबर-**

शिवपुरी संस्थानकडून विश्व फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.पुरुषोत्तम राजीमवाले यांच्या हस्ते अक्कलकोटचे नूतन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सन्मान करण्यात आला. आमदार सचिन कल्याणशेट्टी व त्यांच्या धर्मपत्नी शांभवी कल्याणशेट्टी शिवपुरीला भेट देऊन परम सद्गुरू श्री गजानन महाराजांचे आशीर्वाद घेतले. यावेळी विश्व फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. गिरीजा राजीमवाले, शांभवी कल्याणशेट्टी आदी उपस्थित होत्या. यावेळी सपत्नीक अग्निहोत्र केले. विश्व फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यामध्ये अक्कलकोट शहर व तालुक्याच्या विकासावर सुमारे अर्धा तास चर्चा झाली.

## अक्कलकोटमध्ये अवकाळी पावसाच्या सरी

### द्राक्ष, कांदासाठी मारक; ज्वारीसाठी पोषक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ डिसेंबर-**



अक्कलकोट शहर व परिसरात मंगळवारी दुपारी पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. दिवसभर कोंदट हवामान ढगांनी व धुक्यांनी अच्छादलेले काकाश सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे नागरिकांना सर्दी खोकला कफ ताप अंगदुखी थंडी ताप अशा आजाराचे प्रमाण वाढले आहे . अवेळी पावसामुळे काही पिकाना फटका बसण्याची व ज्वारी गहू पिकास पोषक असल्याचे बोलले जात आहे.

मंगळवारी दिवसभर अक्कलकोट शहर व परिसरात काळे ढग अच्छादलेले धुके सूर्यप्रकाशाचा अभाव कोंदट हवामान होते दुपारी काही काळ पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. हा पाऊस ज्वारी हरभरा पिकास पोषक तर द्राक्षे दाळिंब या टमाटे भाजीपाला साठी मारक असल्याचे बोलते जात आहे. तालुक्यातील मैंदर्गी, दुधनी रुदेवाडी, मिरजगी, संगोगी, निमगाव, गौडगाव, नागनाळी, मातनाळी, हसापूर स्टेशन, कडबगाव, आबावाडी आदी भागात तुरळक हलक्या पावसाच्या सरी झाल्या.

अवेळी पावसाचा शिडकाव, सूर्यप्रकाशाचा अभाव कोंदट हवा पिकांना मारक तसेच नागरिकांच्या आरोग्यालाही त्रासदायक आहे. यामुळे सर्दी, ताप, खोकला रुग्णाच्या संख्येत वाढ झाली आहे. वृद्धांना तसेच लहान मुलांना अंत्यत प्रतिकूल हवामान असून आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

नागरिकांनी ताजे गरम अन्न खावे फलहार घ्यावा. उबदार कपडे वापरा थंड पदार्थ खाणे टाळावे. ताप थंडी असल्यास वेळीच उपचार घ्या, असे आवाहन डॉ. आर. व्ही. पाटील यांनी केले.

## निवडणूक कामकाजात कामचुकारपणा करणाऱ्या ९ शिक्षकांवर गुन्हा

### तोंडी व लेखी खुलासा न केल्याने गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ३ डिसेंबर-**

विधानसभा निवडणूक २०२४च्या कामकाजामध्ये कामचुकारपणा केल्या प्रकरणी ९ शिक्षकांवर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सहा.निवडणूक निर्णय अधिकारी माढा तथा तहसीलदार माढा यांचे प्राधिकृत अधिकारी नायब तहसीलदार (माढा) विजयकुमार कवडे यांनी फिर्याद दाखल केली आहे.

२४५ माढा विधानसभा मतदार संघातील निवडणूक कामकाजासाठी ११६८ पुरुष तर ४६८ महिला असे एकूण १६२६ कर्मचाऱ्यांचे ८ ते ९ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण ठेवले होते. तिसऱ्या प्रशिक्षणा दिवशी यापैकी ४० कर्मचारी प्रशिक्षणा दरम्यान गैरहजर दिसल्याचे आढळले. याबाबत सदर

**या नऊ जणांवर दाखल झाला गुन्हा**

सुरेश भोसले, सांगोला महाविद्यालय, किसन पवार डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला, राजेंद्र सूर्यवंशी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला, पांडुरग पाटील प्राथमिक आश्रम शाळा डिकसळ, शेळके पी. डी. केंद्रीय निवासी शाळा उदानवाडी, माणिक राऊत जिल्हा परिषद शाळा मारकडवाडी, राहुल ढालपे चंद्रपुरी प्राथ.शाळा तांबवेवाडी हे सात जण आयोजित प्रशिक्षणास गैरहजर राहिल्याने व संभाजी शिंदे डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला, नंदलाल वाघमारे जिल्हा परिषद शाळा, जाळबावी हे दोघेजण साहित्य वाटपा दिवशी हजर राहून स्वाक्षरी करून मोबाईल बंद करुन निघून गेल्याबाबत नऊ जनलोकसेवक यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस नाईक घोगरे करीत आहेत.




४० कर्मचाऱ्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली होती. मात्र प्रशिक्षणादिवशी गैरहजर राहिलेल्या व साहित्य वाटपा दिवशी हजर राहून स्वाक्षरी करून मोबाईल बंद करुन निघून गेलेल्या माळशिरस व सांगोला तालुक्यातील ९ शिक्षकांनी कारणे दाखवा नोटीसीवर तोंडी अथवा लेखी असा कोणताही खुलासा न केल्याने सदर शिक्षकांवर कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचे ट्रेलर झाले पलटी

### शाळेला सुट्टी असल्याने दुर्घटना टळली

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ डिसेंबर-**

मंगळवेढा शहरातून ऊस वाहतूक डबल ट्रेलरचा ट्रॅक्टर जात असताना इंग्लिश स्कूल प्रशालेच्या समोरच तो पलटी झाल्याने उपस्थित नागरिकांच्या अंगावर शहारे आले. रविवार असल्यामुळे सुट्टीमुळे शाळेची मुले नसल्याने ही दुर्घटना टळल्याची चर्चा शहरामधून ऐकावयास मिळत होती. दरम्यान यापूर्वी वेळोवेळी शहरातून होणारी अवजड वाहतूक बंद करावी, अशी मागणी करुनही बंद होत नसल्याने नगरपालिका व पोलीस प्रशासन यांच्या कारभाराबाबत संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत.

मंगळवेढा शहरात अवजड वाहतूक बंद करण्यासाठी पंढरपूर रोड बायपास जवळ कमान उभी केली आहे, मात्र ही कमान अधिक उंच असल्याने अवजड वाहने सहज शहरामध्ये प्रवेश करतात. सध्या ऊस गाळप हंगाम सुरु झाल्याने ऊसाची भरलेली वाहने व रिकामी वाहने दामाजी चौकातूनच ये जा करीत असल्याचे चित्र आहे. त्याचबरोबर कर्नाटक राज्यातून येणारी अवजड वाहनेही येथूनच जात असल्याने इंग्लिश स्कूल प्रशालेच्या विदयार्थ्यांना शाळेत प्रवेश करताना जीव मुठीत धरुन प्रवेश करावा लागत आहे.



**शहरातून ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरची ट्रॉली इंग्लिश स्कूल प्रशालेच्या समोर पलटी झाल्याचे छायाचित्रात दिसत आहे.**

अवजड वाहने बंद करण्याबाबत मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे, वारी परिवार तसेच अन्य व्यक्तींनीही वेळोवेळी आंदोलने छेडली होती. नगरपालिका व पोलीस प्रशासन हे वरिष्ठ लेवलचा प्रश्न असल्याचे सांगून जबाबदारी झटकत असल्याने अद्याप तरी अवजड वाहतूक बंद करण्यात यश आले नाही. यापूर्वीही जेष्ठ नागरिक, वकील व अन्य असे जवळपास दहा जणांचा मृत्यू या घटनेत झाला आहे. आता तरी प्रशासनास जाग येवून अवजड वाहतूक शहरातून बंद होणार का? असा संतापजनक सवाल शहरवासीयामधून केला जात आहे.

एका ऊस भरुन जाणाऱ्या ट्रॅक्टर चालकाने दारुच्या नशेत रविवारी संध्याकाळी ८ वाजता दामाजी चौकाच्या पुढील बाजूस ट्रॅक्टरच्या तीन घिरट्या जागेवर घेतल्याने जागरुक नागरिकांनी पळत येवून चालकास पकडले, पोलीसांना बोलावून त्या चालकाला ताब्यात दिले. नशेत असलेल्या चालकाला कुठल्या कारखान्याला जाणार? असे विचारल्यानंतर तो उत्तरही देवू शकत नव्हता, अशी अवस्था त्याची झाली होती. दोन ऊसाने भरलेले ट्रेलर घेवून हा चालक एकाच जागेवर फिरवत असल्यामुळे ट्रेलर पलटी होवून दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. मात्र जागरुक नागरिकांमुळे पुढील घटना टळली आहे.

## दत्त जयंती निमित्त माढ्यात रविवारपासून सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३ डिसेंबर-**

श्री दत्त जयंती निमित्त जन्मोत्सव व सप्ताहाचे आयोजन माढ्याचे उत्कर्ष कुंभेस्कर काका यांच्या निवासस्थानी असलेल्या दत्त मंदिरात आयोजन करण्यात आले आहे. गेली २६ वर्षापासून कुंभेजकर परिवाराकडून दत्त जन्मोत्सवाचा आयोजन करण्यात येते. दरवर्षी त्यानिमित्ताने कीर्तन भजन भागवत कथा महाप्रसाद इत्यादी गोष्टीचे आयोजन करण्यात येते त्याच प्रमाणे याही वर्षी जन्मोत्सवाचे तयारी केली जात आहे.



या उत्सवाचे कलश पूजन माढयाच्या नगराध्यक्षा मिनल साठे व दादासाहेब साठे यांच्या हस्ते होणार आहे तर ध्वज पूजन उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे व शिवाजी जगदाळे यांच्या हस्ते रविवारी ८ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा.करण्यात येणार असल्याचे आयोजन उत्कर्ष काका कुंभेजकर यांनी सांगितले. १४ नोहेंबरला संध्याकाळी ४ ते ६ यावेळेत कीर्तन व श्री दत्त जन्मउत्सव साजरा करण्यात येणार आहे व १५ नोव्हेंबरला दुपारी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन असणार आहे. सप्ताह काळात दररोज सकाळी ७ वा. अभिषेक सकाळी ९ ते ११ गुरुचरित्र वाचन होणार असून मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा तसेच दत्त जन्मोत्सवात उपस्थित राहावे असे कुंभेजकर काका, उदय कुंभेजकर यांनी आवाहन केले आहे. जन्मोत्सव पार पाडण्यासाठी बापू कुंभेजकर, उदय कुंभेजकर, अजित गवळी, हरी कुलकर्णी, प्रशांत लोंढे, श्रीकांत कुलकर्णी, धनाजी आवटे, सुमित देवकुळे, अरुण मंडप आदींनी परिश्रम घेतले.

## महावीर कदम यांची ऑस्ट्रेलियामध्ये फुल आयर्न मॅन स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ डिसेंबर-**

बार्शीचे युवा उद्योजक आणि भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष तथा लायन्स क्लब ऑफ बार्शी टाऊनचे अध्यक्ष महावीर कदम यांनी जागतिक पातळीवर आपल्या जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाचा ठसा उमटवला आहे. त्यांनी ऑस्ट्रेलियातील बसल्टन शहरात १ डिसेंबर रोजी आयोजित फुल आयर्न मॅन या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.



महावीर कदम यांनी ४ किमी पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२ किमी धावणे असे २२६ किमीचे आव्हान केवळ १३ तास ४१ मिनिटांमध्ये पूर्ण करुन बार्शी आणि भारताचे नाव उंचावले आहे. या कठीण स्पर्धेत फुल्ल आयर्नमॅन, हाल्फ आयर्न मॅनसाठी जगभरातील ३४०० स्पर्धक सहभागी होते. तथा फुल्ल आयर्न मॅनसाठी ८३९ स्पर्धक सहभागी होते या वर्षी स्पर्धे दरम्यान वादळी वाऱ्यासहित पाऊस उष्णतेचे आव्हान, कठीण मार्ग आणि हवामानाच्या प्रतिकूलतेवर मात करुन त्यांनी ही कामगिरी करुन दाखवली. कदम यांच्या या यशामुळे बार्शीकरांसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. महावीर कदम यांनी याआधी गोवा, नागपूरसह विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली होती. मात्र, फुल आयर्न मॅन स्पर्धा पूर्ण करत त्यांनी जागतिक पातळीवर आपले कौशल्य सिद्ध केले आहे.

## आयशर टेंपोची ट्रॅक्टरला धडक

### ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू; ब्रम्हपुरी-मंगळवेढा महामार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ३ डिसेंबर-**

ऊस भरून ब्रम्हपुरी-मंगळवेढा या राष्ट्रीय महामार्गावरून युटोपियन कारखान्याकडे निघालेल्या ट्रॅक्टरला भरधाव वेगात आलेल्या आयशर टेंपोने जोराची पाठीमागून धडक दिल्याने ट्रॅक्टर पलटी होवून ट्रॅक्टर चालक अजिनाथ अशोक शिंदे (वय ३४ रा.पिंपळेची वाडी जि.बीड) याला गंभीर जखमी करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात आयशर टेंपोचालकाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी, दि. १ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वा. एम एच १६,ए.व्ही.६६८८ हा ट्रॅक्टर दोन ट्रॉलीमध्ये ऊस भरून ब्रम्हपुरीकडून राष्ट्रीय महामार्गावरून मंगळवेढयाकडे येत असताना आयशर टेंपो क्रमांक एम एच २५,यु. ०२९८ च्या चालकाने भरधाव वेगात गाडी वेडीवाकडी चालवून रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टरला पाठीमागून जोराची धडक दिल्याने ट्रॅक्टर पलटी होवून ट्रॅक्टरचालक गंभीर जखमी झाल्याने मृत पावला. तसेच दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभूत ठरला असून आयशर टेंपो चालक अपघाताची खबर न देता घटनास्थळावरून फरार झाला असल्याचे हरीराम थोरवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान सध्या जिल्हयात ऊस गाळप हंगाम सुरु असल्याने ऊसाची भरलेली वाहने रोडने जात असल्याचे चित्र आहे.प्रत्येक ट्रॅक्टरला ओळखू येण्यासाठी रिफ्लेक्टर लावणे गरजेचे आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अपघात टाळण्यासाठी ज्या वाहनांना रिफ्लेक्टर नाहीत त्यांच्यावर कारवाई करून होणारे अपघात टाळावेत, अशी मागणी होत आहे. ट्रॅक्टर चालविताना चालक टेप रेकॉर्ड लावून आवाज मोठा सोडतात त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनचालकाने हॉर्न वाजवूनही संबंधित ट्रॅक्टरचालकांना आवाज न आल्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे ट्रॅक्टरमध्ये टेप लावणाऱ्या चालकावरही कारवाईची मागणी होत आहे. ट्रॅक्टरला डबल ट्रेलर असल्यामुळे अशी वाहने सुसाट वेगाने रस्त्याने धावतानाचे चित्र असून मर्यादीत वेग ठेवून वाहने चालविल्यास अपघातापासून बचाव होणार असल्याच्या प्रतिक्रिया सूज्ञ नागरिकांतून व्यक्त होत आहेत.

## माचणूर येथील अंगणवाडीला नाही इमारत

### घराच्या अंगणात अध्यापन करण्याची वेळ; तक्रार करुनही जागा उपलब्ध करुन न दिल्याने पालकवर्गातून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३ डिसेंबर**

माचणूर येथील मुंढेवाडी रस्त्यावर असलेल्या दर्याप्पा अंगणवाडीसाठी इमारत नसल्याने लहान मुलांना अक्षरश: एका घराच्या अंगणात मोकळ्या जागेत अध्यापन करण्याची वेळ आली असून प्रशासनाच्या या डोळेझाक कारभारामुळे पालकवर्गातून संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी तात्काळ लक्ष घालून येथील अंगणवाडी इमारतीचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

माचणूर येथील ब्रम्हपुरी-मुंढेवाडी रोडलगत असलेल्या दर्याप्पा अंगणवाडी ही मागील जवळपास ९ वर्षापासून येथे भरत आहे. पूर्वी एका जुन्या पत्र्याच्या खोलीत



**माचणूर येथे घराच्या अंगणात अंगणवाडी भरल्याचे छायाचित्र.**

या अंगणवाडीची सुरुवात झाली. येथील पत्र्याचे वासे मोडल्याने जीव मुठीत घेवून लहान बालकांना शिक्षण घ्यावे लागत होते. याबाबतचे वृत्त प्रसिध्द झाल्यानंतर तेथून अंगणवाडी काही अंतरावर पत्र्याच्या खोलीत बरेच दिवस भरली. तेथूनही मागील दोन महिन्यापासून अंगणवाडीला उटकळ आल्याने ही अंगणवाडी मुंढेवाडी रस्त्यालगत असलेल्या उंच माळावर एका मजूराने पत्र्याच्या उभ्या केलेल्या शेडमध्ये भरत होती. हे पत्र्याचे शेड खासगी असल्याने काही दिवसातच त्या मजुराने अंगणवाडी भरविण्यास नकार दिला. तद्नंतर लहान मुलांची होणारी हेळसांड पाहून महिला बचत गटाच्या अध्यक्षा विद्या डोके यांनी स्वत: लहान मुलांसाठी आपल्या घराच्या अंगणाचा आश्रय दिला. या अंगणवाडीत जवळपास २० मुले शिक्षण घेत असल्याचे सांगण्यात आले. या घराच्या अंगणात वरील बाजूस छत नसल्यामुळे मुलांना केवळ एक कापड टाकून सावली करुन या सावलीत मुलांना शिक्षण दिले जात असल्याचे विदारक चित्र आहे. दरम्यान ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक परिस्थितीला या बालकांवर सामना करण्याची वेळी आहे.

महिला बचत गटाच्या अध्यक्षा विद्या डोके यांनी दि.२ ऑक्टोबर रोजी महिला बचत गटाची बैठक घेवून याबाबतची लेखी तक्रार त्यांनी ग्रामपंचायतीकडे दिली असल्याचे सांगण्यात आले. तक्रार करुनही अद्यापही अंगणवाडीसाठी जागा उपलब्ध करुन न दिल्याने पालक वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. बालविकास प्रकल्प अधिकारी जगन्नाथ गारोळे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी जागा उपलब्ध करुन दिल्यास त्यांना नियमाप्रमाणे भाडे दिले जाईल, असे सांगीतले.

## उमा महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन योगा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ डिसेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आंतर महाविद्यालयीन योगा स्पर्धेचे आयोजन उमा महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडल, उमा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व कार्यवाह डॉ.मिलिंद परिचारक यांचे हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड, डॉ.सुरेश लांडगे, डॉ. नंदकिशोर देशपांडे, डॉ.प्रशांत तांबिले, प्रा.विजय पवार, प्रा.अनिल परमार, प्रा.दिपक भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धे नंतर स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथि म्हणून सांगोला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले होते. समारोप समारंभास डॉ.बापू मोहिते, प्रा.बाळासाहेब वाघचवरे, डॉ.निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर स्पर्धेमध्ये एकूण ७ संघांनी सहभाग निंदविला तर वैयक्तिक स्पर्धे साठी ६२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. दरम्यान मुलींमध्ये संघमेश्वर महाविद्यालय,सोलापूर प्रथम क्रमांक, शिवाजी महाविद्यालय, बार्शी द्वितीय क्रमांक तर एल.बी.पी. महाविद्यालयं,सोलापूर यांनी तृतीय क्रमांक या मुलींच्या संघांनी यश संपादन केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ.धिरजकुमार बाड, प्रा.तानाजी घाडगे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद ढवण, कार्यालयीन अधीक्षक एस.डी.पारखे, पी.एस शेख व डी.एम.देवमारे तसेच सर्व प्रशासकीय सेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### करमाळ्याच्या किंडरजॉय विद्यालयाची मूकबधीर विद्यालयास भेट

**करमाळा दि. ३ डिसेंबर-**

करमाळा किंडरजॉय सीएससी बालविद्यालय श्री देवीचा माळ, येथील विद्यार्थ्यांनी श्री जगदंबा कमला भवानी मूकबधिर निवासी विद्यालयास क्षेत्रभेट उपक्रम अंतर्गत भेट दिली. येथील विद्यार्थी स्पेशल असून देखील त्यांच्यामधील गुणवत्ता आणि चिकाटी ही त्यांच्या व्यक्तीमत्वमधील असामान्य बाब असून हे त्यांच्या सोबत विशिष्ट पद्धतीने संवाद साधतांना लक्षात आले. या भेटीचे आयजन मुख्याध्यापिका राजश्री कांबळे यांनी केले. भेटीदरम्यान मूकबधीर मुलांसोबत वेगवेगळे उपक्रम घेऊन त्यांना आनंद देण्याचे कार्य केले. त्यामध्ये चित्रकला, कृती शिक्षणाअंतर्गत पॉप कॉर्न बनविणे, फुलांचे हार, बुके तयार करणे हे उपक्रम घेतले. सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे सहभोजन करून आपल्या मैत्रीचा अस्वाद घेतला. या भेटीला यशस्वी करण्यासाठी जोगदंड, ढाळे, खराडे, राखुंडे, जाधव, बुराडे यांनी परिश्रम घेतले. श्री जगदंबा कमला भवानी मूकबधिर निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक काळे व इतर शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.



### भाजपा सदस्य अभियानाचा शुभारंभ

**पिलीव दि ३ डिसेंबर**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य अभियान सुरू करण्यात आले असून देशभर सदस्य नोंदणी अभियान व ओळखपत्र तयार करण्याचा कार्यक्रम आखला असून या कार्यक्रमाची सुरुवात माळशिरस तालुक्यातील बचेरी या गावापासून करण्यात आली. बचेरी या ठिकाणी श्रीराम मंदिरामध्ये विधानसभेला केलेल्या मतदाराचे आभार व भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाच्या वतीने बंडू यादव व मल्हार गोडसे यांना नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा नियोजन समिती सदस्य के. के. पाटील, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब वावरे, नगरसेवक आकाश सावंत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवराज पूकळे, गणेश गोडसे, संजय देशमुख, राम गोरड, गणेश देशमुख, गणेश पाटील, अण्णासाहेब पाटील उपस्थित होते. यावेळी युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष शिवराज पोकळे, गणेश गोडसे यांनी मनोगत व्यक्त केले.




### आर्या महाविद्यालयात कृषी शिक्षण दिन

**माढा, दि. ३ डिसेंबर-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी संलग्न आर्या कृषी महाविद्यालयात कृषी शिक्षण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांनी भूषविले. याप्रसंगी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये आर्या कृषी महाविद्यालय व आर्या पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. डॉ. नितीन उबाळे यांनी कृषी शिक्षण दिनाचे महत्त्व केले. प्रा. तुषार नामदे यांनी विद्यार्थ्यांना प्रक्षेत्र भेटीदरम्यान रब्बी पिकांचे प्रात्यक्षिक विषयी माहिती दिली. यामध्ये ज्वारी, करडई, हरभरा इत्यादी पिकांच्या विविध वाणांचे लागवड प्रात्यक्षिक पाहून विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. प्रा. संदीप मुरूमकर यांनी कृषी अवजारे त्यांचा उपयोग व महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. संदीप मुरूमकर, प्रा. तुषार नामदे, प्रा. खंडेराव वाघे, प्रा. तृप्ती राठोड, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, कुमार शिंदे, रोहित घळके उपस्थित होते.

### जुनी पेन्शन संघटनेच्या माळशिरस तालुका कार्यकारी अध्यक्षपदी सुहास कोल्हे

**पिलीव, दि. ३ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना माळशिरस तालुका यांच्या वतीने जिल्हा सरचिटणीस किरण काळे, तालुकाध्यक्ष अरुण राठोड यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरस तालुक्यातील सर्व शिक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्वानुमते माळशिरस तालुका कार्यकारी अध्यक्षपदी जिल्हा परिषद लक्ष्मीनगर शाळेचे सुहास सिद्धेश्वर कोल्हे यांची तर पिलीव येथील गणेश देशमुख यांची सल्लागारपदी, गणेश भंडारे यांची तालुका संपर्क प्रमुखपदी अभिजित कदम यांची संघटकपदी निवड करण्यात आली. जिल्हा सरचिटणीस किरण काळे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहीले.



# जीवघेण्या कर्णकर्कश्य डॉल्बीवर बंदी कधी ?



### सनई, बँण्ड पथकांवर उपासमारीची वेळ

पूर्वी लग्नाच्या मिरवणूकी मध्ये सनई, बँण्डची पथके तसेच हलगीवाले दिसत असत. सनईचौघड्यांचे मंजुळ स्वर हे ऐकणाऱ्यांच्या कानांना देखील सुरेल सुरांचा आनंद देत असत. त्याच प्रमाणे बँण्ड पथकांतील वाद्यवृंद मंडळी देखील हिंदी, मराठी चित्रपटातील एकसे बढकर एक अशी सुंदर गीते वाजवून ऐकणाऱ्यांची देखील वाहवा मिळवित असत. ऐकणाऱ्यांच्या कानांना देखील यामुळे खरोखरच सूरांचा आनंद देत मिळत असत. अशा प्रकारे वेगवेगळ्या कुटुंबातील लोकांना रोजगार उपलब्ध होवून त्यांचा उदरनिर्वाह सुध्दा चालत असत. मात्र डॉल्बी, डीजेमुळे अशा पारंपारिक कलाकार मंडळींवर सध्या उपासमारीची वेळ आलेली आहे.

### वाहतूकीचा खोळंबा आणि ध्वनी प्रदूषणात वाढ

सध्या लग्नसराईंचा मौसम सुरु आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर दिवसा पारण्याच्या तर संध्याकाळच्या वेळी नवरानवरींच्या खास सजविलेल्या आकर्षक बग्गींमधून मिरवणूका काढण्याचे फॅड वाढलेले दिसत आहे. प्रत्येक वरातींपुढे सर्रास डॉल्बी सिस्टीम लावलेल्या असून छातीमध्ये धस्स करणाऱ्या त्याच्या आवाजावर वधुवरांकडील मंडळी विशेषत: तरुण,तरुणींचे जथ्थे नाचताना दिसुन येतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो. एकीकडे ध्वनीप्रदूषण तर दुसरींकडे वाहतूक खोळंबून वाहनांच्या गर्दीमुळे थांबलेल्या वाहनांचे प्रदूषण याला सर्वसामान्य नागरिकांना मात्र सामोरे जावे लागते.

### पुरातन मंदिरांना आवाजाचा धोका

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र आहे. येथील नगरप्रदक्षिणा मार्गावर विविध प्रकारची जुनी आणि प्राचिन अशी परिवार देवतांची मंदिरे आहेत. लग्नसराई, सण, उत्सव आणि महापुरुषांच्या जयंतींच्या वेळी येथील प्रदक्षिणारस्ता, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक आदी भागांतून डॉल्बी तसेच डिजे लावून मिरवणूका काढल्या जातात. या मिरवणूकांमध्ये उखळीबार, हवेतील बार तसेच मोठ्या आवाजांचे फटाके फोडले जातात. त्यामुळे या भागातील पुरातन मंदिरांना डॉल्बी, डिजे आणि कांठाळ्या बसणाऱ्या फटाक्यांच्या आवाजामुळे नाहक धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांनी देखील या प्रकारचे गांभीर्य लक्षात घेवून खबरदारी घेण्याची गरज आहे.

### विद्यार्थी, रुग्ण, वृद्ध, लहन मुलांना देखील त्रास

शहरातील प्रमुख मार्गावर अनेक शाळा, महाविद्यालये तसेच खासगी क्लासेस आहेत. या बरोबरच रुग्णालये तसेच गावठाण भागात घरांची संख्या देखील मोठी आहे. विद्यार्थी, आजारी व्यक्ती, वृध्दांना तसेच लहानमुलांना मिरवणुकांमधून वाजणाऱ्या डॉल्बीच्या दणदणांटाचा विनाकारण त्रास सहन करावा लागतो आहे.

### दूकानदार मंडळी देखील त्रस्त

लग्नाच्या वराती या शहरातील स्टेशनरस्ता, चौफाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर आणि प्रदक्षिणा मार्गावर काढल्या जात असतात. सततच्या गर्दीमुळे, वाहतूकीच्या अडथळ्यांमुळे या भागात नाहक गर्दी वाढते. त्यामुळे या भागातील दुकानदार मंडळी देखील त्रस्त झालेली आहेत.

### सर्वसामान्य नागरिकांचा पोलिस प्रशासनाला सवाल

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.३ डिसेंबर -**

लग्न असो की व्रतबंध, महापुरुषांच्या जयंत्या असो की वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम असोत किंवा सण असो की उत्सव असोत सगळ्या मिरवणुकांपुढे सर्रास असतोच तो छातीमध्ये धस्स करणाऱ्या मोठ्या आवाजांच्या डॉल्बी सिस्टिमचा धडकी भरवणारा तो आवाज. वास्तविक आवाज हा किती डेसिबल पर्यंत असावा यावर देखील आपल्याकडे कायद्याने मर्यादा घालून दिलेली आहे. मात्र कायद्याची अंम लबजावणी आणि रक्षण करणाऱ्या काही पोलिस आणि डॉल्बीचालक मालकांच्या असलेल्या (अर्थपूर्ण) मैत्रीमुळेच सर्वसामान्य नागरिकांना नाहक डॉल्बीचा हा दणदणाट मात्र सहन करावा लागतो आहे. त्यामुळे या डॉल्बीवर कायमस्वरुपी बंदी केव्हा येणार ? अशी मागणी आता सर्वसामान्य नागरिकांमधूनच जोर धरु लागली आहे.

स्टेरिओच्या अक्षरश: भिंती उभारुन तयार करण्यात आलेल्या डॉल्बीच्या आवाजामुळे हार्टअॅटकच्या घटना देखील वाढलेल्या आहेत. काहींचा या कर्णकर्कश्य आवाजामुळे मृत्यू देखील झाल्याच्या घटना आहेत. तर काही जणांना या भेसुर, प्रचंड आवाजामुळे कायमचा बहिरेपणा देखील आलेला आहे. मात्र तरी सुध्दा डॉल्बीचा दणदणाट रस्त्यांवर सर्रास सुरु असल्याचे दिसत आहे.

## आ. खरे यांनी केली पुळुज येथील द्राक्ष बागेची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ३ डिसेंबर-**

मोहोळ विधानसभेची विजयश्री खेचून आणताच आता आमदार राजू खरे यांनी मिशन मोहोळ नगर परिषदेची घोषणा केली असून, शिवशक्ती व भीमशक्ती एकत्र करून मोहोळ नगरपरिषद जिंकायचीच असा चंग त्यांनी बांधला आहे. दरम्यान आमदार खरे यांनी सुरुवात शेतकऱ्यांच्या कामा पासून केली आहे. जामगाव येथील डोलारे या एका शेतकऱ्याचे चुकीचे वीज कनेक्शन रद्द करण्याची तंबी तेथील महावितरणच्या अधिकाऱ्याला दिली तर पुळुज येथील शेतकरी धनंजय देशमुख यांच्या द्राक्ष बागेला भेट देऊन अडचणीची माहिती घेतली. त्यामुळे आमदार खरे हे अॅक्शन मोडवर आले आहेत.



पुळुज येथील द्राक्ष बागेची पाहणी करून अडचणी जाणुन घेताना आमदार खरे.

पंढरपूर भागातील व मोहोळ मतदार संघाला जोडलेल्या १७ गावातून विधानसभेच्या निवडणुकीत मोठे मताधिक्य मिळाल्याने त्यांनी पुळुज, टाकळी सिकंदर आदी भागाला भेटी दिल्या. यावेळी आमदार खरे यांच्या समवेत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, पुळुजचे माजी सरपंच पांढरे, भीमा वसेकर, शेतकरी धनंजय देशमुख उपस्थित होते. मोहोळ शहरातही समाज बांधवांच्या वतीने चैत्यभूमीत सत्काराचे आयोजन केले होते. यावेळी आमदार खरे म्हणाले, जरी सध्या मी तुतारी हातात घेतली असली तरी मी ३४ वर्षे सेनेचे काम केले आहे. त्यामुळे निधीची कमतरता येणार नाही. जिल्ह्यात सर्वात जास्त निधी हा मोहोळला येईल. मोहोळ हे मॉडेल शहर बनवायचे असून शहराच्या बाजार पेठेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्याचा माझा प्रयत्न आहे. दरम्यान मी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा पाईक आहे. त्यांच्या इतिहासाची आठवण राहावी म्हणून शहरात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे बसविण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी रमेश बारस्कर बाळासाहेब गायकवाड, विकी देशमुख उपस्थित होते. दरम्यान आमदारकीची शपथ घेतल्यानंतर चार हजार कोटींचा निधी नेमका कुठे गेला? याचा आढावा बैठक घेऊन हिशोब काढू असाही इशारा आमदार खरे यांनी विरोधकांना दिला.

## 10 डिसेंबरपासून ग्रामपंचायतींच्या सुनावण्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ डिसेंबर-**

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून शासकीय अधिकारी-कर्मचारी लोकसभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणूक कामात गुंतले असल्याने प्रशासकीय कामांची गती मंदावली होती. त्यामुळे अनेक कामे प्रलंबित राहिली होती. आता निवडणुका संपल्या असून, अधिकारी-कर्मचारी दैनंदिन कामकाजावर हजर झाले आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद ही अॅक्शन मोडवर आले आहेत. मंगळवार, दि. १० डिसेंबर २०२४ पासून ग्रामपंचायतींच्या सुनावण्या सुरु होणार असल्याची माहिती आरडीसी कुंभार यांनी दिली.

विविध कारणास्तव ग्राम पंचायतीचे सदस्य, सरपंच, उपसरपंच यांच्या विरोधात अपात्रतेच्या तक्रारी दाखल होत असतात. काही तक्रारी २०२१ पासून दाखल आहेत. मात्र कामाच्या व्यापामुळे जिल्हाधिकाऱ्यांना वेळेवर सुनावण्या घेवून त्याचे निकाल देणे शक्य झाले नाही. त्यामध्ये पुन्हा निवडणूक लागल्याने अशा प्रलंबित प्रकरणाची संख्या वाढली होती. अनेक वेळा जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निकाल मान्य न झाल्याने काही मंडळी न्यायालयात जातात. त्यामुळे ही प्रकरणे अधिक क्लिष्ट होत असतात. यामुळे येत्या १० तारखेपासून जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांचा एकेक करून जिल्हाधिकारी निपटारा करणार असल्याचे समजते.

## मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी पंढरपुरातील संतमहात्म्यांना निमंत्रण

**हभप प्रसाद महाराज अंमळनेरकर, राणा महाराज वासकर यांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ डिसेंबर -**

राज्यात महायुतीची सत्ता आली असून नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या गुरुवारी (दि.५) मुंबई येथे होणार आहे. हा शपथविधी सोहळा ऐतिहासीक आणि न भुतो ना भविष्यते असा होणार असल्याचे महायुतीच्या नेतेमंडळींकडून आवर्जुन सांगितले जात आहे. या शपथविधी समारोहास देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसेच देशभरातील अनेक दिग्गज नेतेमंडळी तसेच संतमहंत देखील उपस्थित राहणार आहेत. दरम्यान या शपथविधी सोहळ्याचे पंढरपुरातील काही संत मंडळींना देखील निमंत्रण आलेले आहे.



राणा महाराज वासकर


प्रसाद महाराज


विठ्ठल महाराज


राम कृष्ण महाराज

यामध्ये हभप प्रसाद महाराज अमळनेरकर, वारकरी पाईक संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा वासकर फडाचे प्रमुख देवव्रत उर्फ राणा महाराज वासकर, पाईक संघाचे राष्ट्रीय प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर, पाईक संघाचे अध्यक्ष विठ्ठल महाराज चवरे, संत नामदेव महाराजांचे वंशज नामदास महाराज यांना देखील खास आमंत्रित करण्यात आले आहे. मुंबई येथील आझाद मैदानावर येत्या ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या या समारोहात राज्याचे नूतन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर मंत्री देखील शपथ घेणार आहेत. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीयगृह मंत्री अमित शहा तसेच देशाच्या विविध राज्यांचे मुख्यमंत्री यांच्यासह देशातील अनेक दिग्गज नेते मंडळी देखील उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संतमहंतांना देखील निमंत्रण देण्यात आले आहे. विशेष म्हणजे यामध्ये पंढरपूर येथील हभप प्रसाद महाराज अमळनेरकर, राणा महाराज वासकर यांच्यासह विविध महाराज मंडळींना निमंत्रित करण्यात आलेले आहे. ही सर्व महाराज मंडळी देखील या शपथविधी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे.



## ईव्हीएम हटावच्या संदर्भात जनआंदोलन उभारणार

**चंद्रशेखर मडीखांबे यांची माहिती**

**वंचितच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ३ डिसेंबर**

ईव्हीएम हटाव, बॅलेट पेपर लाओ, लोकशाही बचाव या बाबत जिल्ह्याच्या प्रत्येक गाव व खेड्यातून ईव्हीएम हटावच्या संदर्भात स्वाक्षरी घेऊन मोठी जनांदोलन उभारण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांच्या आदेशाने संपूर्ण राज्यभर ३ डिसेंबर ते १६ डिसेंबरपर्यंत ईव्हीएम हटाव लोकशाही बचाव यासाठी स्वाक्षरी मोहीम घेण्याचा आदेश देण्यात आला होता. त्याचाच एक भाग म्हणून वंचित बहुजन आघाडी सोलापूर शहर व जिल्ह्याच्यावतीने बैठक घेण्यात आली जिल्ह्याच्या प्रत्येक गाव खेड्यातून ईव्हीएम हटावच्या संदर्भात स्वाक्षरी घेऊन मोठी जनांदोलन उभारण्यात येणार असून जिल्ह्याच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार या बैठकीत केला.

तत्पूर्वी विधानसभेमध्ये प्रस्थापितांच्या विरोधात लढणाऱ्या वंचितच्या उमेदवारांचा सत्कार शहर व जिल्ह्याच्यावतीने करण्यात आला. याप्रसंगी शहर व जिल्ह्याच्या सर्व युनिटच्या पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीचे आयोजन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, महासचिव अनिरुद्ध वाघमारे, महिला जिल्हाध्यक्ष श्वेता राजगुरू, सोलापूर शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महासचिव विनोद इंगळे, कामगार संघटनेचे महासचिव सुरज आरखराव उपस्थित होते.

# विज्ञान उपकरण निर्मितीतून विद्यार्थ्यांचा शाश्वत विकास झाला पाहीजे- शिक्षणाधिकारी भगवान फुलारी

## तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**



गट शिक्षणाधीकारी कार्यालय पंचायत समिती माजलगा व श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राथमीक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी बोलत होते .यावेळी त्यांनी सांगितले की, विज्ञान उपकरण निर्मितीतून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता विकसित होऊन वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करुन झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, तर उदघाटक माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे, तर विचारपीठावर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी, उपशिक्षणाधिकारी हजारे साहेब, उपशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक, गटशिक्षणाधिकारी माजलगाव रवींद्र महामुनी, गटशिक्षणाधिकारी केज लक्ष्मण बेडसकर, विज्ञान विभाग प्रमुख लक्ष्मण पोटभरे ,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी शाश्वत ज्ञान प्राप्त करण्यासाठी आतूर असले पाहिजे यासाठी अत्यंत प्रभावी उदाहरणे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. यानंतर गटविकास अधिकारी श्रीमती ज्योत्स्ना मुळीक यांनीही प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण (practical knowledge ) घेण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना शाश्वत शिक्षण मिळावे यासाठी शासनाने अटलटिंकरिंग लॅब, कार्यान्वित करण्यात आली आहे. यातून विज्ञानाच्या विविध संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. प्रास्ताविक रवींद्र महामुनी (गटशिक्षणाधिकारी माजलगाव) यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार सदाशिव ढगे व सुत्रसंचलन श्रीमती सुरेखा गवळी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विभाग प्रमुख रवींद्र खोडवे यांनी सांगितला. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता नववी ते बारावी व सहावी ते आठवी या गटातून तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. यावेळी तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक विद्यार्थी उपकरणासह उपस्थित होते. तसेच संपूर्ण प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, सचिन मोती , रवि अदमाने , विठ्ठल पवार , पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व विज्ञान विषय शिक्षक, प्रयोगशाळा परिचर, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत; अनिलदादा जगताप यांचा इशारा

**नगर परिषदेने तात्काळ थकीत वीजबील भरून कलाकारांच्या नाट्यगृहाचा अंधार दूर करावा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ डिसेंबर**

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे असून याच कलाकारांना स्वतःच्या कलेचं सादरीकरण करण्याकरिता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह एकमेव पर्याय आहे. मात्र कलाकारांच्या या नाट्यगृहाकडे बीड नगर परिषद वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसून येते आहे. राज्य नाट्य स्पर्धा ऐन तोंडावर आलेली असताना सध्य परिस्थितीत कलाकारांचं नाट्यमंदिर अंधारात धूळ खात पडलेलं आहे. काल रोजी नाट्यगृहाचे १ लाख २० हजार रुपये थकीत वीजबील दिले नसल्याने महावितरण अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाचा वीज पुरवठा बंद केला आहे. बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी तात्काळ कलाकारांच्या नाट्यगृहाची वीज थकबाकी भरून नाट्यगृहातील अंधार दूर करावा. कलाकार शहराचे संस्कृतीक वैभव टिकवण्याचे काम करतात. या कलाकारांना कोणी वाली नाही असा गैरसमज मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांनी करून घेऊ नये. कलाकारांच्या पाठीशी कायम शिवसेना मोठ्या ताकदीने उभी आहे त्यामुळे कलाकारांवर होणारा अन्याय शिवसैनिक कदापि सहन करणार नाहीत. असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना दिला आहे.



गेल्या आठ ते नऊ महिन्यांपासून नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा पगार देखील नगर परिषदेने दिला नाही. गोरगरीब कर्मचारी रात्रंदिवस नाट्यगृहाची निगा राखतात, नाट्यगृहाची काळजी घेतात असे असताना जर त्यांचा महिन्यानुमहीने पगार होत नसेल तर ही बाब निष्काळजीपणाची आहे त्यामुळे मुख्याधिकारी अंधारे मॅडम यांनी नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांच्या पगाराची देखील लवकरात लवकर सोय करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी मुख्याधिकारी सौ नीताताई अंधारे यांना केले आहे.

# राज्यमंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या आ.प्रकाशदादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा

## सभापती नरवडे उपसभापती मोरे यांची पक्षश्रेष्ठीकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**







माजलगाव मतदारसंघाचा विकास आ.प्रकाश सोळंके यांनीच केला आहे.आणि विकासाचा जो बॅगलॉग राहिला आहे.तो पूर्ण करण्याची धमक ही आ.प्रकाशदादा सोळंके यांचीच आहे.त्यामुळे विकास पुरुष असणाऱ्या व राज्य मंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या प्रकाशदादांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागनी बाजार समितीचे सभापती जयदत्तआण्णा नरवडे व उपसभापती श्रीहरीनाना मोरे यांनी पक्षश्रेटीकडे केली आहे.

माजलगाव मतदार संघात विकासाची मुहूर्तमेढ माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांनी रोवली आहे.तोच आदर्श आ. प्रकाश सोळुंके यांनी मतदारसंघात सुरू करून विकासाची गंगा या ठिकाणी ओढून आणली आहे. राज्यमंत्रीपदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदार संघाचा कायापालट केला आहे.मंत्री पदाचा त्यांना अनुभव आहे.मतदारसंघात जो विकास झाला आहे,तो आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे.त्यामुळे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे.मागील तीस वर्षांमध्ये आ.प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली आहेत. विद्यार्थ्यांचे,सुशिक्षित बेरोजगारांचे, त्याचप्रमाणे जलसिंचनाचे,अनेक प्रश्न मार्गी लावल्याने बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. विकासाचे अनेक कामे झाली आहेत.उर्वरित विकासाचा जो बॅकलॉग भरून काढायचा आहे, तोही आ.प्रकाश सोळंकेच काढू शकतात.विकासाची दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे.मंत्री पदाचा अनुभवही त्यांच्याकडे आहे त्यामुळे आ.प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे व उपसभापती श्रीहरी मोरे यांनी शिष्टमंडळाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

# समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद विसरून एकजूट होण्याची गरज

**श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची समाजबांधवांना साद; तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या जयंती सोहळ्याला प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ डिसेंबर**




समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी आपसाआपसांतील सर्व मतभेद विसरून एकजूट करण्याची गरज आहे, समाजासमोर नवा आदर्श प्रस्थापित करावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. दरम्यान, सोमवारी श्री संस्थान मठ माजलगाव येथे लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंतीनिमित्त सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला.

लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंती निमित्ताने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली वीरशैव समाजातील सर्व लिंगायत व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा मोठ्या थाटात संपन्न झाला. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा तृतीय जयंतीनिमित्त विविध धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज आपल्या आशीर्वचनात म्हणाले, सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाजाने इतर समाजाच्या तुलनेत आदर्श निर्माण करावा जेणेकरून समाजाचे हित होईल, असे आवाहन मठाधिपती यांनी केले. श्री संस्थान मठात सकाळी ८ वाजता ते १० वाजता लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधीस रूद्राभिषेक, १० वाजता आरती व श्रीगुरुंचे आशिर्वचन व वधू-वर परिचय मेळावा झाला. वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ.गजाननआप्पा होन्ना, मनोहरअप्पा जामकर, कैलासआप्पा खुर्पे, राजाभाऊआप्पा लोखंडे, सुचेंद्रअप्पा महाजन, नितीनअप्पा शेटे, संजयअप्पा मोगरेकर, विकासआप्पा पाटील, प्रशांतआप्पा शेटे, रामेश्वरआप्पा काटकर, कैलासआप्पा लांडगे, सुरेशआप्पा कुरूळे, गणेश तोडकरी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव पेठकर यांनी केले. तर वधू-वरांचा परिचय प्रा.गजानन होन्ना यांनी उपस्थितांना करून दिला.

लवकरच सामुहिक विवाह सोहळा आयोजन

सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने यंदाही भव्य स्वरूपात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील वधू-वर परिचय मेळाव्याचे सोमवारी आयोजन करण्यात आला होते. काळाबरोबर सामाजिक बांधिलकीचा वसा घेत मठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजमितीला समाजाच्या हितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत वधू-वरांची नोंदणी करता येईल, लवकरच सामुहिक विवाह सोहळ्याचेही होणार असल्याचे श्री संस्थान मठा माजलगाव तर्फे कळविण्यात आले आहे.

# शरीरासोबतच बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हमखास मिळतेच-सतीश बलुतकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



शरीरासोबतच मनुष्याची बुद्धी व मन सुदृढ असेल तर यश हे हमखास मिळतेच अशी भावना क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर यांनी व्यक्त केली. ते सोमवार दि २ डिसेंबर रोजी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इ. ५वी ते ९वी इयत्तांच्या वार्षिक किडा महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.या क्रीडा स्पर्धेची सुरुवात हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

दरवर्षी विद्यार्थी या स्पर्धाची आवर्जुन वाट पहात असतात. या वार्षिक क्रीडा स्पर्धा महोत्सवात इ ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांच्या धावणे, रिलेरेस, थैला रेस, संगीत खुर्ची, दोरीवरील उडया, कब्बडी त्याचबरोबर खो खो या खेळासह विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत. या क्रीडा स्पर्धेचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख गायके एन. के. यांनी केले. आतापर्यंत संस्थेतील विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्टीय पातळीवरील विविध क्रीडा स्पर्धेत उज्वल यश संपादन करतांना आपल्या संस्थेसोबतच शिक्षक तथा पालकांचे नाव उज्वल केले आहे असल्याचे आपल्या प्रास्ताविकामधुन गायके नानासाहेब यांनी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक सतिश बलुतकर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आजच्या मोबाईलच्या काळात सर्वच वयातील विद्यार्थ्यांनी मैदानी खेळासाठी दररोज वेळ देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.विज्ञान तंत्रज्ञान हे आजच्या युगात माणसाचे अविभाज्य घटक बनले असले तरी मैदानी खेळ देखील तेवढाच महत्वाचा असून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नसल्याचे बलुतकर यांनी याप्रसंगी नमूद केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील संगीत शिक्षक सिनगारे एस.डी.यांनी केले तर किडा स्पर्धेचे प्रमुख कांबळे आर.एस. आणि पंच म्हणुन पाळेकर यु.ए. यांनी आपली भुमिका बजावली. स्पर्धेचे निकालपत्रक लिहण्याची जवाबदारी श्रीमती गजभिये डी.डी. यांनी चांगल्या पध्दतीने पार पाडली. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी किडा स्पर्धा यशस्वी होण्याकरीता सहकार्य केले.

# आठव्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ डिसेंबर**

किल्ले धारूर : दिलासा संस्थेचे संस्थापक आणि शहरात पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे स्व. मधुकर भाऊ धस यांच्या आठव्या पुण्यतिथीनिमित्त किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. शहरातील बस स्थानक येथे पोलिस चौकीच्या प्रांगणात झालेल्या या शिबिरात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रक्तदान केले.

शिबिराचे उद्घाटन बस डेपो व्यवस्थापक नवनाथ चौरे, पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे, माजी नगराध्यक्ष उत्तम भाऊ तोष्णिवाल, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.मयुर सावंत, युथ क्लब चे अध्यक्ष अभय चव्हाण,पत्रकार अतुल भैय्या शिनगारे, पत्रकार अविनाश ठोंबरे, पत्रकार अविनाश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाऊंच्या प्रतिमेस हार फुले वाहून अभिवादन करण्यात आले.

या शिबिरात नवभुमी सामजिक संघटनेचे अध्यक्ष सुरेशराव गवळी, जेष्ठ बंडोबा शिंदे, सुभाष शिंदे, तेलंगणा येथील सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कुलदिपकसिंह चौहान, अजित दादा शिनगारे यांनी उपस्थित राहून शिबिराचे उद्घाटन केले.

माजी अध्यक्ष प्रा.विजय शिनगारे यांनी भाषणात मधुकर भाऊ धस यांच्या कार्याची प्रशंसा करीत सांगितले की, त्यांच्यामुळे शहरात पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यात मोलाची मदत झाली. शहरातील तलाव खोलीकरण करण्यात आल्याने पाणीपातळी वाढली आणि शहरातील बोअरवेल व विहीरींना मुबलक पाणी उपलब्ध झाले.

माजी अध्यक्ष सुर्यकांत जगताप यांनी किल्ले धारूर युथ क्लबने गेल्या नऊ वर्षातील कार्याचा आलेख सादर केला. त्यांनी सांगितले की, मधुकर भाऊ धस यांच्यामुळे शहर पाणीदार झाले आणि गेल्या आठ वर्षांपासून त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित केले जात आहे.पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी मधुकर भाऊ धस यांच्या पाणीच्या संवेदनशील विषयाकडे लक्ष देण्याच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांनी किल्ले धारूर युथ क्लबच्या या पुढाकाराचे कौतुक केले.


बस डेपोचे व्यवस्थापक नवनाथ चौरे यांनी शिबिराचा समारोप करीत मधुकर भाऊ धस यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले आणि किल्ले धारूर युथ क्लबच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.या रक्तदान शिबिरात यशोदिप पब्लिक स्कुलचे संचालक विशालसिंह दिख्खत व यशोदिप पब्लिक स्कुलच्या संचालिका तथा प्राचार्य सौ.चित्रा विशालसिंह दिख्खत यांनी सपत्नीक रक्तदान केले. तसेच बाबासाहेब धेवडे, सचिन पिंपळे, बालाजी लोकरे, सुरेश पिंपळे, सुरेश शिनगारे, दत्तात्रय गोरे, विशाल डोंगरे, विश्वानंद तोष्णिवाल,



यशवंतराव गायके, बाबासाहेब पवार, श्रेयश तोष्णिवाल, ऋषिकेश तोष्णिवाल, संदिप पुजदेकर, महादेव भोसले, आयुषकुमार तिवारी, गजानन लोकरे अश्या २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.किल्ले धारूर युथ क्लबच्या वतीने कै.मधुकर भाऊ धस यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे रक्तपेढी विभागाचे तज्ञ अधिकारी डॉ.मधुकर गावित, आनंद सिताप, नजिब सय्यद, पवन हजारे, शेख बाबा, मुस्कान सय्यद, प्रियंका राऊत, साक्षी लोखंडे किल्ले धारूर युथ क्लब सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी रक्तदान शिबीर घेण्यास सहकार्य केले.

# सरकारी कार्यालयात संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्याचे श्री शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ डिसेंबर**



श्री.संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती रविवारी (दि.०८) रोजी सर्व शासकीय,निम शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने परित्रक काढले आहे. त्यामुळे तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा व शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

सदुंबरे जिल्हा पुणे येथील श्री संताजी जगनाडे महाराज हे तुकाराम महाराजांच्या चौदा टाळकऱ्यातील प्रमुख टाळकरी होते. तसेच तुकाराम महाराजांची मुळ गाथा पाण्यात टाकण्यात आली होती. ती संपूर्ण गाथा श्री.जगनाडे महाराजांना मुखोद्गत होती. त्यांनी ही गाथा पुन्हा लिहून काढली. त्यामुळे श्री.संताजी जगनाडे महाराजांना मानणारा मोठा वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात आहे. रविवारी (दि.०८) संताजी महाराजांचा जन्म दिवस साजरा करण्यात येतो. यासंदर्भात गेल्या दोन वर्षी पासून महाराष्ट्र शासनाने परित्रकात उल्लेख केला आहे. यंदाही महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी संदर्भात परिपत्रक जारी केले असून यामध्ये सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयात ८ डिसेंबरला संताजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले आहेत. तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात ही जयंती साजरी करण्यात यावी असे आवाहन तेली युवक संघटना व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, शनैश्वर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# ईश्वर लोहिया यांचेकडून वसतिगृहातील विद्यार्थीनींना ऊबदार ब्लॅन्केटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ डिसेंबर**



शहरातील योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहातील तीस गरीब विद्यार्थिनींना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वर सेठ लोहिया यांनी ऊबदार ब्लँकेटचे वाटप केले. संस्था कार्यालयात मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी केलेल्या आयोजित आयोजित कार्यक्रमास योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, कार्यकारी उपाध्यक्ष ड. जगदीश चौसाळकर ,संचालक ड. कल्याणी विर्धे ,संचालक अंगद कराड, स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया, मेजर एस पी कुलकर्णी, रवी मठपती यांची उपस्थिती होती.

सध्या कडाक्याची थंडी आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार व मऊ ब्लॅन्केटची आवश्यकता असते. योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसती गृहामध्ये तीस मुली शिक्षण घेत आहेत. त्यांची थंडीच्या दिवसांमध्ये सोय व्हावी. या उद्देशाने ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा व्यापारी ईश्वरसेठ लोहिया यांनी उबदार ब्लँकेट देण्यासाठी पुढाकार घेतला.संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास गुरुजी, ड. जगदीश चौसाळकर यांच्याकडे या ब्लँकेट सुपूर्द करण्यात आल्या. सदर उबदार ब्लँकेट विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. संस्थेच्या वतीने ईश्वरसेठ लोहिया ,स्वप्निल लोहिया, राहुल तापडिया यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या पाहिजेत. शक्य झाल्यास आर्थिक मदतही केली पाहिजे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे असे आवाहन ईश्वरसेठ लोहिया यांनी सत्कारास उत्तर देताना केले. गणपत व्यास गुरुजी, ड. जगदीश चौसाळकर यांनी आपले मत व्यक्त करून लोहिया यांनी केलेल्या मदतीबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सेवानिवृत्त प्राध्यापक गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ०४ डिसेंबर २०२४



## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जनजागृती रॅली

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०३ :- जिल्हा परिषद प्रशाला मुलांची पैठण,व म.रा.दिव्यांग विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक दिव्यांग दिन निमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली,

ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी हाताला हात दया,दिव्यांगाला साथ दया.

जागतिक दिव्यांग दिनाचा विजय असो. नका दाखवू नुसती सहानुभूती,प्रत्यक्षात करा कुर्ती. अशा विविध घोषवाक्यानी पैठण शहर दनाणुन सोडले.



सदरील रॅलीचे शिवाजी महाराज चौक येथे सभेत रूपांतर झाले. या वेळी दिव्यांग व्यक्तीना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.या वेळी म.रा. दिव्यांग विकास परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष,समशेर पठाण यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की आम्ही,आमची शाळा व संघटना दिव्यांग व्यक्ती सोबत आहोत. दिव्यांगांनी दैनंदिन जीवनात येणाऱ्या आडी-आडचणीवर मात करून पुढे जायला पाहिजे आपल्या हक्काचे शिक्षण घेतले पाहिजे.शासन स्तरावर दिव्यांगासाठी भरपुर योजना आहेत त्याचा लाभ दिव्यांगांनी घेतला पाहिजे.

या वेळी मदन आव्हाड,नंदू चाटूपळे,पापजी, शिपनकर,एन. सी.सी.प्रमुख ताराचंद हिवराळे,दिलीप तांगडे, राजेश पाखरे,वैशाली कुटे,शेख यास्मिन,जोती बलखंडे,दिव्यांग जन,विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.



साजापूर येथील आठवडी बाजार तळाजवळ खूप मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकल्या जात असल्याने त्या ठिकाणी दुर्गंधी सुटली होती परंतु साजापूर ग्रामपंचायतच्या वतीने आज सर्व कचरा हटविण्यात आला.

छाया: संजय निकम

## त्या खुनातील फरार आरोपी अखेर जेरबंद

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०३ डिसेंबर - शहरातील समर्थनगर परिसरात झालेल्या खुनातील फरार आरोपीस अखेर जेरबंद करण्यास कन्नड शहर पोलिसांच्या पथकाला यश आले आहे

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील समर्थनगर परिसरात दि.२२ सप्टेंबर रोजी गुरे हाकलण्यावरून वाद झाला होता या वादात शेख इफ्तीयार शेख हे इसम गंभीर जखमी झाले होते त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांना दवाखान्यात दाखल केले होते उपचार दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली होती,

दि.२४ सप्टेंबर रोजी कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल होताच पोलिसांनी चार आरोपींना अटक केली होती तर एक आरोपी फरार होता,पोलिसांच्या पथकाला गुप्त बतमीदारा मार्फत माहिती मिळाली त्या माहितीच्या आधारे दि.०२ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे सापळा लावून आरोपी इस्माईल इब्राहिम शेख वय ४७ वर्ष रा.पांढरी मोहल्ला कन्नड यास ताब्यात घेतले,

कन्नड न्यायालया समोर आरोपीला हजर केले असता न्यायालयाने आरोपीस दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली सदर कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी,पोलिस नाईक मोईस बेग,पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी यांच्या पथकाने सदरील कारवाई केली

## आडगाव खुर्द येथे अक्काताई महाराज यांचे उपस्थितीत दत्त जयंती सोहळा

तभा वूतसेवा



खुलताबाद प्रतिनिधी आडगाव खुर्द येथे दत्त जयंती निमित्त वेरूळ येथील आश्रमाच्या हभप प.पु सद्गुरु अक्का महाराज यांच्या प्रेरणाने ११ ते १५ डिसेंबरच्या दरम्यान फिरता फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह गुरुचरित्र पारायण दत्तयाग गीता जयंती सोहळा आयोजित केला आहे. यहा सोहळ्याचे ध्वजारोहण अभिषेक व पूजन ४ डिसेंबर रोजी होणार आहे. दररोज प. पु स्वामी विनायक महाराज यांच्या अमृतवाणीतून गीता पारायण सद्गुरु सुभाष बाबा महाराज यांचे प्रवचन होईल. या सप्ताहात वाल्मीक महाराज आवारे विजय महाराज जाधव हभप बबन महाराज केदारे पांडुरंग महाराज उगले उमेश महाराज दशरथे शिवाजी महाराज बोकारे.व काल्याची किर्तन सेवा अडबंगनाथ संस्थानचे मठपती स्वामी अरुणातगिरीजी महाराज आदी मान्यवरांचे कार्यक्रम होणार आहे. काल्याचा महाप्रसाद छत्रपती संभाजी नगरचे खासदार संदिपान जी भुमरे . यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. व फुलंब्री मतदार संघाचा आमदार अनुराधाताई अतुल चव्हाण यांचे विशेष सहकार्य सप्त्यासाठी लाभले आहे.

## तरुण भारतच्या वृत्ताची दाखल — फूटपाथ वर थाटलेली दुकाने हटवली



वाळूज महानगर (प्रतिनिधी): ए एस क्लब परिसरात दोन्ही बाजूच्या फुटपाथवर अवैध रित्या कब्जा करून काही खेळणी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती, हे दुकानदार फुटपाथ वर कब्जा करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करत याठिकाणी एखादा गंभीर अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने दैनिक तरुण भारत ने दिनांक १६ नोव्हेंबर रोजी फूटपाथवर थाटली दुकाने या मथळयाखाली वृत प्रकाशित केले होते. आज सकाळीच सिडकोच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम रबविण्यात आले. यावेळी अगोदर सर्व दुकानदारांना आपापले दुकाने आणि साहित्य काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते परंतु या दुकानदाराने आपली दुकाने सुरूच ठेवली होती म्हणून थेट जप्ती मोहीम राबवून काही दुकानदारांचे हातगाड्या व इतर साहित्य जप्त करत हे अतिक्रमण हटविण्यात आले. जप्त केलेले साहित्य परत फूटपाथवर दुकाने न लावण्याचे अटीवर दुकानदारांना देण्यात आले. ही अतिक्रमण हटाव मोहिम सुरूच राहणार असल्याचे सहाय्यक वसाहत अधिकारी स्वाती पाटील यांनी सांगितले. या पथकात स्वाती पाटील, तारामती भिसे , विनया वनवसे , विकास पवार आदींनी सहभाग नोंदवला.

## आ. संजना जाधव यांचा प्रगती कॉलनीतील महिलांच्या वतीने सत्कार

कन्नड :- दि.०३ डिसेंबर - कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातून महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार संजना जाधव यांनी विजय मिळवत त्यांची आमदारपदी निवड झाली आहे. त्याबद्दल शहरातील विविध प्रभागात त्यांचा सत्कार करण्यात आला.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते संजना जाधव यांचे कट्टर समर्थक, पॉपुलर हॉटेलचे संचालक सिद्धार्थ निकाळजे यांच्या कुटुंबासह प्रगती कॉलनीतील रहिवाशांच्या वतीने नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कॉलनीतील महिलांची व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी आमदार संजना जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ निकाळजे म्हणाले की, आमच्या मार्गदर्शिका तथा नवनिर्वाचित आमदार संजना जाधव यांनी जिल्हा परिषद सदस्या असल्यापासूनच मतदारसंघात शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक प्रयत्न करत निस्वार्थ भावनेने तालुक्यातील प्रलंबित असलेले विविध विकास कामांचे प्रश्न सोडविले आहेत. यावेळी प्रथमच त्यांनी आमदारपदाची निवडणूक लढवली आणि भरघोस मताधिक्यांनी त्या विजयी झाल्या. याबद्दल सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते असे ते म्हणाले.

## वक्तृत्व स्पर्धेत आयकॉन पॅराडाइजची देवयानी नरके पहिली

तभा वृत्तसेवा पैठण दि ०३ :- जिल्हा ग्रामीण रुग्णालय पैठण येथे जागतिक एड्स दिनानिमित्त शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एड्स प्रतिबंधात्मक विषयावर' वक्तृत्व आणि पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी एड्स सबंधित विषयावर भाषणे केली. या वक्तृत्व स्पर्धेत आयकॉन पॅराडाइज ज्यू. कॉलेजची इयत्ता अकरावीची विद्यार्थीनी देवयानी नरके हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या सुषमा वाघ यांनी मिळवला तर तृतीय क्रमांक आर्यचाणक्य विद्यामंदिरची ज्ञानदा शामदेव हिला मिळाला.



देवयानी नरके ने आपल्या भाषणात एच.आय.व्ही. एड्स बाबत समाजात असलेले गैरसमज दूर कसे करता येतील यावर भाष्य केले. तसेच एच.आय.व्ही. विषाणूची लागण होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी आणि एड्स बाधित व्यक्तीने काळजी कशी घ्यावी याबाबत विचार व्यक्त केले आणि एकत्रितपणे, आपण एचआयव्ही एड्सने मांडलेल्या अडथळ्यांवर मात करू शकतो आणि प्रत्येकाला चांगले आरोग्य लाभेल असे जग निर्माण करू शकतो. असा आशावाद व्यक्त केला.

या स्पर्धेत आयकॉन पॅराडाइज ज्यू. कॉलेज, हिंदस्कॉलर माध्यमिक विद्यालय, प्रतिष्ठान महाविद्यालय, आर्यचाणक्य विद्यामंदिर, मिश्रीलाल पहाडे जैन इंग्लिश स्कूल, गुरुकुल इंग्लिश स्कूल, अब्दुल कादर हायस्कूल पैठण आणि जि. प. शाळा ढोरकीन आदि शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे आयोजन जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक जिल्हा रुग्णालय चिकलठाणा छत्रपती संभाजीनगर, ए.आर.टी. सेंटर, आय. सी.टी.सी. हेल्थ युनिट पैठण तसेच संत एकनाथ (मल्टीस्पेशालिस्ट) रुग्णालय पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गौतम सव्वासे (प्रपाठक) व नोडल ऑफिसर हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. पंडित किल्लारीकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबलू गायकवाड यांनी केले.

देवयानी ने प्रथम क्रमाक मिळविल्याने विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संतोष तांबे, प्राचार्य आर. बी. रामावत मार्गदर्शक डॉ. जालिंदर येवले, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका एम .के .कोळगे, तसेच आयकॉन पॅराडाइज इंग्लिश स्कूल आणि ज्यू. कॉलेजच्या सर्वच शिक्षकांनी तिचे अभिनंदन व कौतुक केले.

## मल्हारी मार्तंड खंडोबा चंपाषष्ठी उत्सव सोहळ्याला प्रारंभ

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.३ डिसेंबर:



गंगापूर येथील श्री पंच कमिटी खंडोबा मंदिर संस्थान गंगापूर यांच्यावतीने सालाबादप्रमाणे मल्हारी मार्तंड खंडोबा चंपाषष्ठी उत्सवाला सोमवारी ( दि.२) प्रारंभ झाला आहे.या उत्सवादरम्यान दैनंदिन कार्यक्रमात काकड आरती सायंकाळी हरिपाठ रात्री ७ ते हरीकिर्तन नंतर हरिजागर होणार आहे.दरम्यान श्रीक्षेत्र देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यावेळी सदिच्छा भेट देणार आहेत.

यावेळी दि.२ ला कीर्तनकार हभप मच्छिंद्र महाराज निकम,दि.३ ला कल्याण महाराज पवार, दि.४ ला महंत हरीशरण गिरीजी महाराज,दि.५ ला दादा महाराज वायसळ,दि.६ ला कृष्णानंद महाराज नागे, यांची कीर्तने होणार आहेत. शनिवारी ( दि.७) सायंकाळी सहा वाजता बारा गाड्या मिरवणूक तदनंतर साडेसहा वाजता महाआरती, त्यानंतर सायंकाळी साडेसात वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे महाप्रसादाचे दररोजचे आयोजन हरिचंद्र पाटील डव्हाण, मारुतीअण्णा खैरे, मनोजअप्पा कुलकर्णी , संतोष अंबिलवादे , अविनाश पाटील यांनी केले आहे.रात्री दहा वाजता महाराष्ट्र भूषण पुरस्कार संबोधित अनिल दुधे यांचा जागरण गोंधळाचा कार्यक्रम होणार आहे गायनाचार्य चंद्रकांत महाराज सावंत, अशोकजी महाराज निरफळ, विठ्ठल महाराज औताडे, संदीप महाराज कड़वे, लक्ष्मण पाटील, पांडुरंग भजनी मंडळ, मांजरी, जामगांव, कोळघर, मालूंजा, पंचक्रोशितिल समस्त भजनी मंडळ, अंबेवाडी, गणेशवाडी, कोळघर, मालुंजा, सिरजगांव, नवाबपुर, बोलेगांव, बाबरगांव, मांजरी माहुली, समस्त भजनी मंडळ गंगापुर सहभागी होणार आहेत.

अशी माहिती श्री पंच कमिटी खंडोबा मंदिर संस्थान गंगापूर यांच्यावतीने देण्यात आली आहे.

## ट्रॅक्टरच्या धडकेत महिला जागीच ठार

### एएस क्लब उड्डाण पुलावरील घटना

वाळूज महानगर : धुळे-सोलापूर महामार्गावरील एएस क्लब च्या पुलावरून कांचनवाडीच्या दिशेने जाणाऱ्या मोपेडला (क्रमांक एमएच-२३, एव्ही-३३५१) भरधाव वेगातील विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने मोपेडस्वार महिलेचा ट्रॅक्टरच्या मागील चाकखाली सापडून जागीच मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास घडली. जयश्री भड असे मृत महिलेचे नाव असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

परिसरातील समर्थ रेसिडेन्सीमध्ये राहणाऱ्या जयश्री भड या त्यांचे नातेवाईक सुहास सुपेकर यांच्यासोबत मोपेडवर धुळे-सोलापूर महामार्गाने कांचनवाडीच्या दिशेने निघाल्या होत्या. एएस क्लब येथील उडडण पुलावरून खाली उतरत असताना



भरधाव वेगात आलेल्या ट्रॅक्टरने त्यांच्या मोपेडला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात रस्त्यावर पडलेल्या जयश्री यांच्या डोक्यावरून ट्रॅक्टर ट्रॉलीचे मागील चाक गेले. डोक्याचा चेंदामेंदा झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांच्यासोबतचे सुपेकर किरकोळ जखमी झाले ' अपघाताची माहिती मिळतात वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सचिन इंगोले, फौजदार मनोज घोडके यांनी घटना स्थळी धाव घेत ट्रॅक्टर चालकाला ताब्यात घेतले.

## साताऱ्यात विधिवत घटस्थापना, 'येळकोट येळकोट' चा जयघोष

### खंडोबाला पंचामृताभिषेक, दर्शनाला उसळली गर्दी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

प्रतिजेजुरी म्हणून ओळख असलेले सातारा परिसरातील खंडोबा मंदिरात सोमवारी, २ डिसेंबर रोजी मार्तंड भैरव षडरात्रोत्सवानिमित्त पहाटे ४ वा. वाजता पंचामृतभिषेक करण्यात आला. यावेळी पहाटेपासूनच साताऱ्यात मल्हारी मार्तंडाच्या दर्शनासाठी झुंबड उडाली होती.

अहिल्याबाई होळकरांच्या काळात उभारलेले श्रीखंडोबा मंदिर आहे. ७ डिसेंबर, म्हणजेच चंपाषष्ठीपासून साताऱ्याची यात्रा भरणार आहे. ९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या खंडोबा यात्रेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो भक्त दर्शनासाठी येतात. सोमवारी पहाटे पुजारी दिलीप धुमाळ यांच्या हस्ते पंचामृत रूद्राभिषेक करण्यात आला. तसेच सकाळी आकाश धुमाळ, विजय धुमाळांसह मंदिराचे विश्वस्तांसह मंदिराचे पदाधिकाऱ्यांनी सातारा गावातील ४० ते ५० भक्तांच्या उपस्थितीत श्रीखंडोबाची विधिवत महाआरती करण्यात आली.

मुहूर्तावर घटस्थापना

श्रीमल्हारी-मार्तंडासमोर धान्याचे अष्टदल काढून त्यावर तांब्याचे ताम्हण ठेवण्यात आले. या ताम्हणात तांब्याचा कलश मांडून त्यात नागवेलची पाच पाने बांधली गेली. कलशाच्या आतसुध्दा पाच पाने ओळीने मांडण्यात आली. अर्ध्या पाण्याने कलश भरून घटाची विधिवत महापूजा करण्यात आली. त्यावर नागवेलीच्या पानाची माळ घालण्यात आली. घटस्थापनेपासून घट उठेपर्यंत गावातील महिला, पुरुष उपवास करतात.

खंडोबा यात्रेनिमित्त मंदिर परिसरात साफसफाई करण्यात आली आहे. भव्य सभामंडप उभारून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या रांगांची व्यवस्थेचीही पूर्वतयारी झाल्याची माहिती मंदिर विश्वस्त विजय धुमाळ यांनी दिली. यासोबतच यात्रेनिमित्त महापालिकेकडून फिरते स्वच्छतागृह, आरोग्य केंद्राची व्यवस्था मंदिर परिसरात करण्यात आली आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार याची विशेष काळजी घेण्यात येत असून, यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहेत.

कडक बंदोबस्त

१०० पोलिसांसह खासगी सुरक्षा रक्षक, २०० स्वयंसेवकांचा यात समावेश असेल, असे विश्वस्त धुमाळ यांनी सांगितले. एमआयटीकडून मंदिर मार्गावरील विद्युत खांबांवरील पथदिव्यांची दुरुस्तीची कामेही युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आली आहेत. भाविकांची गैरसोय होणार नाही, याचे नियोजन महापालिका प्रशासनाच्य वतीने करण्यात आले आहे.

## ढगाळ हवामानामुळे थंडी गायब, तापमान १० अंशावरुन २० वर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

दक्षिणेत सुरू असलेल्या फेंगल चक्रीवादळाचा परिणाम शहरासह मराठवाड्यात दिसून येत आहे. दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे तापमानात वाढ होत आहे. तीन-चार दिवसांपूर्वी तापमान १० ते ११ अंश सेल्सिअस होते, ते सोमवारी चक्क २०.६ अंशावर आले आहे. चिकलठाणा वेधशाळेने रविवारी, १ डिसेंबर रोजी कमाल तापमान २९.४, तर किमान तापमान १६.० अंश सेल्सिअस एवढे नोंदविले होते. शुक्रवारी आणि शनिवारी १० ते ११ अंश सेल्सिअस एवढे किमान तापमान होते.

ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रामचंद्र सांबळे म्हणाले, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले फेंगल हे चक्रीवादळ कोलकाताच्या दिशेने जात आहे. दरम्यान, या वादळाचा परिणाम दक्षिणोत्तर राज्यांमध्ये दिसून येत आहे. यात मराठवाड्यासह महाराष्ट्रातील काही भागांचाही समावेश आहे. परिणामी मराठवाड्यातील दक्षिणी जिल्ह्यांमध्ये काही भागांत मुसळधार पाउस कोसळत आहे. परिणामी, छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यात शनिवारपासून ढगाळ वातावरण आहे. ढगाळ वातावरण असल्याने वाऱ्याचा वेग कमी झाला आहे आणि तापमानात वाढ होत आहे. शनिवार रोजी किमान तापमान ११ अंश होते. रविवारी यात तब्बल सहा अंशांनी वाढ होऊन १६ अंशांची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली. सोमवारी कमाल तापमान २८.२, तर किमान २०.६ अंश सेल्सिअस एवढे नोंदविले गेले आहे. फेंगलच्या प्रभावामुळे मराठवाड्यातील काही भागांत अद्यापही पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून, मराठवाड्यातील दक्षिणोत्तर असलेले नांदेड, परभणीकडील जिल्ह्यांमध्ये तुरळक पावसाचा अंदाज हवामानतज्ज्ञांनी वर्तविला आहे.

दरम्यान, ६ ते १२ डिसेंबरदरम्यान मराठवाड्यातील काही भागांत पावसाची शक्यता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील ग्रामीण मौसम विभागाच्या शास्त्रज्ञानी व्यक्त केली आहे.

मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्राच्या वतीने प्राप्त झालेल्या अंदाजानुसार, मराठवाड्यत पुढील तीन दिवस हवामान कोरडे राहणायची शक्यता आहे. तर ३ व ४ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

फेंगलचा परिणाम

दरम्यान, दक्षिणी भागात सुरू असलेल्या नैसर्गिक आपत्तीचा परिणाम मराठवाड्यावर होत आहे. ३१ नोव्हेंबरपासून ढगाळ वातावरण सुरु आहे. अशातच मराठवाड्यातील तुरळक ठिकाणांसह राज्याच्या काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. ढगाळ वातावरणामुळे शनिवारी तापमानात वाढ झाली होऊन ११ अंश झाली होती, सोमवारी यात आणखी वाढ होऊन पारा २० अंशाच्या वर गेला आहे.

## अग्रसेन विद्या मंदिर शाळेच्या सहा खेळाडूंची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

ईटखेडा / प्रतिनिधी - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेतील खेळाडूंनी विविध शालेय स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी केली तसेच त्यांची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.



निवड झालेले खेळाडू : शुटींग - श्रीपाद यादव (१४ वर्षे मुले), धनुर्विद्या धिमय पाटील (१७ वर्षे मुले), स्केटिंग तनय कोलपे (१७ वर्षे मुले), अनन्या पाटील (११ वर्षे मुली) वुशु - सुकन्या आगळे (१९ वर्षे मुली), मुष्टियुद्ध (बॉक्सिंग) दिव्या शिंदे (१७ वर्षे मुले). विद्यार्थ्यांच्या नेत्रदिपक कामगिरीसाठी शाळा समितीचे विश्वस्त केशवजी लीला, विदयमान अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधिक्षक अजय सोनुने, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यांना शाळेचे क्रीडा शिक्षक सोनी खरात, डॉ.कैलास शिवणकर, रविंद्र माळी, अभिजीत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जि.प. प्रशालेत दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.३ डिसेंबर -**

देवणी तालुक्यातील जवळगा येथील जिल्हा परिषद प्रशालेत (ता.३) मंगळवारी दिवाळी अंकाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात विविध दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

कार्यक्रमांची सुरूवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन पत्रकार आनंद अंकुलगे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे दिवाळी अंक वाचायला मिळावे यासाठी जि.प. प्रशालेत प्रथमच उपक्रम राबविण्यात आला असून दिवाळीनंतर वेगवेगळे दिवाळी अंक उपलब्ध करून दिले आहेत. दिवाळी अंकाची माहिती मिळावी म्हणून या दिवाळी अंकाचे प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. एकूण ३५ दिवाळी अंक प्रदर्शनात ठेवण्यात आले आहेत.

यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल पाटील, मुख्याध्यापक सुरेंद्र चौहान, दत्तात्रय कदम, विठ्ठल केंद्रे, मंजुषा सुडे, सुनीता सावंत, लक्ष्मण चिंते, शिवकुमार बिरादार, विद्यार्थी आदि उपस्थित होते.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन

**लातूर, दि.३ डिसेंबर -**

नटवर्य श्रीराम गोजमगुंडे हे चित्रपट तसेच नाट्य कलेला पूर्णपणे वाहून घेतलेले महान व्यक्तिमत्व होते. आज त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही बाब मराठवाड्यातील कलाक्षेत्रासाठी अतिशय अभिमानस्पद असल्याचे प्रतिपादन बालरंगभूमी, मुंबईच्या उपाध्यक्षा दीपा क्षीरसागर यांनी केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय (नाट्यशास्त्र विभाग) लातूरच्या वतीने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन रविवारी पार पडले. यावेळी स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, नाट्य परिषदेचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, धनंजय बेंबडे, अजय गोजमगुंडे, निलेश सराफ, अमोल नानजकर, संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ. अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, ॲड. राणी स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवर उपस्थित होते.



### वीरशैव लिंगायत समाजाच्या वधू-वर परिचय मेळाव्याला प्रतिसाद

**लातूर, दि.३ डिसेंबर -**

वीरशैव लिंगायत समाजातील विवाह इच्छुकासाठी सर्वाधिक नोंदणी असलेली माहितीपुस्तिका दरवर्षी प्रकाशित केली जाते. महाराष्ट्रातील सर्वात मोठा विनामूल्य लिंगायत वधू-वर परिचय १२ वा राज्यस्तरीय मेळावा ३ नोव्हेंबर रोजी व्यापकरित्या पार पडला. त्याचा दुसरा भाग १ डिसेंबर रोजी वीरशैव समाज सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली लातूर येथे मोठ्या थाटात पार पडला. यावेळी या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार चितकोटे हे होते. यावेळी व्यासपीठावर पुन प्रमुख विवेक जानते, संयोजक नागेश कनडे, अध्यक्ष अभिषेक चौडे, प्रसाद नागुरे, वैभव विभुते, बालाजी पिंपळे, राजाभाऊ हलकुडे, दिलीप होनराव, अशोक अप्पा उपासे, उमाकांत नागोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



### सात एकर ऊस जळून खाक

**निलंगा, दि.३ डिसेंबर -**

निलंगा येथील शेतकरी राजेंद्र शिवबसप्पा सोरडे (बारापुडे) या शेतकऱ्यांचा सात एकर ऊस महावितरणच्या विद्युत पोलवरील तारेला पार्किंग होऊन कारखाना तोडणीस आलेला सात एकर उभा ऊस जळून खाक झाला आहे. याबाबत सोरडे यांनी महावितरणकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. निलंगा शिवारातील राजेंद्र शिवबसप्पा सोरडे यांनी गट नंबर १६५/क या जमिनीवर ७ एकर जमीनीमध्ये ऊस पिकाची लागवड केलेली होती. परंतु दि.२६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ ते ४ वाजण्याच्या सुमारास महावितरण विभागाच्या मेन वायरचे स्पारकिंग होऊन वायर तुटुल्यामुळे व ऊस पिकामध्ये शॉटसकिटमुळे ऊसामध्ये ठिणगी पडुन ऊसाला आग लागून संपुर्णपणे ऊस जळुन गेला. त्यामुळे राजेंद्र सोरडे यांचे जवळपास ५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# लातूरच्या अरिहंत ऑइल्स कंपनीला सहा कोटींचा गंडा

## बनावट पावत्यांच्या माध्यमातून फसवणूक; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**

संगणकावर बनावट पावत्या तयार करून लातुरातील अरिहंत व्हेज ऑइल्स प्रा.लि. कंपनीला तब्बल ५ कोटी ७८ लाख ५१ हजार ७० रुपयांना गंडविल्याची घटना घडली. ही फसवणूक जानेवारी २०२० ते ऑक्टोबर २०२४ या काळात करण्यात आली आहे. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर चौघांसह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी उत्कर्ष अशोकराव संगवे (वय ५५, रा. परशुराम पार्क, हरंगुळ बु. रोड, लातूर) यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. विशाल राजेंद्र वजरंगे (वय २७), वैभव राजेंद्र बजरंगे (वय २९, दोघे रा. सोना नगर लातूर), विजय झोडगे, राजकुमार जाधव याच्यासह इतरांनी संगनमत करून करणाऱ्या व्यक्तींनी कट रचून वजनामध्ये फेरफार करुन, सोयाबीन लातुरातील अतिरिक्त एमआयडिसी, परीक्षण गुणवत्तेत बदल करत चिंचोलीरावबाडी परिसरात असलेल्या त्यानुसार संगणकावर बनावट पावत्या अरिहंत व्हेजऑइल्स प्रा.लि. या तयार केल्या. या बनावट पावत्याच्या कंपनीला ५ कोटी ७८ लाख ५१ हजार माध्यमातून सोयाबीन पुरवठादार ७० रुपयांना




गंडा घालत फसवणूक ट्रेडिंग कंपनीचे मालक, त्यांना पैसे केली. हा गुन्हा जानेवारी २०२० ते ३१ पाठविणारे व्यक्ती, वाहन मालक ऑक्टोबर २०२४ या काळात घडला चालक आणि त्यांच्याशी संगनमत आहे.

याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनंतर विशाल वजरंगे, वैभव बजरंगे, विजय झोडगे, राजकुमार जाधव याच्यासह इतरांविरोधात गुरनं ८४८/२०२४, कलम ३१६ (४), ३१८ (क), ३३६ (३), ३३८, ३३९, ३४०, ३४४, ६१ (२) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस निरीक्षक सुधाकर देडे हे करीत आहेत.

## डॉ. नाकाडे यांचे मराठवाड्याच्या विकासातील योगदान कायम स्मरणात राहील

### आ. अमित देशमुख यांचे प्रतिपाद...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, तसेच लातूर येथील दयानंद विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, डॉ. शिवराज नाकाडे यांच्या अकस्मित निधनाचे वृत्त दुःखद असल्याचे माजी मंत्री आम. अमित देशमुख यांनी म्हटले आहे, शैक्षणिक सामाजिक आणि मराठवाड्याच्या विकासातील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.



आ. अमित देशमुख यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, डॉ. शिवराज नाकाडे यांनी शिक्षण संस्थाचालक, कुलगुरू, प्राचार्य म्हणून शिक्षण क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे.

मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी मराठवाड्याच्या विकासाला चालना दिली. स्व. विलासराव देशमुख यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. नाकाडे कुटुंबीयांच्या या दुःखात मी व देशमुख कुटुंबीय सहभागी आहोत.

त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित करतो, असे शेवटी आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

## अंधत्व निवारण कार्य पुर्ण परिमंडळात करू : डॉ. अर्चना भोसले



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा अंदाज आहे की, ८० टक्के व्हिज्युअल हानी एकतर टाळता येण्याजोगा किंवा उपचाराने बरा होऊ शकतो. यामध्ये मोतीबिंदू, ऑन्कोसेरसि आसिस, ट्रॅकोमा, काचबिंदू, डायबेटिक रेटिनोपॅथी, अपवर्तक त्रुटी आणि बालपणातील अंधत्वाची काही प्रकरणे यांचा समावेश होतो. रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राचा अंदाज आहे की, युनायटेड स्टेट्समधील अर्धे अंधत्व टाळता येण्यासारखे आहे. या धरतीवर आपण ही या परीमंडळात अंधत्व निवारण जनजागृती मोहीम यावर काम करू. असे डॉ. अर्चना भोसले यांनी सांगितले.

त्या उदयगिरी लायन्स धर्मादाय नेत्ररूग्नालय उदगीर येथे आयोजित १९ वा वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.रामप्रसाद लखोटीया हे होते. प्रमुख पाहुणे डॉ. अर्चना भौसले उपसंचालक आरोग्य सेवा विभाग, डॉ. प्रदीप ढेले शल्यचिकित्सक लातूर, राजू गायकवाड दिव्यांग विभाग लातूर, डॉ. संजय ढगे साह्यक उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, डॉ. दोडके, डॉ. शशिकांत देशपांडे, डॉ. हारीश सुळे, डॉ. दोडके, ईश्वरप्रसाद बाहेत, प्रदीप बेद्रे आदीसह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शिबिर संयोजक यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. रामप्रसाद लखोटीया यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी आदेप्पा यांनी केले.

या कार्यक्रमास उदगीर, जळकोट तालुक्यातील शिबिर संयोजक व उमेद महिला पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होत्या.

## महापालिकेच्या वतीने दंत चिकित्सा शिबिर; ११६ नागरिकांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३ डिसेंबर -**

लातूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील गरजू रुग्णांना कमी दरामध्ये दर्जेदार दंत शल्य चिकित्सा सेवा उपलब्ध व्हावी, याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान-लातूर मनपा आणि एम. आय. डी.एस. आर., लातूर यांच्या मध्ये दोन महिन्यापूर्वी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात म्हणून महानगरपालिके अंतर्गत शहरातील दोन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक २ डिसेंबर रोजी भव्य दंत शल्य चिकित्सा शिबिर आयोजन करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक श्री बाबासाहेब मनोहरे यांनी आरोग्य विभागास दिले होते. या शिबिराचे उद्घाटन शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र-गौतम नगर येथे लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त (आरोग्य) डॉ. पंजाब खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्यासह एम.आय.डी. एस.आर. संस्थेमार्फत दंतशल्यचिकित्सा तज्ञ उपस्थित होते. याप्रसंगी शहरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या आरोग्य संस्था अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या सेवेचा गरजू नागरिकांनी लाभ घेण्यासाठी



देखील त्यांनी आवाहन केले.

या शिबिरामध्ये एकूण ११६ रुग्णांची दंत शल्यचिकित्सा करण्यात आली व उपचार करण्यात आले. संदर्भ सेवा आवश्यक असणाऱ्या रुग्णांवर पुढील तपासण्या करण्याकरिता संदर्भित केले आहे.

## रब्बी हंगाम पीक स्पर्धेसाठी 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, दि.३ डिसेंबर -**

कृषि विभागामार्फत रब्बी हंगामा अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीक स्पर्धांचे आयोजन करण्यात आहे. या स्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी ३१ डिसेंबरपर्यंत तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे.

हरभरा, गहू, ज्वारी, करडई व जवस या पिकांसाठी रब्बी पीक स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल. पिक स्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान एक एकर (४० आर) क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

## जगाचा कोरोना संपला, पण गरीबीचा कोरोना कधी संपणार? : बिरादार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**



आजपर्यंत अनेक भयान संकटाचे आघात सहन केलेल्या आपल्या देशाने कोरोना १९ या नैसर्गिक आपत्तीचा आघातही सहज सहन केला. परंतू पिढ्यानपिढ्या जो समाज गरिबी, लाचारीच जगणं जगत आहे त्यांचा सामाजिक कोरोना महाभयंकर आहे. अन्न पाण्याविना मरणे, घरा विना राहणे, अनेक संकटाचे सहने, रुढीपरंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक दारिद्र्य या बरोबरच अधिकारी व पदाधिकाऱ्यांची भ्रष्टाचारी व अमानुष प्रवृत्ती इत्यादी गरिबीवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध समाजाने विचारलेला प्रश्न, जगाचा कोरोना संपला, पण आमच्या गरीबीचा कोरोना कधी संपणार? असा प्रश्न विचारणारी साहित्यकृती म्हणजे गरिबीचा चिरंतन कोरोना हि होय, असे मत प्रसिद्ध साहित्यिक तुकाराम बिरादार यांनी व्यक्त केले.


शिवशंकर पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ३२६ व्या वाचक संवादमध्ये तुकाराम बिरादार यांनी गरिबीचा चिरंतन कोरोना या विलास माने लिखित साहित्यकृतीवर संवाद साधताना पुढे म्हणाले, कोविड-१९ अर्थात कोरोना ही नैसर्गिक आपत्ती व काल्पनिक तकलादू होती.

तर गरिबी, भूकमारी, अशिक्षितपणा, बेरोजगारी, अन्याय, अत्याचार, लाचारी इत्यादी कोरोना पेक्षा भयंकर आहेत. या अनुषंगाने लेखकाने मांडलेल्या भूमिका ह्या इमानदार, उपकाराच्या नोंदी चिंतलशील आहेत, असे ते यावेळी म्हणाले.

वाचक संवादावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी सगर, तुळसीदास बिरादार, मोहन निडवंचे, कचरूलाल मुंदडा, मुरलीधर जाधव, हनुमंत म्हेत्रे व बाबुराव सोमवंशी यांचेसह अनेकांनी चर्चेत सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमास परिसरातील अनेक वाचक रसिकांसह बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुरीच्या पिकावर अळी पडल्याने शेतकरी चिंतेत



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ डिसेंबर -**

गेल्या कित्येक वर्षापासून तूर या पिकावर वेगवेगळे रोग पडत आल्यामुळे आणि पीक वाळून जाऊ लागल्यामुळे मध्यंतरीच्या काळात तुर पिक घेणे शेतकरी टाळत होते. मात्र यावर्षी जास्त भाव मिळाल्यामुळे शेतकरी पुन्हा तुरीच्या लागवडीकडे वळला आहे. मात्र शेतकऱ्याच्या अडचणी त्याच्या पाचवीलाच पुजल्या की काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे.

सध्या ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. तसेच थंडी पडल्यामुळे फुलोऱ्यात आलेल्या तुरीवर अळी पडली आहे. सुरुवातीला अनेक कीटकनाशकांचे फवारणी शेतकऱ्यांनी केली आहे. मात्र तरी देखील ऐन मोसमात तुरीवर अळी पडल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. खरीप हंगामातील दीर्घ मुदतीचे पीक म्हणून तूर ओळखली जाते. शेतकऱ्याचे अर्थचक्र सुधारेल, अशी अपेक्षा तुरीच्या पिकाकडून केली जात होती. मात्र ती अपेक्षाही आता धुळीस मिळत आहे. सोयाबीनच्या पिकाला हमीभाव मिळाला नाही, अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी हमीभावाची वाट न बघता मिळेल त्या भावाने सोयाबीन बाजारात विकले आहे. काही शेतकऱ्यांनी घरी साठवून ठेवले आहे. मात्र त्यालाही भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्याची पूर्ण बिशाद ही तुरीच्या पिकावर होती, मात्र ढगाळ वातावरणामुळे निर्माण झालेल्या संकटापुढे शेतकरी हातबल झाला आहे.

उदगीर तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक छोट्या-मोठ्या खेड्यातून तुरीच्या पिकावर नवे संकट आले आहे. एक तर सुरुवातीच्या काळात सततच्या पावसाने अनेक पिकांचे नुकसान केले होते. मात्र तरी देखील शेतकऱ्यांच्या आशा तुरीच्या पिकावर अवलंबून होत्या.

मात्र त्याही आशा मावळतात की काय? अशी शंका निर्माण झाली आहे. कारण या पिकावर कीड व अळीचा प्रादुर्भाव निर्माण झाला आहे.

### कृषी विभागाने मार्गदर्शन करणे गरजेचे...

तुरीच्या पिकावर मोठ्या प्रमाणात अळीचा व मर रोगाचा प्रादुर्भाव झाला असून यामुळे शेतकऱ्यांना वेळीच कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन करणे गरजेचे होते. मात्र तसे मार्गदर्शन झाले नाही. सध्या इतरत्र शेतीमालाच्या तुलनेत तुरीला हमीभाव व बाजारभाव चांगला आहे. त्यामुळे आंतरिक पीक म्हणून शेतकरी तूर पिकाला प्राधान्य देतात, मात्र सध्या सोयाबीन पीक हातचे गेले आहे. कापसाचे उत्पादन घटले आहे. आता तूर रब्बी पिकावर शेतकऱ्यांच्या अशा असताना मागील काही दिवसापासून ढगाळ वातावरणामुळे कीड रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने शेतकऱ्यांमधून विविध कीटकनाशकाच्या फवारणीवर भर दिला जात आहे. मात्र कृषी विभागाकडून नेमक्या कोणत्या कीटकनाशकाचे फवारणी करावी? यासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे असतानाही वेळीच तसे मार्गदर्शन झालेले नाही, ही अत्यंत शोकांतिका आहे. अशी प्रतिक्रिया प्रगत शेतकरी भास्कर कुंडगीर इसमालपूर तालुका उदगीर यांनी व्यक्त केली आहे.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह दुहेरी लाभ घेणाऱ्या महिलांची होणार पडताळणी

**तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे**
**औसा, दि.३ डिसेंबर -**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांच्या मदतीत वाढ करुन २ हजार१०० रुपयांची मदत देण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी दिले होते. एकीकडे सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु असून दुसरीकडे लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या योजनेत बदलांचे संकेत चर्चिले जात आहे. यामुळे मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींचे टेंन्शन वाढले असून या योजनेची लाडक्या बहिणीत होत असलेल्या चर्चेने संभ्रम वाढल्याचे दिसून येत आहे.

गेल्या चार महिन्यापासून सुरु असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला महिलांतून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमुळे गरजू आणि गरीब कुटुंबाला खुप मोठा आधार मिळाला. याचा मध्यमवर्गीय कुटुंबालाही फायदा झाला. अशा सुरु असलेल्या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अनेक बहिणींनी या योजनेत सहभाग घेतला. या काळात निवडणुकीची धांदल सुरु असल्याने शासनाने जवळपास सर्वच बहिणींना सहभागी करुन घेत १५०० रुपयांची भेट रुपाने मदत केली.

या काळात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत बहिंनीनी भावांना सढळ हाताने मतदान करीत भरभरुन साथ दिली. मात्र या निवडणुकीच्या काळात भावांनी १५०० रुपयात वाढ करुन २१०० रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन दिले होते.

आता निवडणुका संपल्या आहेत. सत्ता स्थापनेचे जोरदार वारे वाहू लागले आहे. तसे लाडक्या बहिणींच्या रकमेत वाढ करण्याच्या हालचालींनी वेग घेतला आहे.






या योजनेत सहभागी झालेल्या कर भरणाऱ्या, नोकरदार कुटुंबातील, खोटी कागदपत्रे, एकाच रेशन कार्डातील दोनपेक्षा अधिक महिलांची पडताळणी करण्यात येणार असल्याची चर्चा आता ग्रामीण पट्यात होत आहे. याचबरोबर पॅनकार्डधारक, आयकर भरणाऱ्या महिला, बोगस आधारकार्डवरुन सहभागी झालेल्या महिलांनाही या योजनेतून वगळण्यात येणार आहे, अशी चर्चा होत आहे.

अशा चर्चेने ग्रामीण भागात जोर धरला असून यासह संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला व वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे.

विवाहित, घटस्फोटित, निराधार असलेल्या महिलांचा या योजनेत समावेश करण्यात येणार आहे. यासाठी महिला महाराष्ट्रातील रहिवाशी असणे गरजेचे आहे. तसेच २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याची चर्चा औसा तालुक्यात होत आहे.